सं. क्र. २९२३

# खिडकीतील तारे

REFBK-0013770

अनंत काणेकर

७५८२५
२९।३।७९
२९२३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
* १९७० *

# खिडकीतील तारे

निवडक पंचवीस लघुनिबंधांचा संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७५८२५ दि: निंबध
2923 दि: 29।3।6

लेखक

अनंत काणेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. 93660
REFBK-0013770
REFBK-0013770

सुविचार प्रकाशन मंडळ
नागपूर आणि पुणे
किंमत २ रुपये

प्रथमावृत्ती, जून १९६४
© अनंत काणेकर

♣

प्रकाशक :
श्यामकान्त बनहट्टी,
सुविचार प्रकाशन मंडळ,
धनतोली, नागपूर १.
४६१/१० सदाशिव, पुणे २.

♣

मुद्रक :
श्यामकान्त बनहट्टी,
श्रीनिवास मुद्रणालय,
सुविचार प्रकाशन इमारत,
धनतोली, नागपूर १.

मळकट दिसू, या भीतीने घासून पुसून आम्ही नेहमी स्वच्छ राहतो !' यावर काळे लोकच अधिक मळकट राहण्याचा संभव आहे, कारण काळ्या रंगात थोडासा मळकटपणा सहज खपून जाईल असं त्यांना वाटायचं, असं गणूकाकांना आपण उलट सांगायला लागलो तर ते आपणाला पुढे बोलूच देणार नाहीत. गणूकाकांची मतं अशी चमत्कारिक, जुनाट, पारंपरिक आहेत; पण या मतांच्या मागे त्यांचं विशाल, निर्मल, सात्त्विक मन असल्यामुळे ते मलाच काय, पण सर्वांनाच मनापासून आवडतात.

अनंत काणेकर

# अनुक्रम

—✻—


| | | | |
|---|---|---|---|
| | प्रास्ताविक | | (३) – (११) |
| १. | माझा हिरवा मित्र | ... | १ |
| २. | दुरून आकाश साजरे ... ! | ... | ६ |
| ३. | आकाशातले तारे आणि मी | ... | १० |
| ४. | पुराणातली वांगी | ... | १३ |
| ५. | क्रिया आणि प्रतिक्रिया | ... | १६ |
| ६. | माणसे–चांगली आणि वाईट | ... | १९ |
| ७. | चमत्कारिक कल्पना | ... | २२ |
| ८. | प्रश्नांची उत्तरे | ... | २५ |
| ९. | सुखस्प्नांचे कारखानदार | ... | २८ |
| १०. | अपवादांचे उपयोग | ... | ३१ |
| ११. | कलेचा परीस | ... | ३३ |
| १२. | धावती गाडी | ... | ३५ |
| १३. | एक आणि एक तीन | ... | ३७ |
| १४. | डोंबाऱ्यांचा खेळ | ... | ४० |
| १५. | सामान्यांचे असामान्यत्व | ... | ४३ |
| १६. | पाचामुखी सैतान ! | ... | ४६ |
| १७. | दोन चाके ! | ... | ४९ |
| १८. | तत्त्वनिष्ठा आणि तमासगीर | ... | ५२ |
| १९. | मोठे शून्य | ... | ५५ |
| २०. | देवदारु आणि चक्रवाक् | ... | ५८ |
| २१. | मनाचे पिंजरे | ... | ६१ |
| २२. | आरसा हसला | ... | ६४ |
| २३. | मनाच्या ढाली | ... | ६७ |
| २४. | माझे आवडते पान | ... | ७० |
| २५. | ‘ मोठ्ठं, त्याहून मोठ्ठ !’ | ... | ७६ |

# प्रास्ताविक

'पिकली पाने' हा माझा पहिला लघुनिबंधसंग्रह १९३४ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'शिंपले आणि मोती', 'तुटलेले तारे', 'उघड्या खिडक्या' आणि 'विजेची वेल' (१९५७) असे आतापर्यंत पाच संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. गेल्या तीस वर्षात लिहिलेल्या या लघुनिबंधांतले काही निवडक निबंध प्रस्तुत पुस्तकात घेतले आहेत.

स्वतःच्या वाङ्मयाचे मूल्यमापन करणे मला उचित वाटत नाही. माझ्या लघुनिबंध–वाङ्मयाची चर्चा चांगल्या जाणकार टीकाकारांनी केली आहे. तेव्हा तशी काहीच चर्चा मी करीत नाही. पण लघुनिबंध या वाङ्मयप्रकारासंबंधी, लघुनिबंध मी कसे लिहिले त्यासंबंधी आणि माझ्या लघुनिबंधांतल्या 'गणूकाका'संबंधी आकाशवाणीवर मी बोललो आहे. ते सर्व इथे उद्धृत करतो.

## मी लघुनिबंध कसे लिहिले ?

माझे पहिले लघुनिबंध प्रभाकरपंत कोल्हटकरांच्या 'संजीवनी' साप्ताहिकात प्रसिद्ध झाले आणि त्यांचा बराच बोलबालाही झाला. कुणाला खरे वाटो अगर न वाटो, लघुनिबंध म्हणून मी ते मुळीच लिहिले नाहीत. लिंड, गार्डिनर वगैरेंचे लघुनिबंध मी वाचलेले होते; पण त्यांच्यासारखे लघुनिबंध लिहावे या ईर्ष्येने पुढे 'पिकलीं पानें' या नावाने १९३४ साली पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले 'संजीवनी'तले लेख मी लिहिले नव्हते. 'चांदराती'ची पहिली आवृत्ती माझे मित्र प्रभाकरपंत कोल्हटकर यांनी मोठ्या हौसेने प्रसिद्ध केली होती. त्यांनी 'संजीवनी' साप्ताहिक काढले तेव्हा त्यात मी काहीतरी नियमितपणे लिहावे असा आग्रह त्यांनी मला केला. कविता मी लिहिल्या होत्या, पण गद्य मला लिहिता येईल किंवा काय याबद्दल माझी मुळीच खात्री नव्हती. मी नाही नाही म्हणत होतो. कोल्हटकरांनी मला दरडावून सांगितले, 'तुमच्यासाठी शेवटच्या कव्हराचे आतले एक पान मी राखून ठेवले आहे. त्यात दर आठवड्याला एक पानभर मजकूर तुम्ही दिलाच पाहिजे. काय वाटेल ते लिहा. मात्र एका पानापेक्षा अधिक मजकूर मुळीच चालणार नाही. कारण कव्हराच्या बाहेरच्या बाजूला जाहिराती असतात. तिथे वाढलेला मजकूर देता येणार नाही.'

काय लिहावे म्हणून मी कित्येक दिवस डोके खाजवीत होतो. वाचनालयात मी इंग्रजी साप्ताहिके वाचीत असे. त्यांपैकी लंडनच्या साप्ताहिकात प्रख्यात विनोदी लेखक जी. के. चेस्टर्टन दर आठवड्याला एक पान नियमाने लिहीत असे. त्या पानाला दुसरे काही नावच नव्हते. ‘ चेस्टर्टन्स पेज् ’ हेच त्या पानाचे नाव असे. त्या आठवड्यात जे काही सुचेल त्यावर चेस्टर्टन हवे ते लिही. आपणही ‘ संजीवनी ’ च्या त्या एका पानावर त्या त्या आठवड्यात जे काही सुचेल ते लिहून टाकावे असे मी ठरविले. ‘ पिकलीं पानें ’ यातल्या पहिल्या पहिल्या काही लेखांची नावेच याची चांगली साक्ष देतात. ‘ बुद्धीला पटतं पण मनाला कसंसंच वाटतं ’, ‘ दुसऱ्यांच्या डोळ्यांनी पाहाण्याची सवय ’, ‘ आत्मप्रतीती ’, ‘ आतले आवाज आणि अंतः-करण प्रवृत्ती ’ वगैरे वगैरे. आपण लघुनिबंध लिहितो आहोत याची मला मुळीच कल्पना नव्हती. एका पानापेक्षा अधिक लिहायचेच नव्हते. त्यामुळे ते लेख लघु होते इतकेच. ‘ पिकलीं पानें ’ या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध करताना वृत्तपत्रां-तल्या जाहिरातीत या पुस्तकाचे वर्णन काय द्यावे, म्हणून प्रकाशकांनी मला विचारले तेव्हा ‘ लघुनिबंध ’ हा शब्दही मला आठवला नाही. या पुस्तकाचे वर्णन ‘ लघुलेखसंग्रह ’ असे करा असे त्यांना सांगितल्याचे मला पक्के आठवते. पुढे परीक्षणकर्त्यांनी त्या लेखांना ‘ लघुनिबंध ’ म्हटले, तेव्हा मीही त्यांना ‘ लघु-निबंध ’ म्हणायला लागलो !

## लघुनिबंध आणि निबंध

लघुनिबंध हा शब्द ऐकल्याबरोर कुणालाही वाटतं की लघुत्व, लहानपणा हे या निबंधाचं वैशिष्टय. निबंध लहान असला, छोटासा असला की तो लघुनिबंध; मोठा असला की निबंध. मला वाटतं हे मुळीच बरोबर नाही. उलट मी असं म्हणेन की एखादा निबंध तीन पानांचा असेल, तर एखादा लघुनिबंध चांगला सहा पानांचा असेल. तीन पानांचा म्हणून एकाला लघुनिबंध म्हणायचं, आणि दुसरा सहा पानांचा म्हणून त्याला निबंध म्हणायचं हे कुणीही वाङ्मयाचा जाणकार मान्य करणार नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर हे लेखक पूर्वी मोठमोठे निबंध लिहीत असत आणि अलिकडचे लेखक ना. सी. फडके म्हणा किंवा वि. स. खांडेकर म्हणा, लहान लहान निबंध लिहितात. म्हणून चिपळूणकर, आगरकर, टिळक हे निबंधकार, आणि फडके, खांडेकर, हे लघुनिबंध–कार असं मुळीच म्हणता येणार नाही. याचा उत्तम पुरावा म्हणजे फडके किंवा खांडेकर यांनी वाङमयीन किंवा सामाजिक विषयांवरही पुष्कळ मोठमोठे निबंध किंवा लेख लिहिले आहेत आणि अर्थात चांगले चांगले लघुनिबंधही त्यांनी लिहि-लेच आहेत. म्हणजे टिळक-आगरकरांप्रमाणे ते निबंधही लिहितात आणि त्याशिवाय लघुनिबंधही लिहितात. त्यांना विशिष्ट काही सांगायचं झालं की ते निबंध लिहि-तात, आणि दुसऱ्या प्रकारचं विशिष्ट काही सांगायचं असलं की ते लघुनिबंध

लिहितात, म्हणजेच ज्याप्रमाणे केवळ लांबीने मोठा म्हणून एखादा लेख निबंध नव्हे, किंवा लांबीने छोटा म्हणून लघुनिबंध नव्हे, त्याप्रमाणेच केवळ मोठा निबंध लहान केला की तो लघुनिबंध होत नाही. तर ज्याअर्थी उत्तम लघुनिबंध लिहिणारेही काही विशिष्ट सांगायचं असलं की दोनतीन पानांचा काय किंवा वीस-पंचवीस पानांचा काय निबंधच लिहितात; आणि दुसरे काही विशिष्ट सांगायचं असलं की तीन–चार पानांचा काय किंवा सात–आठ पानांचा काय लघुनिबंध लिहितात, त्याअर्थी निबंध लहान झाला की तो लघुनिबंध होत नाही, तर निबंधाची जात वेगळी आणि लघुनिबंधाची जात वेगळी. हंस पक्षी लहान असला की तो बुलबुल होत नाही, किंवा बुलबुल पुष्ट करून, फुगवून त्याचा हंस होणार नाही. लहानमोठे असले तरी हंस ते हंसच आणि बुलबुल ते बुलबुलच. एवढं मात्र खरं की सर्वसामान्यपणे निबंध लघुनिबंधाच्या मानानं मोठा असतो, आणि लघुनिबंध-निबधाच्या मानानं बहुधा लहान असतो.

निबंध की लघुनिबंध ठरविताना लांबीरुंदीचा, लघुत्वाचा किंवा दीर्घत्वाचा प्रश्न महत्त्वाचा नसून एकाची जात वेगळी तर दुसऱ्याची वेगळी, असं मी म्हणतो, तेव्हा मला काय म्हणायचं आहे ते स्पष्ट केले पाहिजे. लघुनिबंधाला ललित निबंध असं म्हणतात, तेच बरोबर आहे. निबंध हा शास्त्रीय प्रतिपादनात्मक, प्रचारात्मक अशा म्हणजे ललितेतर किंवा शास्त्रीय वाङमयाचा प्रकार आहे, तर लघुनिबंध हा लघुकथा, कविता, कादंबरी, नाटक वगैरेंप्रमाणे ललित वाङमयाचा प्रकार आहे. ललितेतर किंवा शास्त्रीय वाङमय आपल्याला काही ज्ञान देतं, आपल्यापुढं काही विचार मांडतं, काही साधकबाधक मुद्यांचं प्रतिपादन करतं, तर ललित वाङमय, कथा म्हणा किंवा कविता म्हणा जीवनातले काही अनुभव साकार करून आपणाला देतं. ललितेतर वाङ्मय वाचल्यानंतर काही ज्ञान मिळाल्याचा आपणाला आनंद होतो, तर ललित वाङमय वाचल्याने काही अनुभव मिळाल्याचा आनंद होतो. एक उदाहरण दिलं म्हणजे माझं म्हणणं स्पष्ट होईल. झाडं, वेली, वृक्ष, यांची उत्तम माहिती असलेल्या एखाद्या शास्त्रज्ञ लेखकानं औदुंबराच्या झाडाबद्दल एखादा लेख लिहिला तर त्या झाडाबद्दल, त्याच्या फळाबद्दल, त्याच्या पानाबद्दल, आपणाला चांगली माहिती मिळाली म्हणून तो लेख वाचल्यावर आपणाला आनंद होईल. हा ललितेतर वाङमय वाचल्यामुळे झालेला आनंद. 'औन्दुबर' नावाची बालकवींची एक अतिशय सुन्दर कविता वाचल्यानंतर औदुंबराच्या झाडाविषयी काही माहिती मिळत नाही, पण 'पाय सोडुनी जळांत बसला असला औदुंबर' असं बालकवी म्हणतात, तेव्हा त्यांनी आपल्या कवितेत जो उभा केला आहे, तो औदुंबर सारखा मनात तरळत राहतो, आणि काही तरी नव्या अनुभवाचा आनंद मनाला सारख्या गुदगुल्या करू लागतो. सामान्य माणूस म्हणजे काय, असामान्य माणूस म्हणजे काय, यांची गंभीर चर्चा एखाद्या निबंधात करता येईल, आणि ती चर्चा आपल्याला पुष्कळसं उपयुक्त ज्ञानही देऊ शकेल; पण अशी काही गंभीर चर्चा न करता आपल्या

काही बुद्धिमान मित्रांचे अनुभव, आपणाला अधून मधून भेटणाऱ्या सामान्य माणसांच्या काही गोष्टी हसत खेळत, गप्पागोष्टीचं वातावरण निर्माण करून लघुनिबंधकार सांगेल आणि नकळत आपणाला नेहमी अनुभवाला येणाऱ्या काही गोष्टीत आपणाला एकदम नवा अर्थ दिसू लागेल.

ललित वाङमयाचा आणखी एक विशेष, लघुनिबंध हा ललित वाङमयाचाच एक प्रकार असल्यामुळे त्यात प्रामुख्याने दिसतो. तो विशेष म्हणजे, या प्रकारच्या वाङ्मयात लेखकाच्या व्यक्तित्वाला त्या वाङ्मयाच्या विषयाइतकंच किंबहुना त्यापेक्षा अधिकच महत्त्व असतं. विषय नेहमीचाच असेल किंवा विषय अगदीच क्षुल्लक असेल, तरी अनुभवाचं नावीन्य वाटतं ते विशिष्ट लकबेनं केलेल्या मांडणीमुळं· प्रत्येक ललित लेखकाचं व्यक्तित्व वेगळं असल्यामुळेच मांडणीची ही लकब विशिष्ट आणि नाविन्यपूर्ण होते. दारूच्या व्यसनापासून अमुक तोटे होतात हे एखादा ललितेतर, शास्त्रीय लिखाण लिहिणारा लेखक परिणामकारक रीतीने आपल्या लेखात मांडील. ते मुद्दे आपणाला पटतील, आणि बरंही वाटेल. दुसरा एखादा शास्त्रीय लेखक त्याच विषयावर आणखी काही मुद्दे मांडील. तेही मुद्दे आपणाला बरे वाटतील; पण पहिल्या लेखकाहून दुसऱ्या लेखकाचं व्यक्तित्व कसं वेगळं आहे किंवा वेगळं आहेच की काय, याकडे आपलं फारसं लक्ष राहणार नाही. मुद्दे समजले, काम झालं असं आपणाला वाटेल. मद्यपानाच्या विषयावर प्रसिद्ध नाटककार खाडिलकर यांचे 'विद्याहरण' हे सुंदर नाटक आहे, आणि त्याच विषयावर, दुसरे प्रसिद्ध नाटककार गडकरी यांचंही 'एकच प्याला' हे सुंदर नाटक आहे. एकाचं व्यक्तित्व दुसऱ्याहून अजिबात वेगळं असल्यामुळं दोन्ही नाटकं आपणाला अधाशीपणानं वाचावीशी किंवा पाहावीशी वाटतात, आणि प्रत्येक नाटक एक वेगळाच आनंद देतं. याचं कारण खाडिलकरांचं व्यक्तित्व वेगळं तर गडकऱ्यांचं वेगळंच.

लघुनिबंध हा एक ललित वाङ्मयाचा प्रकार आहे, आणि तो ललितेतर किंवा शास्त्रीय निबंधाहून वेगळा आहे, असं मी म्हटलं, यासंबंधी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. हे वाङ्मयप्रकार एकमेकांहून वेगळे आहेत हे खरं आहे, पण म्हणून ललित निबंधात चर्चात्मक किंवा प्रतिपादनात्मक असं काही ललितेतर कधीच कुठं आढळणार नाही, असं मात्र मुळीच नाही. काही लघुनिबंधात थोडाबहुत असा भाग सहज काढून दाखविता येईल. त्याचप्रमाणे ललितेतर निबंधात अगदीच लालित्य किंवा लेखकाचं वेगळं व्यक्तित्व नसतं असं म्हणता येणार नाही. अनेक चांगल्या निबंधांतून लेखकाच्या विशिष्ट व्यक्तित्वाचा ठसा असलेले लालित्यपूर्ण असे काही भाग सहज काढून दाखविता येतील. एकात अनुभवाला आणि लालित्याला अधिक महत्त्व असतं, तर एकात विचाराला आणि प्रतिपादनाला अधिक महत्त्व असतं इतकंच. असा असतो निबंध आणि असा असतो लघुनिबंध !

## गणूकाका

माझ्या अनेक लघुनिबंधांतून वावरणारे 'गणूकाका' खरोखरच अस्तित्वात आहेत, की ते एक काल्पनिक व्यक्ती आहेत, की माझ्या परिचयातल्या दोनतीन व्यक्तींच्या स्वभावविशेषांचे मिश्रण करून मी एक स्वभावचित्र निर्माण केले आहे असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. पहिल्यांदा हे स्पष्ट सांगून टाकले पाहिजे की, कोणत्याही एका खऱ्या व्यक्तीचे हे चित्र नाही. माझ्या गणूकाकांवर बेहद्द खूष झालेल्या एका शाळेतल्या मुलाने काही वर्षापूर्वी मला एक पत्र लिहिले होते—'तुमचे गणूकाका पाहाण्याची मला फार इच्छा आहे. तरी ते कुठं आणि केव्हा भेटतील ते कळवावे.' त्या बिचाऱ्याची मला निराशा करावी लागली. नात्याचे किंवा मानलेले असे कुणीही काका मला नाहीत. मात्र गणूकाकांच्या स्वभावातले काही विशेष असलेल्या तीनचार व्यक्ती लहानपणापासून माझ्या चांगल्या माहितीच्या आहेत. त्यांच्यामध्ये जुन्याचा अतोनात अभिमान असलेल्या एकदोन व्यक्ती आहेत, पण त्यांना वाद घालण्याची आवड नाही. एका व्यक्तीला वितंडवाद घालण्याची हौस आहे. स्वतःच्या मतांचा अभिमान, वितंडवाद करण्याची हौस असूनही, मतापेक्षा माणुसकीला अधिक किंमत देणारी अशीही एक व्यक्ती मला माहीत आहे. ज्यांची मतं मला कधीच पटणं शक्य नाही, पण ज्यांचा स्वभाव मला अतिशय आवडतो, अशा तीनचार व्यक्तींच्या स्वभावविशेषांच्या मिश्रणातून गणूकाका निर्माण झाले आहेत.

मात्र याचा अर्थ असा कुणी समजू नये की, लघुनिबंध लिहावयाला सुरुवात करण्यापूर्वीच अशी एक व्यक्ती निर्माण करायची असं मी ठरवलं. तिच्या स्वभावविशेषांची, तिच्या रंगरूपाची टांचणं करून तिची रूपरेषा तयार केली आणि मग लघुनिबंध लिहायला बसलो. असं मुळीच झालं नाही. एखादा लघुनिबंध लिहिताना जुन्या मतांचं नुसतं रुक्ष वर्णन करून ती खोडून काढण्यापेक्षा एखाद्या जुन्याच्या अभिमानी माणसाच्या तोंडी ती घालावी आणि मग ती उत्तरं देऊन खोडावी, असं मला वाटलं असेल, आणि गणूकाकांना निबंधांत आणून ती मतं मी मांडली असतील. असेल, असतील असं मी म्हणतो कारण खरोखरच, कुठल्या निबंधात आणि केव्हा गणूकाका पहिल्यांदा अवतीर्ण झाले ते मला आता आठवत नाही. एकदा आल्यावर मात्र मला ते अतिशय आवडू लागले आणि मग निबंध लिहिताना त्यांच्याशिवाय मला चैनच पडेना. गणूकाकांमुळे निबंधात चमकदार प्रसंग आणि चुरचुरीत संवाद आले आणि निबंधातल्या तत्त्वविवेचनाचा रुक्षपणा नाहीसा झाला, एवढे मात्र खरे. 'पिकलीं पानं' या माझ्या पहिल्याच लघुनिबंधसंग्रहातले बरेचसे निबंध चौदापंधरा वर्षापूर्वी मी लिहिले, तेव्हा आताच्यापेक्षा प्रत्येक बाबतीत माझी मतं हिरवट पण भडक आणि ठाम होती. आपल्याइतकीच भडक आणि ठाम मतं असलेला प्रतिपक्षी असला की दोघांची चांगलीच जुंपते आणि पाहाणारांची करमणूक होते. दोन्ही बाजूंना भरपूर खेळाडूपणा असला की खेळणारांना आणि पाहाणारांनाही

खूप मजा वाटते. गणूकाकांच्या रूपाने मला असा छानदार प्रतिपक्षी मिळावा आणि वय, मतं, सवयी, कपडे सर्व काही दोघांची दोन टोकांना असून आमची चांगलीच गट्टी जमली.

गणूकाकांची आणि माझी इतकी गट्टी झाली की, अनेक निबंधांत मला विचारल्याशिवाय गणूकाका बेलाशक शिरू लागले. त्यांच्या आयुष्यातल्या अनेक गोष्टी आणि त्यांच्या स्वभावातल्या छटान् छटा लहानपणापासून एकत्र वाढलेल्या एखाद्या जिवाभावाच्या मित्राप्रमाणे माझ्या माहितीच्या झाल्या. माझी स्वतःची मतंसुद्धा गणूकाकांबरोबर बोलताबोलताच माझी मला अधिक स्पष्ट दिसू लागली. आपली काही मतं बनलेली असतात; पण दुसऱ्यानं त्यांच्यावर हल्ला केला की तो परतवताना आपणाला आपल्याच मताच्या पुष्कळ नवीन बाजू दिसूत येतात ! आपण भौतिकवादी असून वर्तमानपत्रातलं भविष्य आपणाला वाचावंसं वाटतं याबद्दल माझं मला कसंसं वाटे, पण गणूकाकांनी माझ्या या सवयीवर हल्ला केल्याबरोबर त्यात कसंसंच वाटायचं काही कारण नाही, हे गणूकाकांबरोबर वाद करता करता माझ्या ध्यानात आलं. 'आम्हां जुन्या लोकांना हसता पण तुम्ही मात्र तेच करता' असं म्हणून माझ्या प्रामाणिकपणाबद्दल गणूकाकांनी संशय घेतल्याबरोबर मला माझ्या त्या वागण्याचं रहस्य कळलं. ज्योतिष वाचून, आपण काय करायचं नाही हे ठरविणं वाईट असेल. पण गंमत म्हणून ज्योतिषात तथ्य आहे की नाही हे पाहाण्यात चूक नाही. आपला ज्यावर विश्वास नाही, ते आहे तरी काय हे समजावूनसुद्धा घ्यायचं नाही, ही काही भौतिकवादी किंवा शास्त्रीय दृष्टी नव्हे. हा केवळ हटवाद झाला. ही गोष्ट गणूकाकांशी वाद करताना जशी मांडता आली तशी गणूकाका नसते तर मांडता आली नसती.

मतापेक्षा माणुसकीला अधिक किंमत आहे असं मला नेहमी वाटतं. असं आहे म्हणूनच विविध रंगरूपं आणि चित्रविचित्र मतं असलेली माणसं मिळून आपली मानवजात बनलेली असली, तरी ती अजून टिकून आहे. माझ्यासारखीच मतं असलेल्या काही लोकांपेक्षाही प्रत्येक बाबतीत माझ्या विरुद्ध असलेले गणूकाका मला कधीच विसरत नाहीत. गणूकाकांचे हे वैशिष्टय दाखविणारे दोन प्रसंग पुष्कळांना आठवत असतील. काकांकडून पैसे उसने घेऊन ते परत न करणाऱ्या मित्रावर ते एकदा खूप रागावले नी 'आता येऊ द्या त्याला पैशाशिवाय, मग पहिल्यांदा मुळी दोन कानशिलातच वाजवतो, मग पुढच्या गोष्टी' अशी त्यांनी माझ्यासमोर प्रतिज्ञा केली. तेवढ्यात तो मित्र आला. त्यानं आपल्या बायकोच्या भयंकर आजाराचं रडगा' काकांपुढं गाऊन दाखविलं. त्याबरोबर 'अरे वैतागतोस काय ? काही तरी उपाय केलाच पाहिजे, वेडचा !' असं ते म्हणाले. पाच रुपयांची त्या मित्राला निकड होती. काकांजवळ त्यावेळी तेवढे पैसे नव्हते; पण ताबडतोब ते माझ्याकडे वळले आणि माझ्याकडून पाच रुपये उसने घेऊन त्यांनी त्या मित्राला देऊन टाकले. ते पैसे घेऊन तो निघून गेला. मी जेव्हा त्यांना म्हटलं, 'काका,

तुम्ही त्याच्या कानशिलात वाजवणार होता ना ?' तेव्हा माझ्यावर उलटून ते म्हणाले, 'अरे बाळा, वेळवखत बघून रागावलं पाहिजे. दारावर आलेल्या माणसाला काय मारून घालवून देतात ?' मतापेक्षा माणुसकीला अधिक किंमत आहे, मी म्हणतो ते हेच. पांडित्य, विद्वत्ता, कला ही कुठंही दिसली की तो मोठा माणूस आहे असं पुष्कळांना वाटतं. पण हे सर्व अंगी असूनही माणुसकी नसेल तर त्याच्या मोठेपणाचा काही उपयोग नाही. यापैकी काही जवळ नसलेल्या, सामान्य बुद्धिमत्ता, सामान्य कल्पना असलेल्या सामान्य माणसात केव्हा केव्हा असामान्य माणुसकी दिसून येते. किंबहुना, सामान्य माणसात ती जितकी दिसते तितकी तथाकथित मोठ्या माणसांतही ती पुष्कळ वेळा नसते. गणूकाकाही अशाच सामान्य व्यक्तींपैकी एक आहे.

संस्कृतीच्या, शिष्टाचाराच्या गोष्टी सांगणारे खूप असतात, पण त्यांच्या स्वार्थाला जरा कुठं धक्का लागला की त्यांचे सर्व 'शिष्टाचार' नि संस्कृती ढासळून पडते. याच्या उलट गणूकाकांसारख्या साध्या, सामान्य बुद्धीच्या माणसांना हे शब्द-सुद्धा माहीत नसतात, पण त्यांच्या कृतीत असामान्य सुसंस्कृतपणा आणि शिष्टाचार दिसून येतो. गणूकाकांच्या या स्वभावविशेषाचं एक उदाहरण सुपरिचित आहे. गणूकाकांना मी एक काचेची सुंदर फुलदाणी दिली होती. एकदा मी, काका आणि दुसरा एक गृहस्थ काकांच्या खोलीत काहीतरी गप्पा मारीत बसलो होतो. तो गृहस्थ हातवारे करीत काहीतरी सांगत होता. त्याचा चुकून त्या फुलदाणीला हात लागला आणि ती खाली पडून तिचे तुकडे तुकडे झाले. थोडाच वेळ का होईना, पण ती सुंदर फुलदाणी फोडल्याबद्दल मला त्या गृहस्थाचा राग आला. मी काही बोललो नाही; पण माझ्या चेहऱ्यावर नापसंतीच्या रेषा खात्रीनं उमटून गेल्या असणार ! काहीच झालं नाही असं मोठ्या प्रयासानं मी दाखवलं. त्या गृहस्थाचं माझ्या चेहऱ्याकडे लक्ष गेलं असतं तर त्याला कससंच वाटलं असतं. त्यानं पाहिलं नाही ही गोष्ट वेगळी; पण त्याच वेळची गणूकाकांची वर्तणूक पाहा. त्या गृहस्थाच्या तोंडून काही दिलगिरीचे शब्द बाहेर पडायच्या आतच काका म्हणाले, 'अहो, त्यात काही नाही. त्या शेजारच्या बंडूनं कालच तिचे दोन तुकडे केले होते. टाकून देण्याऐवजी मी आपले ते जुळवून ठेवले होते. तुम्ही उगाच निमित्त झालात एवढंच. ते तुकडे मी टाकायला पाहिजे होते !'

त्या गृहस्थाच्या मनावरचं ओझं एकदम उतरलेलं दिसलं. तो निघून गेल्यावर मी काकांना म्हटलं, 'ते फुटके तुकडे उगाच कशाला जुळवून ठेवले होतेत, काका?' 'अरे, कुठे फुटले होते ते ? चांगली धड होती ती फुलदाणी—' काका म्हणाले. 'म्हणजे ?' मी विचारले. काका सांगू लागले, अरे, एकदा फुटली ती पुन्हा का सांधणार होती ? त्या बिचाऱ्याला आणखी वाईट वाटायला कशाला लावायचं ?' मी थक्क झालो. थोर सुसंस्कृतपणा म्हणतात तो हा !

गणूकाकांचं मन जितकं मोठं आहे तितकीच त्यांची मतं अगदीच सामान्य आणि पारंपरिक आहेत. सर्व आधुनिक सुधारणा त्याज्य आहेत असं त्यांचं ठाम मत आहे. ते म्हणतात, "सर्व प्रगतीचा, सुधारणेचा हेतू काय ? माणसाचं सुख हाच ना ? सुधारणेबरोबर माणसांची दुःखंही शेकडो पटीनं वाढली आहेत ! पूर्वी आगगाड्या आणि मोटारी नव्हत्या; पण त्यामुळे माणूस अधिक सुखी होता. मोटारींनी हां हां म्हणता इकडून तिकडे जाता येतं खरं; पण जगात शेकडो माणसं दररोज मोटारीखाली चेंगरून मरतात. पूर्वीची माणसं कंदमुळांवर भूक भागवीत होती आणि वल्कलांनी अब्रू झाकीत होती, हे खरं आहे; पण चहा आणि कॉफी यथेच्छ पिऊन नंतर अमक्याचं फ्रुट सॉल्ट नि तमक्याच्या लिव्हर पिल्स घेत, डॉक्टरांचे उंबरठे झिजविणाऱ्या अलीकडच्या माणसांपेक्षा सुखी होती खास !"

सुधारणेपासून मिळणाऱ्या सुखाचा विचारही करायला गणूकाका तयार नाहीत; दुःखे मात्र त्यांना दिसतात. कथा, कादंबऱ्या वगैरे ललित वाङ्मयप्रकारांनी समाजाचा काही फायदा होणं शक्य नाही, ही केवळ करमणुकीची साधने आहेत, असं गणूकाकांना वाटतं. 'तुमच्या लघुकथा-कादंबऱ्यांनी, माणसांत काय किंवा समाजात काय, काही सुधारणा होणं शक्य नाही—' ते म्हणतात ! पुर्नविवाहावरच्या कादंबऱ्या वाचून कितीसे पुर्नविवाह झाले ? दारूबद्दलची नाटके पाहून कितीशा लोकांनी दारू प्यायची सोडली ? कादंबरीकारांना आणि नाटककारांना ते खडसावून विचारतात, 'दारूचे काय भयंकर परिणाम होतात किंवा पुर्नविवाहामुळे समाजाचा किती फायदा होण्याचा संभव आहे हे लोकांना सरळ सरळ सांगणे शक्य असताना तुम्ही लोक तेच सांगण्याकरिता नाटकं लिहून ती रंगभूमीवर दाखविण्याच्या आणि कादंबऱ्या लिहिण्याच्या नि प्रसिद्ध करण्याच्या आडमार्गात का शिरता ?' मानवजात, मानवता वगैरे मोठमोठे शब्द गणूकाकांना मुळीच मंजूर नाहीत. त्यांची दृष्टी रोखठोक आहे. मानवजातीच्या हिताकरिता अमुक अमुक केले पाहिजे असे कुणी म्हटले की ते ताडकन विचारतील, तुमची ही मानवजात कुठून आली ? ब्राह्मणजात, प्रभुजात, माळीजात, साळीजात वगैरे जाती आम्हांला माहीत आहेत, पण ही मानवजात कुठली बुवा ? स्वराज्याच्याही त्यांच्या कल्पना जगावेगळाच होत्या. अरे, इकडे चळवळी करून काय होणार ? तिकडे विलायतेला जाऊन साहेबाकडून स्वराज्य आणलं पाहिजे ! स्वराज्य म्हणजे काहीतरी एक गाठोडे आहे अशी त्यांची कल्पना असावी ! गणूकाका स्वतः काळे असल्यामुळे गोऱ्या माणसांपेक्षा काळी माणसे कशी चांगली असतात, ही गोष्ट ते बेमालूम सिद्ध करून दाखवितात. काळी माणसे गोऱ्या माणसांपेक्षा चांगली कशी ? असं कुणी विचारल्यास ते ताडकन उत्तर देतील, 'अरे, गोऱ्या लोकांपेक्षा आम्ही लोक अधिक स्वच्छ असतो. गोऱ्या लोकांना वाटतं की जराशी अस्वच्छता राहिली तर काय मोठंसं होणार आहे ? गोरेपणावर सर्व काही नेऊ आपण चालवून ! पण आमचं काळ्या लोकाचं तसं नसतं. थोड्याशा अस्वच्छतेमुळेसुद्धा आपण फार

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम
अनुक्रम .................... दि: ....................
वर्ग .................... नों. दि. ....................
93660

# १.
# माझा हिरवा मित्र

नुकत्याच दिवंगत झालेल्या संत–वाङ्मयाच्या एका श्रेष्ठ उपासकासंबंधी एक गोष्ट मी अलीकडेच वाचली. त्यांना मांजरे फार आवडत आणि दहा-वीस मांजरे त्यांच्या घरात नेहमी असत. या मांजरांवर त्यांचे अतिशय प्रेम असे आणि पोटच्या पोरांसारखी त्यांची ते काळजी घेत. या मांजरांपैकी एका बोक्याने एकदा त्यांना राग येईल असा काही तरी अपराध केला. तेव्हा संतापून त्या बोक्याला मारण्याकरिता त्यांनी कोपऱ्यातली काठी घेतली आणि त्याला मारण्याकरिता उगारली. त्याच्यावर ते काठीचा प्रहार करणार इतक्यात 'नको !' 'नको !' असे तो बोका ओरडला. बोक्याच्या तोंडातून माणसासारखे 'नको' 'नको' असे शब्द बाहेर पडलेले ऐकताच ते चकित झाले. त्यांचा राग कुठल्या कुठे पळाला, आणि त्या बोक्याला त्यांनी पोटाशी धरले.

माझ्याप्रमाणेच माझ्या काही मित्रांनीही त्या साहित्यिकासंबंधीची ही आठवण वाचली, तेव्हा त्यांच्यापैकी बरेचजण या गोष्टीची थट्टा करून हसू लागले. काही म्हणाले, 'संतांच्या आयुष्यांत जसे चमत्कार झालेले आपण ऐकतो तसेच संत–वाङ्मयाच्या उपासकाच्याही आयुष्यात होतात म्हणायचे !'

मला ही गोष्ट तितकीशी थट्टा करण्यासारखी वाटत नाही. त्याचे एक कारण असे की या वृद्ध साहित्यिकाचा आणि माझा चांगला स्नेह होता, आणि त्याचे मांजरांचे प्रेम मी प्रत्यक्ष पाहिले होते. बोका आपल्याशी बोलला असे काही तरी सांगून बुवाबाजी करणारे ते गृहस्थ नव्हते, हेही मला माहीत आहे. अतिशय फटकळ आणि अतिशय सरळ स्वभावाचे ते होते. यावरून बोका बोललाच असेल याबद्दल

माझी खात्री आहे, असे मी मुळीच म्हणत नाही. मला असे वाटते, की त्या मांजरावर त्यांचे अतिशय प्रेम होते. त्यामुळे 'नको' 'होय' म्हणणाऱ्या लहान अर्भकासारखाच त्यांना तो वाटत होता. काठी उगारल्याबरोबर त्या बोक्याने दीनवाणा चेहरा करून काही तरी ओकारान्त आवाज काढला असेल, आणि त्याच क्षणी या प्रेमळ गृहस्थाचे मनही 'नको' म्हणत असेल. तो मनातल्या विचाराचा आवाज बोक्याच्या तोंडातून निघाला असे त्यांना प्रामाणिकपणे वाटले असल्यास नवल नाही.

घरात पाळलेले पशू किंवा पक्षी काही दिवसांनी घरातल्या माणसांसारखेच होतात. ती माणसे नाहीत हे आपण जवळ जवळ विसरूनच जातो. फार काय, माणसांपेक्षाही ते आपल्याला अधिक जवळचे वाटतात; कारण माणसांतली माणुसकी त्यांच्यात भरपूर असते आणि माणसांचे हेवेदावे, दुष्टावे, आप्पलपोटेपणा मात्र त्यांच्यात मुळीच नसतो! एका लोकप्रिय आंग्ल लेखिकेची एक गोष्ट मला आठवते. तिला खूप पैसा मिळाला होता, प्रसिद्धिही खूप मिळाली होती; पण तिने लग्न केले नव्हते. कुणी तरी तिला विचारले, 'का हो, तुम्ही लग्न का करीत नाही?'

तेव्हा ती म्हणाली, 'लग्न कशाला करायचं? माझ्याकडे एक पोपट आहे आणि एक मांजर आहे. मांजर बाहेर गेलं की भरपूर उशिरा घरी परत येतं आणि पोपट दिवसभर कानाशी कटकट करीत असतो. झालं तर! नवरा हवा कशाला?'

गंमत म्हणून पोपटाबद्दल किंवा मांजराबद्दल तिने असे हेटाळणीचे उद्गार काढले हे ठीक आहे; पण मी मात्र त्यांच्याबद्दल असे अवमानाचे उद्गार कधीच काढणार नाही; पोपटाबद्दल तर नाहीच नाही. पोपट म्हटले की निर्मळ आठवणींनी आणि कृतज्ञतेने माझे अंतःकरण भरून येते. मी अगदी लहान असताना एक पोपटच माझा सदा आनंदी आणि कधीही तक्रार न करणारा असा खेळगडी होता. आम्हा दोघांमध्ये वडीलकीचा मान त्याचा होता; आणि पुष्कळ वेळा तो आपली वडीलकी माझ्यावर गाजवीत असे. माझ्या जन्माच्या आधी दोन वर्षे तो पोपट माझ्या वडिलांनी घरात आणला होता. संध्याकाळी कामावरून परत येत असता कोठे तरी झाडाखाली पडलेले, केवळ मांसाचा लहानसा गोळा असलेले पोपटाचे इवलेसे पिल्लू त्यांना सापडले. त्यांनी ते उचलून घरी आणले. माझ्या आईने त्या पिल्लाची अतिशय काळजी घेऊन त्याला वाढविले. त्या पिल्लाला काही खाता येत नव्हते. दुधात कापूस बुडवून पिल्लाच्या चोचीत दिवसांतून पाच–सहा वेळा आपण काही थेंब पिळीत असू असे आई सांगते. पुढे ते पिल्लू चांगले गुबगुबीत होऊन इकडून तिकडे उड्या मारू लागले. कुणी तरी आईला सांगितले, अक्कलकाढ्याची मुळी उगाळून जर काही दिवस रोज या पिल्लाच्या जिभेवर बोटाने घासली तर त्याची जीभ पातळ होईल, आणि हा पोपट फक्कड बोलू लागेल. आईने कित्येक दिवस तसे केले. माझ्या जन्मानंतर दोन वर्षांनी माझे वडील वारले. हा पोपट आणि मी

आईच्या बरोबर माझ्या मामांच्या घरी राहायला गेलो. तिथेच आम्ही दोघे लहानाचे मोठे झालो. मी पंधरा–सोळा वर्षाचा होईपर्यंत हा पोपट जिवंत होता.

इतरांच्या तोंडातले शब्द कुणी निर्बुद्धपणे पुन्हा पुन्हा उच्चारू लागला, म्हणजे लोक त्याला 'पोपटपंची करू नको,' असे म्हणतात. दुसऱ्यांच्या शब्दांचा निर्बुद्ध पुनरुच्चार पोपट करतात असे लोकांना वाटते. मला हे बिलकुल मान्य नाही. माझ्या मित्राच्या सोळा वर्षांच्या माझ्या अनुभवावरून मी सांगतो की हे मुळीच खरे नाही. त्याच्या दोन–तीनच गोष्टी इथे सांगतो; आणि मग लोकांनी काय म्हणायचे असेल ते म्हणावे. गिरगावातल्या एका चाळीत माझे मामा राहात असत. तळमजल्यावर आमची खोली होती, आणि खोलीच्या दारासमोर बाहेरच्या गॅलरीत पोपटाचा पिंजरा टांगलेला असे. रात्री त्याचा पिंजरा आम्ही आत आणून ठेवीत असू. एका खोलीत आडवी–उभी अंथरुणे घालून मामा, आजी वगैरे आम्ही तीन–चार माणसे गर्दी करून झोपलेली असू. त्याच गर्दीत कोपऱ्यातल्या एका खुर्चीवर त्याचा पिंजरा ठेवलेला असे. दिवे मालवून बिछान्यावर पडल्या पडल्या आम्ही काही गोष्टी बोलायला सुरुवात केली की आपणही त्या गोष्टीत भाग घेतो आहोत असे दाखविण्याकरिता की काय, पोपट मधूनमधून 'हूं हूं' करीत असे! केव्हा केव्हा आजी चिडून त्याच्यावर ओरडायची, 'काय मेला फाजील तरी! गप्प बस बघू!' थोडा वेळ तो गप्प राहायचा. काही तरी गमतीची गोष्ट चालली असता आम्ही हसू लागलो की अगदी माणसासारखा 'खू खू खू खू' आवाज करून तो आमच्या हसण्यात सामील व्हायचा!

माझ्यावर तो वडीलकी कसा गाजवायचा ते पाहा! आमच्या चाळीच्या बाहेरच्या बाजूला एक चहाचे दुकान होते. आमच्या शेजारच्या एका खोलीत दुकानाचे नोकर चाकर उठत बसत. एकीत साखर, पीठ वगैरेंचे कोठार होते आणि जिन्याजवळच्या खोलीत भटारखाना होता. गॅलरीत त्यामुळे सारखी वर्दळ असे. मी चार–पाच वर्षांचा असताना घरातल्या आणि गॅलरीतल्या लोकांचा डोळा चुकवून गाडी घोडे बघायला एकदम रस्त्यावर धूम ठोकायचा. मग घरातले कुणीतरी माझ्यामागे धावायचे, आणि बकोटीला धरून फरपटत घरी ओढीत आणायचे. गॅलरीतच आजी किंवा मामा माझ्या पाठीवर रपाटे देत असता पोपट शांतपणे मान वाकडी करून एका डोळ्याने हे सर्व पाहात राहायचा. हा रस्त्यावर पळतो हे काही बरोबर नाही हे त्याने चांगलेच ओळखले होते. गॅलरीत कुणी नाही, घरातली माणसे दुपारी स्वस्थ झोपली आहेत असे पाहून एखादे दिवशी मी जर रस्त्याकड धावलो तर पंखांचा फडफडाट करून आणि जीव जातो की राहतो अशा तऱ्हेने केकाटून तो घरच काय पण सारी चाळ जागी करायचा! मग कुणीतरी मला धरून आणीत आणि दुपारची झोप मोडल्यामुळे अधिकच चिडून अधिकच धपाटे देत. मारझोड संपून सर्व काही स्थिरस्थावर झाले की मुसमुसत, डोळे पुशीत, माझ्यावर वडीलकी गाजवणाऱ्या त्या पोपटाच्या पिंजऱ्याकडे मी जात असे, आणि

पिंजऱ्यातून बाहेर आलेले त्याचे शेपूट दात–ओठ खात जोरजोराने ओढीत असे. दु:खाने तो ओरडायचा, पण माझ्या बोटाचा त्याने कधीच चावा घेतला नाही. त्याला चावता येत नव्हते असे मुळीच नाही. गॅलरीतून जाणाऱ्या–येणाऱ्याने कुणी शेपूट ओढून त्याला त्रास दिला तर तो चांगला कडकडून चावत असे; पण हा लहान मुलगा आहे, आपला मित्र आहे, आणि विशेष म्हणजे आपल्यामुळे त्याला मार मिळाला आहे; तेव्हा आपण त्याला चावता कामा नये एवढे त्याला समजत होते.

माझा हा हिरवा मित्र जितका समजूतदार तितकाच मिस्किलही होता, चहावाल्यांच्या भटारखान्यात दादाभट नावाचा एक धिप्पाड आचारी होता. उंच गोरापान, घाऱ्या डोळ्यांचा, कोकणस्थ ब्राह्मण होता तो. रोज दुपारी शंकर-पाळ्यांचे पीठ साखर घालून तो तिंबून ठेवीत असे. पोपटाला ते गोड पीठ फार आवडायचे. दादाभटाला चिडवण्याकरिता चाळीतले लोक पुष्कळ वेळा त्याला ‘ जाडा भट ! ’ म्हणून हाक मारीत. दादाभटाचे दोन नियम होते. दुपारी पीठ तिंबून झाले की त्याचा एक लहानसा गोळा आमच्या पोपटाच्या चोचीत आणून द्यायचा, रात्री सर्व काम संपले की चाळीच्या जिन्याखाली काळोखात बसून डोळे तांबडे लाल होईपर्यंत गांजा ओढायचा ! पैकी पहिल्या नियमाशी सध्या आपल्याला कर्तव्य आहे. पिठाचा गोळा घेऊन दादाभट येतो आहे हे पाहिल्याबरोबर दांडीवरून पिंजऱ्याच्या तळपत्र्यावर उडी मारून मोठ्या ऐटीत मान हालवीत तुरु तुरु इकडे तिकडे फिरत पोपट दादाभटाचे स्वागत करायचा. गोळा चोचीत देऊन दादाभटाची पाठ फिरली रे फिरली, की दांडीवर उडी मारून गोळा एका पायात धरायचा आणि मान वर करून दादाभटाला ‘ ए जाडा भट ! ’ ‘ ए जाडा भट ! ’ म्हणून तो हाक मारायचा !

दादाभट मागे वळून ‘ फोकलीच्या ! पुन्हा तुला कध्धी पीठ देणार नाही ! ’ अशी शिवी हासडून निघून जायचा; पण दुसऱ्या दिवशी नियमाप्रमाणे दादाभट यायचाच.

कार्तिकी एकादशीच्या दिवशी आमच्या पोपटाने इहलोक सोडला. आजी म्हणाली, ‘ अरे, तो कुणी तरी पुण्यशील साधुपुरुष अठरा वर्षे आपल्या घरात राहून गेला ! ’

कार्तिकी एकादशीला त्याने देह ठेवला एवढेच आजीच्या त्या उद्‌गारांचे कारण नव्हते. त्या अठरा वर्षांत म्हणजे उभ्या आयुष्यात त्याने कधीही शिजवलेल्या अन्नाला स्पर्श केला नाही. पुष्कळांच्या घरात पोपटाला भात कालवून घातलेला मी पाहिला आहे. काही पोपट भाकरी किंवा भात इतर फळांबरोबर खातातही. आमच्या पोपटाला भात किंवा भाकरी देण्याचा जेव्हा जेव्हा आम्ही प्रयत्न केला तेव्हा तेव्हा दांडीवरून खाली उतरून पायांनी त्याने तो इकडे तिकडे उडवून दिला. पेरू, शेंगा,

मिरच्या वगैरे फळेच तो खात असे. त्याचे मरणही एखाद्या साधुपुरुषाने शांतपण समाधी घ्यावी तसेच होते. नेहमीप्रमाणे तो चांगला दिसत होता. त्याला काही झाले नव्हते. एके दिवशी पिंजऱ्यात घातलेल्या फळांना तो स्पर्शही करीना. इकडे तिकडे पाहायचा, आमच्याकडे टक टक पाहायचा, पण खाण्याला चोच लावीना. 'असं काय करतो हा ?' आजी म्हणत होती. दुसऱ्या दिवशी कार्तिकी एकादशी होती. पहाटेच्या वेळी मान टाकून तो पिंजऱ्याच्या तळाशी पडलेला दिसला.

लहानपणचे अनेक लागेबांधे आणि नातीगोती मी विसरून गेलो आहे; पण माझ्या या हिरव्या मित्राला मी कधी तरी विसरेन का ?

***

२.

# दूरून आकाश साजरे....!

पहिल्यांदाच मी विमानात बसलो तेव्हाचा एक अनुभव मला सारखा आठवतो. केव्हा एकदा खाली येतो असं मला झालं होतं. गाद्या-गिरद्यांनी मढविलेलं, नेहमीचं आरामशीर विमान नव्हतं ते. शिकविणारा आणि शिकणारा कसे तरी आत बसू शकतील असं एक विमानशाळेतलं ते चिमुकलं विमान होतं. कमरेला पट्टा बांधला होता तेवढाच काय तो आधार होता. कमरेवरचं सर्व शरीर विमानाबाहेरच होतं, विमान जरा कुठं एका बाजूला लवंडलं की खाली समुद्र किंवा घरांची छपरं दिसायची नि वर अफाट निळं आकाश दिसायचं. अर्धा-पाऊण तासच माझ्या वैमानिक मित्रानं मला आकाशात फिरवलं, पण त्या अर्ध्या तासात मी किती तरी नव्या गोष्टी शिकलो. 'जीव मुठीत धरणे' हा शब्दप्रयोग चुकीचा आहे; 'श्वास कोंडून जीव तोंडात घट्ट धरणे' असा शब्दप्रयोग पाहिजे असं मला त्या वेळी वाटत होतं. भाषेत नवी भर पडलीच पण अनुभवातही खूपच नवी भर पडली. भीतीनं ब्रह्मांड नाही आठवलं मला; भीतीनं पृथ्वी मला आठवली! भीतीनं माती आठवली म्हणाना. कुणी पाह्यलंय ब्रह्मांड? माती आपली खरी. कोणतीही जवळची गोष्ट खूप दूर गेली म्हणजे तिची महती कळते म्हणतात. सदान्कदा पृथ्वीवर आयुष्य काढणाऱ्या आम्हा माणसांना अतिपरिचयामुळं ती मातीमोल वाटते; पण तिच्यापासून वर, दूर अंतराळात गेलं म्हणजे ती माती आपणाला किती प्राणाहून प्रिय आहे याचा अनुभव येतो. कल्पनेनं उंच उंच आकाशाच्याही पलीकडे भराऱ्या मारणं ठीक आहे; पण पाय पृथ्वीवर रोवलेले असले म्हणजे ते सगळं चांगलं जमतं. पायासह एकदा वर भरारी मारून पाहा

म्हणजे नको ते वरचं भव्य नि दिव्य आकाश; आपली पायाखालची खडबडीत, दणकट मातीच बरी असं वाटेल ! विमान खाली आलं नि मी पृथ्वीवर पाय टेकले तेव्हा हरवलेल्या अर्भकाला त्याची आई दिसली नि तिच्या कुशीत त्यानं डोकं खुपसलं की त्याला जसं वाटतं तसं अक्षरश: मला वाटलं.

माझ्या एका शास्त्रप्रेमी मित्राला माझा हा अनुभव मी सांगितला तेव्हा निर्विकार चेहरा करून तो म्हणाला, 'गुरुत्वाकर्षण आहे ते, दुसरं काय !'

मी म्हटलं, 'जड शरीरापुरतं तुझं गुरुत्वाकर्षण ठीक आहे; पण माझ्या मनाला मातीची विलक्षण ओढ आहे त्याचं काय ?'

'त्याचा तूच काय तो विचार कर !' असं म्हणून, तो आपल्या प्रयोगशाळेत निघून गेला.

त्यानं सांगितलं म्हणून नव्हे तर खरोखरच मला आवडतं म्हणून, मातीचं मला जे विलक्षण आकर्षण आहे त्याचा मी नेहमी विचार करतो. माझं मलाच आश्चर्य वाटतं. मुंबईसारख्या यंत्रजीवी कृत्रिम शहरात माझा जन्म झालेला, आणि सारा जन्म गेलेला. रसरशीत तांबडी किंवा कुळकुळीत काळी माती कधी दृष्टीलाही पडायची नाही. दृष्टीला रोज पडायची दगडी गटारं नी डांबरी रस्ते. म्हणूनच कदाचित आधीच माझ्या रक्तात असलेली जिवंत मातीची ओढ अधिक तीव्र झाली असावी. काळ्या किंवा तांबड्या मातीतून तरारून बाहेर येणारे हिरवे कोंब पाहण्यात एक प्रकारचा अलौकिक आनंद असतो,—मुलांना तर मातीत पुरलेली बी दोन पानांचं चिमणं झाड होऊन बाहेर येते तेव्हा स्वर्ग हाती आल्यासारख्या आनंदाच्या उकळ्या फुटतात. गिरगावातल्या एका गजबजलेल्या चाळीत माझं सर्व लहानपण गेल्यामुळं हा आनंद मला कधीच उपभोगता आला नाही. मातीच्या जिवंत स्पर्शाची ही ओढ आतल्या-आत दडपली गेल्यामुळं माझ्यासारखी शहरी माणसं मनातल्या मनात कशी घुमसत असतात याचं एक मजेदार उदाहरण मला आठवतं.

मी मुंबईत वाढलेला, पण माझी आजी कोकणातल्या शेतात राबलेली,—स्वत:च्या हातांनी पेरणी, कापणी केलेली स्त्री होती. पेरलेल्या एका दाण्याचे हजार दाणे होऊन वर आलेले भाताचे लोंबर तिनं हातात खेळवले होते. परसातल्या हिरव्या, तांबड्या, निळ्या, जांभळ्या भाज्यांचे, फुलांचे, फळांचे रंग पाहून तिचे डोळे निवलेले होते. या शेतभाताच्या गोष्टी ती मला सांगे तेव्हा तिच्या डोळ्यात आनंदाश्रू चमकत. तिला मुंबईसारख्या शहरात वृद्धपणी हा 'जिवंत' मातीचा विरह किती जाणवत असेल याची कल्पनाच केलेली बरी. तिचा हा राग एकदा कसा व्यक्त झाला तेच मजेदार उदाहरण मी सांगणार आहे. आमच्या चाळीचे जिने झाडणारा आणि संडास साफ करणारा एक म्हातारा रामा गडी होता. तो एकदा आमच्या दारावरून जात असता त्याला काही काम सांगायचं

होतं म्हणून आजी मला म्हणाली, 'अरे, त्या झाडूवाल्या रामाला जरा हाक मार.' ते शब्द रामाच्या कानावर पडले. आजी सहज त्याला झाडूवाला म्हणाली होती. तिच्या मनात त्याचा अपमान करण्याचा चुकूनसुद्धा हेतू नव्हता; पण रामाला त्या शब्दाचा साहजिकच राग आला. तो पुढं येऊन म्हणाला, 'हे काय हो आजीबाई, मला तुम्ही झाडूवाला काय म्हणता ?'

'मग काय रे बाबा तुला म्हणायचं ?' आजीनं विचारलं.

'मला माळी म्हणा.'

'अस्सं !' आजीचा अस्सल कोकणी खवचटपणा विजेसारखा तिच्या जिभेतून तत्क्षणी उसळला, 'संडासातल्या फुलबागा शिंपतोस म्हणून तुला माळी म्हणायचं की काय ?'

बिचारा रामा या तडाख्यानं सर्दच झाला. रामावर आजी उगाच रागावली; पण तिचा राग समजण्यासारखा आहे. फुलाफळांची जतन करणारासाठी जो शब्द वापरावयाचा तो चाळीचे संडास झाडणाराला लावण्याची कल्पनाच तिला असह्य झाली. गंधवती धरतीमातेपासून वर्षानुवर्षं दुरावल्यामुळं तिच्या मनात धुमसत असलेला राग अशा रीतीनं बाहेर आला !

मी मात्र लहानपणापासून झालेली माझी ही उपासमार आता अधाशासारखी भरून काढण्याचा प्रयत्न करतो आहे. गिरगाव सोडून अलीकडे मी दादरला राहायला आलो तेव्हा घराच्या आसपास उघडी जमीन मला दिसली. तावडतोब बाजारात जाऊन मी दोन-अडीच रुपयांचं भाजीपाल्याचं बी विकत आणलं, आणि मोठ्या उत्साहानं घरामागल्या जमिनीत पेरलं. मुलांच्या बरोबर मीही त्याला मधूनमधून पाणी घालीत होतो. बरंचसं बी रुजलंच नाही. टोमॅटोची रोपं वर आली, मोठी झाली, पण त्यांना फळंच आली नाहीत. चवळीची वेल मात्र रोज सकाळी उठून पाहावं तो एक एक गिरकी घेऊन वर गेलेली दिसे. तिला तशी वाढताना पाहून मुलं आनंदानं उड्या मारीत. मलाही उड्या माराव्याशा वाटत, पण वयाची आठवण होऊन मी मनातल्या मनात उड्या मारीत असे ! मात्र माझाही आनंद मुलांइतकाच अवखळ होता. शेवटी चवळीच्या वेलीला तीन-चार शेंगाही आल्या. तेव्हा आमचा आनंद गगनात मावेना. शेवटी ती वेल वाळून गेली.

माझ्या बऱ्याच मित्रांना माझा हा प्रयोग कळला होता. 'काय, एकंदर किती भाजी मिळाली ?' म्हणून त्यांनी विचारलं तेव्हा चवळीच्या चार शेंगा आल्याचं वृत्त त्यांना मी उत्साहानं सांगितलं. अडीच रुपयांचं बी पेरून दोन पैशांचीही भाजी मिळाली नाही हे ऐकून त्यांना हसू आवरेना, पण माझी मुळीच निराशा झालेली नव्हती. बी पेरल्यानंतर कोंब फुटतो, नि हिरवीगार वेल डोळ्यांसमोर गरगरा वाढत जाते हे पाहताना होणारा आनंद अलौकिक आहे. त्याच्यापुढं अडीच रुपये काहीच नव्हेत.

वृक्ष, वेली, फळं, फुलं, हीच कशाला–सर्वच प्राणीजात, आपण माणसंही–धरतीचीच लेकरं नाही का ? 'माती असशी मातीत मिळशी', हे किती तरी अर्थांनी खरं आहे. देह नाशवंत आहे एवढाच याचा अर्थ आहे असं मला नाही वाटत. जिवंत देहालासुद्धा मातीची विलक्षण ओढ असते. वृक्ष-वेलींप्रमाणे आम्हा माणसांची पाळंमुळंही मातीतच आहेत. जमिनीवर आपणाला जितकं सुरक्षित वाटतं तितकं पाण्यात किंवा हवेत कधीही सुरक्षित वाटत नाही. लहान बालकाला मातेच्या अंगावर जितकं सुरक्षित वाटतं नि जितकं सुख होतं तितकंच जरठ वृद्धालाही धरतीच्या मांडीवर होतं. एक आई वयाची काही थोडी वर्षं पोषण करते तर ही दुसरी आई वयाच्या अंतापर्यंत पोषीत असते. एक माता, दुसरी माती–म्हणजेच मोठी माता !

* * *

३.

# आकाशातले तारे आणि मी

तो क्षण अजूनही मला केव्हा केव्हा आठवतो, आणि भीतीची एक बारीकशी लहर अंत:करणाला चाटून जाते. त्या वेळी वाटलेली ती भीती अजबच होती. त्या भीतीला तोडच नव्हती. त्या भीतीसारखी भीती तीच. इतकी वर्षं लोटली तरी अजूनही त्या क्षणाच्या आठवणीनं बारीकसा का होईना पण अंत:करणाचा थरकाप व्हावा, यावरून ती भीती किती विलक्षण होती हे दिसून येतं. तेरा-चौदा वर्षांपूर्वीचा तो अनुभव आहे. विलायतेहून मी परत येत होतो. भूमध्य-समुद्राच्या शांत पाण्यावरून बोट संथपणे चालली होती. रात्रीची नऊ-दहाची वेळ असेल. जेवणं करून उतारू मोठ्या डेकवर हसत-खिदळत, गप्पा-गोष्टी करीत बसले होते. माझ्या सहज मनात आलं की अगदी वरच्या छोट्या डेकवर जावं, आणि आकाशाची गंमत पाहावी. हे छोटं डेक अगदी वर असतं, आणि क्वचितच एखादा खलाशी काही कामाकरिता तिथं जातो. मी वर गेलो तेव्हा तिथं कुणीच नव्हतं. मी पाठीवर उताणा पडलो, आणि वर आकाशाकडे पाहू लागलो. स्वच्छ, निळं आकाश चमचमणाऱ्या अक्षरश: असंख्य तारकांनी आणि तारकापुंजांनी भरून गेलं होतं. माझे दोन डोळे, ते अफाट निळं आकाश आणि ते चमचमणारे अगणित तारे, यांखेरीज जगात दुसरं काहीच नाही, असा क्षणभर मला भास झाला आणि मी आनंदाने वेडावून गेलो; पण आणखी एक-दोन क्षण टक लावून पाहतो न् पाहतो तोच तो ताराखचित अफाट नीलिमा मला खायला येतो आहे की काय, अशा काहीतरी अननुभूत, विलक्षण भीतीनं माझ्या काळजाचा थरकाप झाला. मी जगातच आहे याची खात्री करून घेण्याकरिता की काय, एकदम धडपडून मी

अंगाखालचं डेक चाचपडत उठून उभा राहिलो. अफाट निळ्या आकाशातले ते अगणित तारे आणि मी एकटा, एकटा, एकटा, अशी काही तरी भयंकर एकटेपणाची जाणीव त्या क्षणाला होऊन माझं काळीज धडधडत होतं. डेकच्या फळ्यांचा स्पर्श झाल्यावर, आजूबाजूचा बोटीचा कठडा पाह्यल्यावर, जरा बरं वाटलं. जिन्यावरून उड्या मारीत मी खालच्या मोठ्या डेकवर आलो, आणि सिगारेट ओढीत, गप्पा-गोष्टी करीत, हसत-खिदळत असलेले माझे बोटीवरले सोबती पाहून मला एकदम बरं वाटलं. मी माणसांत आलो होतो. माणसांत असण्यात किती विलक्षण आनंद असतो याचा अतिपरिचयानं मला विसर पडला होता, त्याची जणु काय त्या क्षणी मला पुन्हा प्रचीती आली.

या क्षणाचा मी विचार करू लागलो तेव्हा माझ्या ध्यानात आलं की खरा खुरा एकटेपणा माणसाला कधीच नको असतो. खरोखरच माणूस अगदी एकटा असेल तर त्याला माणूस म्हणून जगणंच शक्य नाही. आहार, निद्रा,भय एवढ्यापुरता एखादा रॉबिन्सन क्रूसो काही वर्षे एकटा जगू शकेल, किंवा एखादा योगी सारं आयुष्य एकान्तात घालवील; पण असला माणूस विचारात घेण्यात अर्थ नाही. तो माणूस नव्हेच. 'स वै मुक्तोऽथवा पशुः'! निसर्गबाबाच्या मांडीवर लोळणं आणि सृष्टिसतीच्या खांद्यावर खेळणं हे सर्व कवितेत नेहमीच, किंवा रोजच्या जीवनात थोडा वेळ ठीक आहे, पण सर्वसामान्यपणे माणसाला माणसांशिवाय राहणं शक्य नाही. उंच डोंगरावरून किंवा मनोऱ्याच्या शिखरावरून आकाशाची मजा मी कितीतरी वेळा पाहिली होती. तेव्हा कधी चमत्कारिक भीती वाटली नव्हती. कारण अंधुकपणे का होईना, घरांची छपरं – मानवी जीवनाच्या काही खाणाखुणा दिसतच होत्या; पण बोटीवर केवळ आकाश आणि आपणच आहोत असा क्षणभर भास झाल्याबरोबर माझ्या छातीत धडकी भरली !

माणूस एकटेपणाचा आव पुष्कळ वेळा आणतो; पण कळत अगर नकळत प्रेमाच्या, द्वेषाच्या, नात्याच्या, गोत्याच्या, व्यवहाराच्या अनेक दृश्य किंवा अदृश्य धाग्यांनी तो मानव-जातीशी बांधलेला असतो. किंबहुना हे धागेच त्याची माणुसकी जिवंत ठेवीत असतात. माझंच पाहा ना. वाचीत, विचार करीत किंवा लिहीत माझ्या खोलीत मी बसलो असता घरातल्या कुणी माणसानं माझ्याशी बोललेलंच काय, पण माझ्या खोलीत डोकावून पाह्यलेलंही मला मुळीच खपत नाही. संपूर्ण एकटेपणा मला पाहिजे असतो; पण त्याबरोबरच माझं लिहून किंवा वाचून झाल्यावर चहा करून द्यायला बायको घरात आणि माझ्याबरोबर खेळायला-खिदळायला मुलं येणार आहेत याचीही मला खात्री पाहिजे असते ! मी विचार करून लिहिलेलं कुणीतरी वाचणार आहे हेही मला माहीत असतंच ! तुला संपूर्ण एकटेपणा पाहिजे ना, राहा तर एकटा आणि खूप विचार कर, खूप लिही; असं म्हणून माझ्याशी कुणीच कधी बोलायचं नाही, चालायचं नाही, डोकावून मला त्रास द्यायचा नाही, की मी लिहिलेलं वाचायचं नाही, असं घरातल्या माणसांनी आणि

जगातल्या लोकांनी ठरवलं तर मला लिहिणं शक्य आहे का ? मी म्हणतो, जगणं तरी शक्य आहे का ?

मला पुढं जाऊन आणखी असं म्हणायचं आहे की केवळ एकटाच काय, पण केवळ दुकटासुद्धा माणूस जगू शकणार नाही. या स्वार्थी, कपटी, दुष्ट जगापासून दूर दूर जाऊन 'तुला मी आणि मला तू', असे आपण कुठंतरी राहू, असं पुष्कळ प्रेमी युगुलं एकमेकांना सांगतात. हेही कवितेपुरतं नेहमीच, किंवा व्यवहारात थोडे दिवस ठीक आहे; पण कायमचं केवळ 'तू आणि मी' राहणं शक्य नाही. सुष्ट, दुष्ट, कपटी, स्वार्थी, निष्कपट, निःस्वार्थी अशा विविध-रंगी मानवतेच्या सहवासातच आपल्या प्रिय माणसांचा सहवास गोड वाटतो. केवळ प्रिय माणूस सदैव जवळ असेल तर काही दिवसांनी त्याचा सहवास विषाहूनही कडू होतो आणि ते प्रिय माणूस शत्रूहूनही शत्रू वाटू लागतं. माझं हे विधान कुणाला कससंच वाटेल; पण एक घडलेली गोष्ट मी कुठंतरी वाचली आहे, फॅसिस्ट हुकूमशाहीविरुद्ध कट केल्याच्या आरोपावरून पकडलेल्या एका क्रांतिकारक जोडप्याला फॅसिस्ट अधिकाऱ्यांनी एकदा एक अजब शिक्षा दिली : 'तुमचं एकमेकांवर अतिशय प्रेम आहे ना – तुम्हाला एकमेकांना सोडून राहवणार नाही ?' या प्रश्नाला त्या तरुण-तरुणीनं 'हो' असं उत्तर दिलं. 'ठीक आहे, तुम्हाला कायमचं एकत्र राहण्याची शिक्षा आवडेल', असं म्हणून त्या अधिकाऱ्यांनी त्या दोघांचे हात-पाय एकाच लोखंडी साखळीनं कायमचे बांधून टाकून त्यांना तुरुंगात ठेवण्याची शिक्षा दिली. खाणं, पिणं, झोपणं, उठणं, फिरणं सर्व व्यवहार त्या दोघांना एकमेकांना जखडलेल्या स्थितीत चोवीस तास करावे लागत. दोन-चार दिवस त्यांनी कसेतरी काढले. पुढे तिला झोप लागली असता तो जरा हलला तर ती जागी व्हायची. त्याला उठायची इच्छा नसता तिला उठून कुठं जावंसं वाटलं तर तो चिडू लागला. सांखळ्यांनी दोघांच्या अंगाला जखमा झाल्या होत्या. एकाच्या हालचालींनी दुसऱ्याला वेदना व्हायच्या. थोड्याच दिवसांत ती दोघं क्षणोक्षणी भांडू लागली, एकमेकांना शिव्या-शाप देऊ लागली, दोघांपैकी एक मरेल तर बरं, अशा प्रार्थना करू लागली. हालहाल करून त्या दोघांना मारून टाकण्याची शिक्षा त्या अधिकाऱ्यांनी दिली असती तर ती या शिक्षेपेक्षा कितीतरी सौम्य ठरली असती. एकमेकांवर प्रेम करणाऱ्या त्या दोघांचं प्रेम ठार करून टाकण्याची––त्या दोघांना एकमेकांचा द्वेष करायला लावण्याची अमानुष शिक्षा त्यांनी त्यांना दिली होती.

हे उदाहरण अपवादात्मक आहे हे मला मान्य आहे. सांखळीनं कायमचं दोघांना जखडून ठेवल्यावर एकमेकांबद्दल काही दिवसांनी उबग येणारच; पण मोकळेपणानंसुद्धा केवळ दोनच माणसं सर्व जगाचा संपर्क टाळून एकमेकांच्या सहवासात कायमची राहतील तर काही दिवसांनी त्यांना एकत्र राहणं असह्य होईल असं मला वाटतं. छे छे ! मी एकटाच राहीन, आम्ही दोघंच राहू, या बोलण्यात काही अर्थ नाही. आपण सर्वांनी एकत्र राहिलं पाहिजे हेच खरं.

***

## ४.

# पुराणातली वांगी

गणूकाकांशी माझे मतभेद नेहमीच होतात, पण त्यांच्या एका शक्तीचं मला नेहमी कौतुक वाटतं. कोणत्याही कूट प्रश्नाचं ते अगदी सहज आणि चट्‌दिशी उत्तर देऊ शकतात. लहानपणी तर त्यांच्या या शक्तीमुळं मी थक्क होऊन जात असे. त्या वेळी मला जर कुणी प्रश्न विचारला असता, की जगातल्या सर्व शहाण्यांचा राजा कोण, तर त्याचं मी तात्काळ उत्तर दिलं असतं, 'गणूकाका–आमचे गणूकाकाच !'

लहानपणी एकदा मी त्यांना विचारलं, 'काका, मारवाड्याच्या डोक्यावर तीन पट्टे का हो असतात ?'

काका तावडतोब उत्तरले, 'अरे, मारुतीनं ओढलेत ते त्यांच्या डोक्यावर !'

'म्हणजे ?' मी उद्‌गारलो.

'मारुतीनं लंका जाळली हे तुला माहीत आहे ना ?'

'हो, पण त्याचा मारवाड्यांच्या . . .'

'ऐकून तर घे,' काका सांगू लागले, 'शेपूट पेटविण्याकरिता त्यानं शेपटाला खूपशा चिंध्या गुंडाळल्या, आणि घासलेटचे डबे तो शोधू लागला. मारवाडी व्यापाऱ्यांकडे गयावया करून तो घासलेट मागू लागला; पण मारवाडी कसले खप्पी; ते म्हणाले, आम्ही नाही देणार फुकट घासलेट. मारुती संतापला. भुभुःकार करून त्यानं त्यांची गुदामं फोडली, घासलेटचे डबे बाहेर काढले आणि त्यात शेपूट बुडवून पेटवून दिलं. त्या पेटत्या शेपटानं आधी प्रत्येक मारवाड्याच्या

डोक्यावर त्यानं तीन तीन पट्टे ओढले, आणि मग लंकेला आग लावायला तो निघाला, तेव्हापासून मारवाड्यांच्या डोक्यावर हे तीन पट्टे आहेत !'

काकांनी दिलेली ही माहिती ऐकून मी अगदी खूश होऊन गेलो. त्या वेळेला तरी माझं पूर्ण समाधान झालं.

आता मोठा झाल्यावर काकांच्या उत्तरांवर मी इतका बेफाम विश्वास ठेवीत नाही; तरी पण काकांच्या विशाल कल्पनाशक्तीचं मला अजूनही पूर्वीइतकंच कौतुक वाटतं. परवा मी त्यांना सहज म्हटलं, 'का हो, काका, पण-बीण, बाप-बीप असं केव्हा केव्हा आपण म्हणतो, त्यांतले हे बीण आणि बीप शब्द कुठून हो आले ?'

काकांचं उत्तर तयारच होतं. ते म्हणाले, 'देव विश्वमित्राचं ऐकेना, तेव्हा तपश्चर्या करून प्रतिसृष्टी निर्माण करायची धमकी विश्वामित्रानं देवाला दिली होती, तुला माहीत आहे ना ?'

मी म्हटलं, 'हो.'

'पुढं देव नमला आणि विश्वामित्रानं आपला तो विचार सोडून दिला,' काका सांगू लागले, 'पण थोडीशी प्रतिसृष्टी निर्माण झालीच होती. त्या सृष्टीतले हे शब्द अजून आपल्या भाषेत राहिलेत !'

विश्वामित्राची प्रतिसृष्टी आणि प्रतिसृष्टीतले हे शब्द, ही काकांची कल्पना मला अतिशयच हृद्य वाटली. हृद्य वाटायचं एक विशेष कारण होतं. माझ्या डोक्यात अलीकडे एक चमत्कारिक विचार सारखा घोळत असतो. पुराणातली वांगी पुराणात असं म्हणतात खरं, पण पुराणातल्या वांग्यांचं चांगलं चमचमीत भरीत करून खाता येईल; असं अलीकडच्या काही शोधांवरून मला वाटू लागलं आहे. ब्रम्हास्त्र, पाशुपतास्त्र, वगैरे अस्त्रांची वर्णनं आम्ही पुराणात वाचीत होतो; आणि ती अस्त्रं सोडल्याबरोबर पृथ्वी कशी थरथरा कापत होती, सप्तसागर कसे उफाळून वर येत होते, आकाश कसं कोसळून खाली येत होतं, भर दिवसा मिट्ट अंधःकार कसा होत होता आणि मध्यरात्री लख्ख प्रकाश कसा पडत होता वगैरे वगैरे गोष्टींचं आम्हाला विलक्षण आश्चर्य वाटत होतं. हे आपलं पुराणातलं वर्णन आहे. वास्तव जगात हे काही शक्य नाही, अशी आमची खात्री होती. ॲटम् बॉंबची आणि त्याच्या स्फोटाची वर्णनं वाचून ही पुराणातली वांगी आता डोळ्यासमोर झाडांना लटकू लागली आहेत.

मध्यरात्री सामसूम झाल्यावर मी रेडिओ लावून बसतो, तेव्हा विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीची मला पुन्हा पुन्हा आठवण होते. एखादे वेळी तुर्कस्थानमधील अंकारा शहरात कुणी बोलत असेल त्याचा आवाज ऐकू येतो, तर कधी ऑस्ट्रेलियातील सिडनेमधले शब्द कानावर पडतात. कुठं तुर्कस्थान ! कुठं ऑस्ट्रेलिया ! त्या

बोलणारांना कल्पना तरी असेल का, की मुंबई नावाच्या एका शहरातल्या एका कोपऱ्यात बसलेल्या एका माणसाच्या कानावर आपण बोलत असलेले शब्द पडत असतील म्हणून ? आपण उच्चारलेला प्रत्येक शब्द त्याच क्षणाला साऱ्या विश्वाच्या कोनाकोपऱ्यात जातो, –हिमालयावर उड्डाण करीत असलेल्या एखाद्या विमानात, पॅसिफिक महासागराच्या तळाशी असलेल्या एखाद्या पाणबुडीत, आफ्रिकेतल्या जंगलात, न्यू यॉर्कमधील गगनचुंबी इमल्याच्या एकशे दहाव्या मजल्यावर तो टिपून घेणारे यंत्र असेल तर तो ऐकता येईल हे खरं; पण ऐकू येवो अगर न येवो, तो इतक्या दूर सर्व ठिकाणी जातो हे केवढं महान आश्चर्य आहे !

रात्रीच्या प्रशांत वेळी या आश्चर्याचा विचार करीत असता कल्पनाशक्तीला आणखी एक पाऊल पुढे टाकावंसं वाटतं. साऱ्या विश्वाला वेढून टाकणाऱ्या लहरी आमचे शब्द सर्वत्र नेतात हे जर खरं, तर आणखीही एक गोष्ट खरी असण्याचा संभव आहे. या लहरी हे शब्द साठवूनही ठेवू शकत असतील. विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीसारखीच, कुणी सांगावं, एखादी आवाजाची दुनिया असेल. आजचे, कालचे, अनादिकालापासूनचे माणसाचे आवाज या दुनियेत वावरत असतील; उद्या एखादा शास्त्रज्ञ या लहरींचं एखादं नवं रहस्य उघडकीला आणील, या ‘आवाजांच्या दुनिये’ची दारं आपणासाठी खुली होतील. आणि मग ?—मग कल्पना करावी तितकी थोडीच ! कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णानं अर्जुनाला सांगितलेली गीता, प्रत्यक्ष त्याच्या शब्दांत आपणाला ऐकता येईल; भगवान बुद्धाची प्रवचनं त्याच्या आवाजात आपण ऐकू. डेमॉस्थेनिस, सिसिरोची भाषणं, शिवाजीचे शब्द, काय काय आपणाला ऐकता येईल! मात्र व्याख्यानांचे खोटे रिपोर्ट देणे अशक्य होईल. सिनेमाला नेईन असं मी काल म्हणालोच नव्हतो म्हणून नवऱ्यांना बायकांशी भांडता येणार नाही. आणखी, आणखी पुष्कळच काही होईल ! पुराणातली वांगी पुराणात असं गणूकाकांना सांगण्याची काही सोय उरलेली नाही, एवढं खरं.

* * *

५.

# " क्रिया आणि प्रतिक्रिया . . . . "

कुठल्याशा एका चित्रपटात एक मजेदार प्रसंग पाहिल्याचे मला आठवते. एका राजपुत्राला घेऊन त्याची दाई रस्त्यातून चालली होती. रस्त्याच्या कडेला एक काकडीविक्या काकड्यांच्या फाका मोहकपणे आपल्या टोपलीवर मांडून बसला होता. गरीबगुरीबांची मुले त्याच्याभोवती जमून यथेच्छ काकड्या खात होती. त्यांना पाहून तो राजपुत्र, " मला दे ना ते काय ते खायला घेऊन ! " म्हणून दाईशी हट्ट घेऊन बसला. दाईने अगदी कडक चेहरा करून त्याला सांगितले, " इश्श ! रोगाच्या जंतूंनी भरलेल्या रस्त्यावरच्या घाणेरड्या वस्तू त्या ! आपण खाऊ नये तसल्या गलिच्छ वस्तू !" इतक्यात त्या दाईची कोणी मैत्रीण तिला रस्त्यात भेटली, आणि ती तिच्याशी बोलण्यात गुंग असता त्या छोट्या राजपुत्राने दाईला हळूच झुकांडी दिली आणि त्या काकडीविक्याकडे जाऊन अगदी गयावया करून त्याला तो सांगू लागला, " अगदी लवकर मला ती जंतूंनी भरलेली घाणेरडी वस्तू खायला दे ! नाही तर ती दाई पाहील. दे ना गड्या, ती मला गलिच्छ वस्तू ! "

बालस्वभावाची एक मजेदार छटा या प्रसंगात दाखविली आहे; पण माझे म्हणणे असे आहे की, हा मुळी मनुष्यस्वभावाचाच एक विशेष आहे. लहान मुलांत तो अधिक स्पष्टपणे आणि उठावदार दिसतो, इतकेच. पुष्कळ वडील माणसांना असे वाटते की, लहान मुलांना 'स्वत्व' असे काही नसतेच. आपण देऊ ते त्याने खावे आणि सांगू ते करावे. आणि मुलाने तसे केले नाही, की मग त्याला हट्टी किंवा आततायी म्हणावयाचे व यथेच्छ झोडपावयाचे ! आपण सर्व हे केवळ मुलाच्या कल्याणाकरिता करतो आहोत असा कितीही जरी आव या लोकांनी आणला तरी याच्या बुडाशी सत्ताधाऱ्याची मदोन्मत्तता आणि दुखावलेली अहंमन्यता याच अरेरावी भावना असतात.

माझ्या मते तर मोठ्या माणसांपेक्षाही लहान मुलांत 'स्वत्वा'ची भावना अधिक निर्मळ व जाज्वल्य असते. जगाच्या कटुमधुर अनुभवांनी तावून निघाल्यामुळे किती तरी वेळा 'स्वत्वा'वर पाणी सोडून तडजोड करण्याची वृत्ती मोठ्या माणसांना जडलेली असते. लहान मुलांच्या हे गावीही नसते; आणि म्हणूनच तुम्ही जेव्हा आपले जुलमी हुकूम त्यांच्यावर सोडता, तेव्हा बेलाशक त्यांना आपल्या चिमुकल्या पायांखाली तुडवून, ती अगदी मुद्दाम त्याच्या विरुद्ध वर्तन करीत असतात. तुम्ही याला वाह्यात हट्टीपणा म्हणा पाहिजे तर, पण मी मात्र याला सन्माननीय स्वत्वप्रतिपादनच म्हणेन !

लहान मुलांचीच गोष्ट कशाला ? आपण सर्वच अशा तऱ्हेने वागत असतो. क्रिया आणि प्रतिक्रिया या सम आणि विरुद्ध असतात, हा निसर्गाचा नियम मनुष्यस्वभावालाही तितकाच लागू आहे. एखादा मनुष्य उगाच ऐटीने वाकडी टोपी घालून रस्त्यातून चालत असला, तर द्यावी एक थप्पड आणि उडवावी त्याची टोपी, असे साहजिकच आपणाला वाटते ! का वाटते असे ? मला वाटते येथेही आपल्या 'स्वत्वा'च्या भावनेवरच आघात होतो. "हा कोण मोठा ऐटीने चालणारा ? – आम्ही काही माणसे नव्हे ? " हीच ती भावना.

दुसऱ्याचे स्वतंत्र व्यक्तित्वच जेव्हा आपण नाकारू लागतो, तेव्हा साहजिकच त्याचा अहंभाव –– अर्थात चांगल्या अर्थाने –– उसळून बाहेर येतो, व आपण सांगतो ते चांगले असो की वाईट असो, तो आपणाला विरोधच करू लागतो. याचे उत्तम उदाहरण मला एकदा आगगाडीच्या डब्यात पाहावयास मिळाले. एक चांगला घटिंगण गृहस्थ जरा ऐसपैस शरीर पसरून बाकावर बसला होता. मी डब्यात चढलो, आणि जागा कोठेच दिसेना, तेव्हा त्या गृहस्थाजवळ जाऊन अगदी शांत स्वरात म्हणालो, " जरा जागा द्याल का मला बसायला ?"

" हो, हो, – का नाही ?" असे म्हणून लगेच त्याने आपले शरीर आवरून मला जागा करून दिली. काही वेळाने दुसरीकडे खूप जागा झाली म्हणून मी तिकड जाऊन बसलो. आणि तो गृहस्थ पुन्हा पहिल्यासारखा जरा स्वस्थपणे पसरला. पुढच्या स्टेशनावर दुसरा एक गृहस्थ डब्यात चढला, व कुठे जागा दिसेना म्हणून त्या गृहस्थाजवळ जाऊन म्हणाला, " जागा द्या पाहू, हे काय घर आहे का हातपाय सोडून स्वस्थ पडायला ? व्हा बाजूला !"

" होत नाही बाजूला ! पाहिजे तर उभे राहा, नाहीतर चालते व्हा उतरून !" त्या गृहस्थाने उसळून उत्तर दिले. त्या दुसऱ्या गृहस्थाला निमूटपणे मान खाली घालून उभे राहावे लागले. क्रिया आणि प्रतिक्रिया सम आणि विरुद्ध असतात, त्या अशा !

निसर्गाचा हा नियम इतका निष्ठुर आणि अविचलित आहे, की एखादी चांगली गोष्ट सुद्धा फार करावयाची सोय नाही ! प्रतिक्रिया ही ठेवलेलीच ! कुठेसे एकाने म्हटले आहे की, " जगात असे आपण काय करू शकतो की ज्याचा आपणाला हिशोब द्यावा लागत नाही ?" अगदी साधे वाक्य आहे, पण त्यात अर्थ मात्र काठोकाठ भरला आहे. वाईट करा अगर चांगले करा, त्याचा झाडा हा द्यावा लागतोच. भूक लागली आणि यथेच्छ खाल्ले, तर अजीर्ण; बरे, अजीर्ण होईल म्हणून भीत भीत थोडे खाल्ले, तर पोटाला भूक आणि जिवाला त्रास ! काही, काही म्हणून करायची सोय नाही ! घरातल्या घरात कोंदट हवेत न बसता बाहेर वाऱ्यावर फिरावे, तर थंडी होते; आणि घरात बसून राहावे तर कोंदट हवेमुळे रक्त दूषित होते ! शेवटी मला वाटते, माझा लेख पाहून गणूकाका म्हणाले तेच खरे की,

" तुझ्या क्रिया प्रतिक्रिया घाल चुलीत; आपणाला वाटेल तेव्हा वाटेल ते करावे ! "

***

## ६.

# "माणसे – चांगली आणि वाईट...."

मी स्वतःला फार चांगला मनुष्य समजतो. मला वाटते प्रत्येक मनुष्य स्वतःला फार चांगला समजतो. अगदी दुष्ट समजला जाणारा मनुष्य जर एखादे दिवशी मनमोकळेपणाने बोलू लागला, तर तोही स्वतःला फार चांगला समजतो असेच तुम्हाला आढळून येईल. याचे कारण काय म्हणून कुणी विचारले, तर मला तरी नीटसे सांगता येणार नाही. कदाचित मनुष्यस्वभावाचा असा धर्मच असेल की स्वतःच्या दोषांपुरता मात्र प्रत्येक मनुष्य पूर्णपणे आंधळा, पण गुणांच्या बाबतीत मात्र लखलखीत डोळस ! काय असेल ते असो. हे असे आहे खरे !

या सर्व गोष्टींची मला आठवण व्हायचे कारण मी स्वतःला फार चांगला समजत होतो, आणि आतापर्यंत तरी सर्व लोक मला चांगला म्हणतात, अशी माझी कल्पना होती. पण नुकताच या कल्पनेला चांगलाच धक्का बसला. एका कुटुंबातली मंडळी मला अट्टल बदमाश समजतात; आणि भेटेल त्या मनुष्याकडे माझ्या बदमाशीचे रसभरीत वर्णन करतात, असे मला कळले. आणि त्यांच्या दृष्टीने मी बदमाश का ठरलो तेही मला समजले.

मी कबूल करतो, की जगातले काही थोडे लोक तरी मला बदमाश समजतात हे कळल्यावर मला वाईट वाटले; पण पुन्हा नेहमीच्या मनुष्यस्वभावाप्रमाणे ती मंडळीच बदमाश आहेत, तेव्हा बदमाश लोकांनी मला बदमाश ठरविले, त्याचा अर्थ मी चांगलाच मनुष्य आहे असा युक्तिवाद लढवून मी मनाचे समाधान करून घेतले. काय मनुष्यस्वभाव आहे पाहा ! एखाद्याने आपणाला चांगले म्हटले तर तो मनुष्यच चांगला आहे, असे आपण म्हणतो आणि चांगल्या मनुष्याने आप-

णाला चांगला म्हटले म्हणून आपण चांगले ! आणि एखाद्या मनुष्याने आपणास बदमाश ठरविले, तर तो म्हणणारा मनुष्यच बदमाश असला पाहिजे, अशी आपण आपल्या मनाची खात्री करून घेतो; आणि अर्थात् बदमाश मनुष्य चांगल्या माणसांना बदमाशच म्हणणार, असा पोक्त विचार करून आपण पुन्हा स्वतःला चांगलेच ठरवतो !

पण माझ्या मनापुढे उपस्थित झालेला मुद्दा निराळाच आहे. रंगाच्या बाबतीत ज्याप्रमाणे अमुक एक वस्तू हिरवी आहे, अमुक निळी आहे, अशी आखीव मते देतो, त्याप्रमाणे मनुष्यांच्या बाबतीतसुद्धा अमुक मनुष्य चांगला आहे, अमुक बदमाश आहे, असा असा मनुष्य मत्सरग्रस्त आहे, तमका माणूस अगदी निर्मत्सर अशा एकांतिक कल्पना करणे सत्यपूर्ण होईल का ?

हा प्रश्न माझ्या मनात उद्भवावयाचे कारण मला काही लोक चांगला समजतात, तर दुसरी कुणी मंडळी बदमाश ठरवतात, हे तर खरेच; पण त्याहीपेक्षा दुसरे एक जबरदस्त कारण झाले. माझ्या ओळखीचा एक मनुष्य आहे. आमच्यापैकी कुणालाही जर तुम्ही त्याच्याविषयी विचाराल, तर आम्ही एकमुखाने सांगू की अत्यंत सालस, अत्यंत प्रेमळ, भारीच गोड स्वभावाचा मनुष्य आहे तो. पण एक भयंकर गोष्ट मला अशी कळली, की त्याची बायको त्याचा मनापासून तिरस्कार करते ! तर मग, कुणी म्हणेल की ती दुष्ट स्त्री असली पाहिजे. तसे मुळीच नाही. तिला ओळखणाऱ्या कुणाही स्त्रीला अगर पुरुषाला विचारा, ती अत्यंत प्रेमळ व सालस बाई आहे, असेच कुणीही सांगेल ! आणि असे असूनही ती आपल्या नवऱ्याचा तिरस्कार करते व तिचे आणि नवऱ्याचे पटत नाही हे ऐकून सर्व लोक आश्चर्यसागरात बुडून जातात; पण त्या दोघांच्या संबंधाचे सूक्ष्म निरीक्षण करता मला असे आढळून आले आहे की, ती फार उमद्या स्वभावाची व खेळाडू वृत्तीची आहे. नानातऱ्हेच्या लोकांत मिसळावे, हसावे, खेळावे असे तिला वाटते; आणि बरोबर हीच गोष्ट नवऱ्याला आवडत नाही. इतका चांगला असलेल्या त्या माणसाच्या मनाला असूयेची विकृती जडलेली आहे. मला वाटते त्याचा अपराध नसेल, पण अजूनही त्याला या मानसिक दोषांवर विजय मिळविता आलेला नाही. आपल्या बायकोने कुणाशी फारसे बोललेले हसलेले खेळलेले त्याला मुळीच आवडत नाही; एवढेच काय; पण कुणाकडे ती जास्त वेळ पाहात राहिली तरीही त्याला राग येतो. आणि तिचा तर स्वभाव अत्यंत खेळाडू आहे. अर्थात हा काही तिचा अपराध नव्हे आणि त्याच्या मनाच्या दुबळेपणामुळे त्याचाही काही इलाज नाही; पण सर्व लोकांना प्रिय असलेला तो, सर्व लोक जिच्या चांगुलपणाची वाहवा करतात अशा आपल्या बायकोच्या तिरस्काराला पात्र झाला आहे ! आणि मला या गोष्टीचे मुळीच नवल वाटत नाही. निळा रंग नुसता पाहिला तर छानदार दिसतो; त्याचप्रमाणे पिवळा रंगही स्वतंत्रपणे मोहक दिसतो. पण हे दोन रंग जर का एके ठिकाणी

मिसळले, तर निळाही नाहीसा होतो आणि पिवळाही नाहीसा होतो; आणि तिसराच हिरवा रंग दृष्टीला पडतो ! ही घटना जितकी आश्चर्यकारक, तितकीच दोन चांगली माणसे एके ठिकाणी आली असता ती एकमेकांना वाईट दिसावी हीही घटना विचित्र !

एका विशिष्ट व्यक्तिसमूहात ( Group ) एखादा मनुष्य चांगला ठरतो तोच दुसऱ्या व्यक्तिसमूहात बदमाश ठरतो ! मग तो खरोखर असतो तरी कसा ? का ज्याप्रमाणे पाणी ज्या आकाराच्या भांड्यात ओतावे तो आकार धारण करते, त्याचप्रमाणे मनुष्यस्वभावाचे पाणीसुद्धा ज्या प्रकारच्या परिस्थितीच्या प्याल्यात ते असेल त्याप्रकारचे स्वरूप धारण करते ? मला तरी या प्रश्नाचे उत्तर देता येत नाही

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
93660

## ७.

# चमत्कारिक कल्पना

एक जुनी आठवण झाली, की मला अजूनही हसू येते. माझ्या लहानपणची गोष्ट आहे. शाळेत जात असे मी तेव्हा. आमच्या शेजारी राहणाऱ्या गृहस्थांनी आपली बायको नुकतीच कोकणातून मुंबईला आणली होती. साधीभोळी होती बिचारी बाई. तिची लहान मुलगी एकदा आजारी होती. एक दिवशी दुपारी त्या मुलीचे जरा जास्त झाले. ती बाई घाबरून गेली. तिला काही सुचेना.

" जरा हपीसात जाऊन यांना बोलावून आणशील का रे, बाबू ? " तिने काकुळतीला येऊन मला विचारले.

" हो, " मी म्हणालो, " कुठच्या हपीसात जातात ते ? पत्ता काय त्यांच्या हपीसाचा ? "

" पत्ता कसला ? अरे कोटातल्या हपीसात, " माझा प्रश्न अगदी वेडगळ-पणाचा समजून ती मला उत्तर देऊ लागली, " तुझे मामा नाही का जात हपीसात ? "

" अहो पण काकू, " मी म्हणालो, " मामांचे हपीस मला माहीत आहे; पण शंकररावांचं हपीस मला कुठं माहीत आहे ? "

" म्हणजे ? " ती जरा गोंधळून म्हणाली, " तुझ्या मामांचं हपीस आणि यांचं हपीस वेगळं आहे वाटतं ? सर्व लोक कामाला जातात ते हपीस एकच आहे ना रे ? "

मला हसता हसता पुरेवाट झाली. हपीस नावाची एक भलीमोठी इमारत कोटात असून तिच्यात सर्व नवरे कामाला जातात, अशी त्या भोळ्या बाईची कल्पना होती !

काकूंची हपीसाची कल्पना ऐकून कुणाला हसू आल्यास नवल नाही. भोळ्या आणि अशिक्षितच होत्या त्या; पण जगातल्या मोठमोठ्या गोष्टीसंबंधाने देखील किती तरी 'मी' 'मो' म्हणणाऱ्या माणसांच्या अशाच काहीतरी अस्पष्ट पण ठाम कल्पना असतात. आमचे गणूकाका मला नेहमी म्हणत,

"बाबांनो, कसल्या चळवळी करता? इकडे चळवळी करून होणार काय? तिकडे विलायतेला जाऊन स्वराज्य आणा."

काकांच्या या गप्पा मी बरेच दिवस ऐकून घेतल्या. शेवटी एक दिवशी मी चिडून म्हणालो, "काका, स्वराज्य म्हणजे काय पंचम जॉर्ज बादशहांच्या घरात पडलेलं गाठोडं आहे वाटतं? ते तिकडे जाऊन उचलायचं, आणि काखेत मारून हिंदुस्थानाकडे धूम ठोकायची!"

माणसांच्या काही गोष्टीविषयी अशा अस्पष्ट आणि काहीतरी कल्पना असतात त्याचे मला नवल वाटत नाही. सर्वच माणसे चिकित्सक आणि तत्त्वज्ञानी कुठून असणार? पण मनुष्यस्वभावाची मला खरी गंमत वाटते ती या असल्या अस्पष्ट कल्पनांसाठी मनुष्य केव्हा केव्हा स्वतःचा जीवही ठेचायला सिद्ध होतो त्याची.

गल्या सत्याग्रहाच्या चळवळीत अनेक हालअपेष्टा सोसून, खडतर तुरुंगवास भोगून आलेल्या एका तरुण मुलाला एका वृद्ध गृहस्थांनी एकदा सहज विचारले, "काय रे, एवढे कशाला हाल सोसलेस उगीच?"

आपले खोल गेलेले डोळे त्या वृद्ध गृहस्थाकडे निर्भयपणे रोखून अभिमानाने तो मुलगा म्हणाला, "स्वातंत्र्यासाठी!"

मी जवळच उभा होतो. "स्वातंत्र्य म्हणजे काय रे?" मी किंचित् उपरोधपूर्ण स्वरात त्याला विचारले. तो बिचारा गोंधळून गेला. त्याला उत्तर देता येईना. मला वाईट वाटले. स्वातंत्र्याची व्याख्या त्याला करता येत नव्हती; पण एका उदात्त उद्देशाने तो लढला होता, यात शंका नाही. तसला क्षुद्रमनस्क प्रश्न विचारून त्याच्या अस्पष्ट, पण उदात्त हेतूची अवहेलना करणे रास्त नव्हते. त्याची ती गोंधळलेली मुद्रा पाहून त्याची मी मनापासून क्षमा मागितली.

केव्हा केव्हा या उदारचरित महाभागांच्या अंतःकरणातली कल्पनासृष्टी आणि बाहेरली सत्यसृष्टी यात जमीन-अस्मानाची तफावत पडते; आणि मग मात्र या धीरोदात्त ध्येयवाद्यांच्या आयुर्नाटकाची अत्यंत हृदयविदारक शोककथा होते. वर उल्लेखिलेल्या तरुण मुलाचीच गोष्ट सांगतो. परदेशी दुकानांसमोर सत्याग्रह करून आणि स्वदेशी मालाचा 'उदो' 'उदो' करून आपली मायभूमी स्वतंत्र होईल या दुर्दम्य आशेने त्याने स्वतःच्या जिवाचे रान करून घेतले होते. पुढे लवकरच त्याच्या ध्यानात आले, की त्याच्या आणि त्याच्यासारख्या हजारो

भावनाशील तरुणांच्या अतुल स्वार्थत्यागाचा पुरेपूर फायदा स्वदेशी भांडवलवाल्यांनी घेऊन ते भरपूर गबर झाले होते; पण त्याचा प्रिय देश मात्र होता तिथेच होता. आपले सुखस्वप्न अशा तऱ्हेने डोळ्यांसमोर विरून गेलेले पाहिल्याबरोबर त्या तरुणाच्या दु:खाला पारावार उरला नाही.

यावर कुणी असे म्हणेल, की अशा तऱ्हेच्या काहीतरी अस्पष्ट पण उदात्त कल्पनांनी बेभान होणे, आणि त्याहिपेक्षा पुढे जाऊन त्या कल्पनांसाठी जीव पाखडणे, हे मूर्खपणाचेच नाही का ? असेलही कदाचित ते मूर्खपणाचे. मी नाही म्हणत नाही; पण असली चुकीची अगर बरोबर सुखस्वप्ने पाहण्याची दृष्टीच नसून आयुष्य सुखमय होण्यापेक्षा, विरलेली का होईनात, पण दिव्य सुखस्वप्ने मनमुराद पाहात आयुष्याची होळी झालेली मला परवडेल. तो मूर्खपणा असो की शहाणपणा असो, काहीतरी उदात्त कल्पनासृष्टी डोळ्यांसमोर उभारणे आणि मग त्यासाठी प्राणही अर्पण करण्यास सिद्ध होणे या मनुष्य-स्वभावातल्या चमत्कारिक विशेषाविषयी मला निरतिशय आदरच वाटतो. माणसाच्या माणुसकीची आणि मानवी जीवनाच्या प्रगतीची किल्ली मला वाटते या विशेषातच आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७५८८२५ वि: निबंध
क्रमांक 2123 नों: दि: 29131०7

## ८.
# प्रश्नांची उत्तरे

एक रशियन कादंबरीकार आपल्या एका पात्राचे वर्णन करताना म्हणतो, "काही माणसांना तुम्ही लाख रुपये दिलेत तरी ते त्यांना नको असतात; त्यांना आपल्या प्रश्नांची उत्तरे पाहिजे असतात अशा मूठभर वेडचा पिरांपैकी तो एक होता." कित्येक दिवस आणि कित्येक महिने या वाक्याचा मी विचार करीत होतो, पण मला त्याचा काही बोध होत नव्हता; आणि नंतर एक लहानसा प्रसंग घडला; पण त्यामुळे या साध्या शब्दांचा अर्थ एका क्षणात सूर्यप्रकाशासारखा माझ्या डोळचांसमोर स्पष्ट झाला. माझ्या शेजारीच राहणारा माझा एक मित्र एके दिवशी सकाळी हातात एक वर्तमानपत्र घेऊन माझ्या खोलीत आला, आणि चमत्कारिक चेहेरा करून म्हणाला, "काय जगात एक एक वेडेपीर आहेत पाहा! एका जपानी शास्त्रज्ञाच्या थोडचाशा चमत्कारिक मृत्यूची बातमी आजच्या वर्तमानपत्रात आली आहे. तो म्हणे मनुष्याची हृदयक्रिया बंद पडली तर एखादे औषध टोचून ती पुन: चालू करता यावी म्हणून कित्येक वर्षे आपल्या प्रयोगशाळेत प्रयोग करीत होता. बंद पडलेली हृदयक्रिया पुन: का चालू करता येऊ नये, या प्रश्नाचे उत्तर त्याला पाहिजे होते. शेवटी प्रयोग यशस्वी होऊन एका रसायनाचा शोध त्याला लागला. मनुष्याखेरीज इतर प्राण्यांवर त्याने तो प्रयोग करून पाहिला आणि तो यशस्वीही झाला; पण मनुष्यावर त्याला तो प्रयोग कुणी करू देईना. तेव्हा त्याने स्वत: दुसरे एक रसायन स्वत:च्याच हृदयात टोचून घेऊन आपली हृदयक्रिया बंद पाडली आणि आपल्या विद्यार्थ्याला ते नवीन रसायन आपल्या हृदयात टोचून हृदयक्रिया पुन: चालू करण्याचा प्रयोग करावयास सांगितले. ते टोचताना त्या विद्यार्थ्याच्या हातून काही चूक झाली आणि ह्या शोधासाठी वेडचा झालेल्या शास्त्रज्ञाची हृदयक्रिया बंद पडली ती कायमचीच बंद पडली!"

ही हकीकत ऐकून आज कित्येक दिवस माझ्या डोक्यात कोडे होऊन बसलेल्या त्या कादंबरीकाराच्या शब्दांवर लख्ख प्रकाश पडला – "काही माणसांना तुम्ही लाख रुपये दिलेत तरी ते त्यांना नको असतात; त्यांना आपल्या प्रश्नांची उत्तरे पाहिजे असतात." अगदी खरे आहे. त्या जपानी शास्त्रज्ञाला वेडा म्हणून हसणारा माझा तो शेजारी लाख रुपयांवर खूष होणाऱ्या असंख्य सामान्य माणसांपैकी एक होता; तो जपानी शास्त्रज्ञ आपल्या प्रश्नाच्या उत्तरासाठी लाख रुपयांवरच काय, पण स्वतःच्या प्राणांवरही निःशंकपणे पाणी सोडणाऱ्या जगातल्या हातावर मोजण्याइतक्या थोडच्या माणसांपैकी एक माणूस होता! जगातले सारेच थोर तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ प्रश्नाच्या उत्तरासाठी जीव पाखडणारे वेडेपीर असतात.

प्रश्नाच्या उत्तराकरिता किंवा भौतिक शोधाकरिता एखादा शास्त्रज्ञ जिवाचे रान करतो, त्याचे इतके आश्चर्य वाटत नाही. बंद पडलेली हृदयक्रिया पुनः चालू करता आली, तर मानवजातीवर अपरिमित उपकार होतील; पण सामान्य माणसांना अत्यंत आश्चर्य वाटते ते तत्त्वज्ञांचे. तत्त्वज्ञांचे प्रश्न काय, तर मनुष्य जन्मालाच का आला ? सर्वसाधारण मनुष्य म्हणेल, "करायचे आहे काय या प्रश्नाचे उत्तर शोधून ? जन्माला आलो खरे आणि एक दिवशी मरणार हेही खरे. मग हवी कशाला उगाच आटापीट जन्माला का आलो आणि मरणार का याची ?" वरवर विचार करता ही विचारसरणी अत्यंत सयुक्तिक वाटते; पण मनुष्यस्वभावाचा किंचित सूक्ष्म अभ्यास केल्यास अगदी उलटा अनुभव येतो. प्रत्येक मनुष्याला या आणि असल्या प्रश्नांची उत्तरे पाहिजे असतात. एखाद्या थोर तत्त्वज्ञाइतकी असामान्य बुद्धिमत्ता आणि बुद्धीच्या समाधानासाठी अलौकिक स्वार्थत्याग करावयाची तयारी नसल्यामुळे सामान्य मनुष्य या प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरिता धडपड करताना दिसत नाही; आणि कोल्ह्याला ज्याप्रमाणे द्राक्षे आंबट वाटली त्याप्रमाणे तत्त्वज्ञांच्या या असामान्य धडपडीला शुद्ध वेडेपणा असे मोठ्या आढ्यतेने म्हणून तो हसतो. एकच उदाहरण मी देतो. स्वतःला सुशिक्षित आणि आधुनिक म्हणवणारे आपण सर्वजण ज्योतिष्यांना आणि भविष्याला हसतो आणि त्यांची टर उडवतो; पण आपणांपैकी प्रत्येकजण आपल्या राशीचे भविष्य चोरून पाहात असतो. आपण दुसऱ्याला फसवतो—इतकेच नव्हे, तर आपण स्वतःलासुद्धा फसवीत असतो. आपण आपल्याच मनाला सांगतो, की या भविष्यात काही विशेष तथ्य नाही, पण थोडा वेळ आपली करमणूक म्हणून पाह्यचे. खरोखर, मनातल्या मनात आपले भविष्य जाणण्याची प्रत्येक माणसाला अत्यंत तीव्र जिज्ञासा असते. का ? एक दिवस जन्माला आलो आणि एक दिवस नक्की मरणार हे जर आपणाला माहीत आहे, तर भविष्य जाणण्याची ही अनिवार उत्कंठा का ? खरी गंमत अशी आहे, की एखादी गोष्ट अपरिहार्य आहे, हे माहीत असूनही ती का अपरिहार्य आहे हे जर आपणाला कळले तर एक प्रकारचे उच्चतम समाधान

मिळते. एखादा दांडगट इसम आपणाला अचानक मारू लागला, तर आपण पहिला प्रश्न असा विचारतो की, " अरे बाबा, का मारतोस ? " तो मारणार ही आपणाला खात्री असते, आपण त्याला निवारू शकत नाही हेही आपणाला समजते; तरी पण तो आपणाला का मारतो, याचे कारण समजण्याची आपणाला अनिवार इच्छा होते. अपरिहार्यतेच्या कारणाचे ज्ञान होणे, हेच दुःखातही एक प्रकारचे अपूर्व सुख वाटते. म्हणूनच एक तत्त्वज्ञानी म्हणतो, की " अपरिहार्यतेची जाणीव हीच मानवी मनाची खरी स्वातंत्र्यप्राप्ती. "

आपण एकदा जन्माला आलो आणि मरणार, हे खरे; पण त्यातल्या त्यात का जन्माला आलो आणि का मरणार हे कळले, तर आपण एक प्रकारच्या उच्चतम समाधानाने मरणार नाही का ?

तत्त्वज्ञ जीव पाखडीत असतात ते याच समाधानासाठी.

* * *

९.

# सुखस्वप्नांचे कारखानदार....!

मोठ्या हुद्द्यावर असलेल्या माझ्या एका मित्राला एकदा मी सहज भेटावयाला गेलो होतो. त्या वेळेला त्याच्या बरोबरचे दोन-तीन हुद्देदार गृहस्थ, एक बॅरिस्टर, एक प्रख्यात डॉक्टर, वगैरे बरीच मोठमोठी मंडळी त्याच्याबरोबर बोलत बसली होती. मी आत शिरल्याबरोबर साहजिकच शिष्टाचाराप्रमाणे माझ्या मित्राने त्या सर्वांशी माझी ओळख करून दिली; आणि मोठ्या अभिमानाने माझ्याकडे पाहात तो सांगू लागला, "हा कविता लिहितो..." हे वाक्य उच्चारल्याबरोबर त्या इतर थोर मंडळींनी अशा तऱ्हेने 'हूं ' म्हटले, की असली क्षुल्लक गोष्ट तुम्ही सांगता काय आणि आम्ही ऐकायची काय ? नंतर चहापाण्याच्या, जमीनजुमल्याच्या खरेदीच्या वगैरे महत्त्वपूर्ण गोष्टी सुरू झाल्या. मी मात्र अगदी शरमल्यासारखा झालो. माझा मित्र ती गोष्ट बोलला नसता तर बरे झाले असते, असे मला वाटले. मी स्वतःच्या मनाची खात्री करून देऊ लागलो, की कविता करतो त्यात लाज वाटण्यासारखे काय आहे ? माझ्या मित्राने मी कोणाच्या मुंड्या मुरगळतो किंवा खिसे कातरतो, असे थोडेच सांगितले ? कवी म्हणवून घेण्यात लाज कसली आली आहे ! शेक्स्पीअर, शेले, कालिदास, कलापी यांच्याच जातीचा प्राणी मी ठरत नाही का ? ही कल्पना आल्याबरोबर माझे मलाच हसू आले. एखाद्या ब्राह्मण पाणक्याने किंवा आचाऱ्याने सबंध हिंदुस्थानवर सत्ता गाजविणाऱ्या पेशव्यांसारखाच मी सुद्धा चित्पावन ब्राह्मण आहे, अशी हास्यास्पद तुलना करण्यासारखीच माझी वरील कल्पना होती !

थोडा खोल विचार करता मला त्या मंडळींनी दाखविलेल्या कवीच्या किंवा लेखकाच्या बाबतीतल्या उपेक्षावृत्तीचे विशेष आश्चर्य वाटले नाही; पण मी त्या वेळेला शरमल्यासारखा झालो, या गोष्टीची मला मात्र राहून राहून शरम वाटू

लागली. समाजाच्या या मजबूत आधारस्तंभांसमोर समाजाचा आपण एक अगदीच अनुपयुक्त घटक आहोत, अशी भावना क्षणभर का होईना, पण माझ्या मनाला चाटून गेली असावी, हीच गोष्ट माझ्या त्या शरमण्याच्या मुळाशी असावी, असे मला वाटते. कवीला अगर लेखकाला शर्रामिधे होण्याचा प्रसंग येतो, तो समाजाच्या इतर घटकांप्रमाणे त्याला स्वतःच्या व्यवसायाची दुसऱ्यांना आणि केव्हा केव्हा स्वतःलासुद्धा उपयुक्तता पटवून देता येत नाही म्हणूनच. कलेकरिता कलेचा कुणी कितीही आक्रोश करो, उपयुक्तता हीच मानवी जीवनात कुठल्याही गोष्टीची अंतिम कसोटी होय.

अशा अस्वस्थ मनःस्थितीत असतानाच एका तरुण अमेरिकन लेखकाची एक कादंबरी मी वाचायला घेतली. प्रस्तावनेत त्याने स्वतःविषयी सांगितलेली एक गोष्ट वाचून माझा हर्ष गगनात मावेना. त्याच्यावरही माझ्यासारखाच एक शरमण्याचा प्रसंग आला होता. एखाद्या नापास झालेल्या मुलाला आपल्याबरोबरीचे दोघे-तिघे मित्रही नापास झाले आहेत, हे कळल्यावर जसा आनंद होतो, तसाच तो प्रसंग वाचून मलाही आनंद झाला. असल्या आनंदात काही दुष्टपणा असतो, असे मला वाटत नाही; पण मानवी मनाचा हा एक दुबळेपणा आहे खरा. त्या लेखकाला एक गृहस्थाने सहज विचारले, " की कादंबऱ्या लिहिण्याचा स्वतःचा व्यवसाय आहे हे सांगा वयाला तुला लाज वाटत नाही करता ?"

तो तरुण लेखक क्षणभर गोंधळून गेला; पण नंतर त्याने दिलेले उत्तर मात्र त्या गृहस्थाला निरुत्तर करून टाकणारे होते. तो लेखक म्हणाला, " तुम्ही काय धंदा करता ?"

" मी अॅस्पिरीनच्या गोळ्या विकतो. " त्या गृहस्थाने उत्तर दिले.

" मग अॅस्पिरीन विकण्याच्या धंद्याची तुम्हाला लाज वाटते काय ?"

" छे, छे ! लाज कसली ? माणसांना अत्यंत उपयुक्त अशा एका पदार्थाचा मी पुरवठा करतो, याचा मला अभिमान वाटतो." तो गृहस्थ उत्तरला.

" अस्सं ! मग मानवाला अत्यंत जरूर असलेल्या सुखस्वप्नांचा मी पुरवठा करतो, आणि त्याचा मला तुमच्यापेक्षाही अभिमान वाटतो " तो लेखक म्हणाला, " कारण, एक वेळ अॅस्पिरीनच्या गोळ्यांशिवाय माणसाचे चालेल, पण माणसांत व इतर जनावरांत फरक हाच, की इतर प्राण्यांप्रमाणे माणूस खातो, पितो, औषधे घेतो; पण इतर प्राण्यांपेक्षा त्याला आणखी एका गोष्टीची अत्यंत जरूर भासते आणि याचमुळे तो इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ ठरतो. मानवी प्राण्याला केव्हा केव्हा सुखस्वप्नात रंगून जावेसे वाटते. तुमच्या व्यापारी भाषेत सांगावयाचे म्हणजे त्या सुखस्वप्नांचा मी कारखानदार आहे, समजला ?"

त्या लेखकाचे उत्तर मोठे खोचदार आणि व्यवहारकुशल आहे, यात शंका नाही; पण मला त्या लेखकाच्याही पुढे जावेसे वाटते. ललित लेखकाने निर्माण

केलेली आणि पुस्तकाच्या दोन पुठ्ठ्यात धरून ठेवलेली रंगीत सुखस्वप्ने मानवी मनाला क्षणभर गुंगवून विरंगुळा देण्याइतकेच कार्य करतात का ? कल्पनेच्या कुंचल्याने रंगविलेल्या आणि फक्त मनाच्या डोळ्यांना दिसणाऱ्या क्षणजीवी सामान्य सुखस्वप्नांत आणि ललित लेखकाच्या अंतःकरणात स्फुरलेल्या आणि त्याच्या लेखणीने चितारलेल्या चिरंतन सुखस्वप्नांत तुलनाच नाही. क्षणभंगुर सुखस्वप्नांचे गुंगवून टाकणारे तरल सौंदर्य ललितकृतीत असतेच असते, पण अगम्य मानवी जीवनाचा प्रतिभेच्या प्रकाशाने सुगम्य केलेला एक जिवंत खंड तिच्यात असतो. ललितकृती म्हणजे जीवनातला जिवंत धगधगीतपणा, पण त्यातली अगम्यता नाही; आणि सुखस्वप्नातले तरल सौंदर्य, पण त्यातली क्षणभंगुरता नाही ! कागदाच्या कपट्यावर कायम ठसविलेली ही सुखस्वप्ने आजच्याच मानवाने नव्हे, तर उद्याच्या मानवानेही वाटेल तेव्हा मन मानेल तशी अवलोकावी आणि आपले अपुरे मानवी जीवन पूर्णांशाने जगावे. उपयुक्तता हीच जर मानवी व्यवहारात अंतिम कसोटी असेल तर ललित लेखकाला स्वतःची लाज वाटायला तर नकोच नको, पण अवनीतलावर कुठेही ताठ मान करून चालावयाचा अधिकात अधिक अधिकार त्यालाच आहे !'

* * *

१०.

# अपवादांचे उपयोग

'गलिव्हरचा प्रवास' हे पुस्तक ज्याने लहानपणी वाचले नसेल असा एक तरी मनुष्य मिळेल की नाही याची मला शंका वाटते. या पुस्तकाचा लेखक डीन् स्विफ्ट याचे चरित्र मी काही दिवसांपूर्वी वाचीत होतो. 'गलिव्हरच्या प्रवासा'-इतकेच त्याच्या लेखकाचेही चरित्र मनोरंजक आहे.

लिलिपुट् देशात गलिव्हर गेला, तेव्हा माणसाच्या आंगठयाएवढे त्या देशातले रहिवाशी त्याच्या हातापायावर खेळू लागले; किंवा तो ब्रॉब्डिंग्नॅग शहरात गेला तेव्हा तिथले अजस्र नागरिक गलिव्हरलाच अक्षरश: हाताच्या बोटांवर खेळवू लागले, ही वर्णने वाचताना लहानपणी आपणाला खूपच खूप गंमत वाटत असे; पण या गमतीदार वर्णनातून डीन् स्विफ्टने एकंदर मानवी मनाच्या मूर्खपणावर आणि लहानसहान क्षुद्रपणावर अत्यंत तिखट आणि उपरोधपूर्ण टीका करून मानवावर मर्मभेदक कोरडे ओढले आहेत, हे आपणांपैकी कितीजणांच्या लक्षात आले असेल ?

डीन् स्विफ्टचे चरित्र वाचताना जीवनातल्या कटु अनुभवांनी त्याची लेखणी जितकी जहरून गेली होती, तितकेच त्याचे अंत:करणही कडवटून गेले होते, ही गोष्ट ताबडतोब ध्यानात येते. त्याच्या काळच्या लोकांत तो एक अत्यंत माणूस-घाण्या आणि एकलकोंडा गृहस्थ म्हणून ओळखला जात असे. तो सदैव दुर्मुखलेला असून एखाद्या जखमी जनावराप्रमाणे स्वत:ला एकान्तवासात कोंडून घेत असे. या थोर लेखकाचे सर्वच काही लोकविलक्षण होते, पण एका गोष्टीमुळे त्याचे समकालीन त्याला कमालीचा विक्षिप्त समजत. इतर लोक आपला जन्मदिवस

इष्टमित्रांना मेजवान्या देऊन मोठ्या आनंदाने साजरा करतात. डीन् स्विफ्ट आपल्या जन्मतिथीच्या दिवशी सुतक्यासारखे काळे कपडे घालून तो दिवस शोकदिन म्हणून पाळीत असे !

लोक त्याला एक विक्षिप्त आणि अपवादात्मक मनुष्य म्हणोत, पण त्याच्या या कृत्यामुळे मला तो एक खराखुरा तत्त्ववेत्ता आणि द्रष्टा वाटतो. खऱ्या तत्त्ववेत्याच्या दृष्टीने पाहिल्यास आपला प्रत्येक जन्मदिवस म्हणजे आपले एकंदर आयुष्य एका वर्षाने कमी झाले, हे दाखविणारा आयु:पथावरील स्मारकस्तंभच नाही काय ? न चुकता एका एका वर्षाने मृत्यूच्या जबड्याजवळ अधिकाधिक नेणारा जन्मदिवस हा विचारी मनाला शोकदिन वाटल्यास नवल काय ?

माझे असे मुळीच म्हणणे नाही, की दिवसेंदिवस आपण मृत्यूच्या अधिकाधिक जवळ जात आहोत म्हणून प्रत्येक माणसाने सदैव सुतक्यासारखे दुर्मुखलेले राहून आपला प्रत्येक जन्मदिवस मरणतिथीसारखा पाळावा; मला तर उलट असे वाटते, की या सुंदर जगात आपणाला मोजकेच दिवस काढावयाचे आहेत या तीव्र जाणिवेनं ते जितके कमी होत जातील तितके आपण शक्य तेवढा या जगातला अधिकच आनंद लुटण्याचा प्रयत्न करून आपले परिमित आयुष्य पूर्णत्वाने जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा नियम स्विफ्टसारख्या एखाद्या अपवादामुळे अधिकच सिद्ध होतो.

अपवादामळे नियम सिद्ध होतो, शोध हा लावणारा माणूस मला खरोखरच कमालीचा शहाणा वाटतो. अपवादांचा उपयोग काय, असे जर मला कुणी विचारले तर मी त्याला चट्‌दिशी उत्तर देतो, की अतिपरिचित नियमाच्या अंधारकोठडीत खितपत पडलेले सत्य अपवादाच्या चिमुकल्या झरोक्यातूनच दृष्टीला पडते. दर वाढदिवसाला आपण अधिकाधिकच जगतो आहोत या आनंदाने आपण तो दिवस साजरा करतो; आणि त्यात वाईट किंवा चुकीचे असे काहीच नाही; पण आपण जगतो आहोत, म्हणजे मरतो आहोंत; क्षणाक्षणाला श्वास सोडतो आहोत म्हणजे खरोखर श्वासोच्छ्वासाबरोबर आपण काळाच्या जबड्यात खाली खाली सरकत आहोत, हे विरोधात्मक सत्य डीन् स्विफ्टसारख्या एखाद्या अपवादामुळेच आपल्या डोळ्यांसमोर उभे राहात नाही काय ?

प्रतिभा नेहमीच अपवादात्मक असते. इतरेजनांना जे दिसत नाही ते प्रतिभासंपन्न मानवाला दिसते. स्विफ्ट हा एक प्रतिभावान लेखक होता. इतरांच्या डोळ्यांना न दिसणारे एक कठोर सत्य त्याच्या प्रखर प्रतिभेला दिसले आणि दारुण दु:खाने त्या कलावंताचे अंत:करण करपून गेले. या थोर लेखकाला विक्षिप्त म्हणून हसावयाचे, की एका भव्य सत्याचे यथार्थ दर्शन दिल्याबद्दल मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करावयाची ?

* * *

# ११.

# कलेचा परीस

काही दिवसांपूर्वी एका मित्राशी माझा मोठा कडाक्याचा वादविवाद झाला. अर्थात त्याला वादविवाद म्हणण्यापेक्षा वितंडवाद म्हणणेच अधिक शोभेल. आमच्या वादाचा विषय काय, तर रवींद्रनाथ टागोर मोठे की लोकमान्य टिळक मोठे! खरे पाहू गेल्यास ही दोनही माणसे आपापल्या क्षेत्रांत आपापल्यापरीने मोठी आहेत, आणि हा भलताच वितंडवाद करणारे आम्ही दोघेही महामूर्ख होतो; पण असला मूर्खपणा आपण कितीतरी वेळा करतो. आम्ही अगदी हमरीतुमरीवर आलो होतो. माझा मित्र माझ्या अंगावर ओरडून म्हणाला, "अरे, तुझ्या टागोरांना आमच्या टिळकांवर काव्यं लिहावी लागतील!"

"टागोर एखाद्या उंदराच्या पिल्लावरसुद्धा सुंदर काव्य लिहितील. म्हणजे काही उंदराचे पिल्लू टागोरांपेक्षा श्रेष्ठ ठरत नाही!" मी त्याला शांतपणे उत्तर दिले, "टिळकांचा अपमान करण्याचा माझा उद्देश नाही; पण कवीपेक्षा काव्याचा विषय अधिक मोठा ठरू लागला, तर दगडाच्या मूर्ती घडविणाऱ्या कलावंतापेक्षा दगडच श्रेष्ठ ठरावयाचा!"

माझे हे उत्तर ऐकून माझा मित्र थिजूनच गेला.

आमचा हा वाद मूर्खपणाचा होता, यात शंकाच नाही. वाङ्मयक्षेत्रात टागोर ही जेवढी श्रेष्ठ व्यक्ती आहे तेवढीच राजकारणात टिळक ही थोर विभूती आहे; पण या वादाचा शेवट करताना मी वर जो युक्तिवाद केला त्यामुळे एक नवीनच विचार माझ्या मनात आला. टागोर परमेश्वरावर जितक्या सफाईने एखादी कविता लिहितील, तितक्याच सफाईने एखाद्या उंदराच्या पिल्लावरही कविता लिहू शकतील, ही गोष्ट अगदी खरी आहे. इतकेच नव्हे, तर या दोन्ही कविता श्रेष्ठ दर्जाच्या कलाकृती ठरू शकतील. एक कविता उंदरासारख्या क्षुल्लक प्राण्या-

वर आहे म्हणून ती कमी दर्जाची आणि दुसरी प्रत्यक्ष परमेश्वरावर आहे म्हणून ती उच्च दर्जाची असे मुळीच होणार नाही. मला मौज वाटली ती याच गोष्टीची की कलेच्या राज्यात उंदीर आणि परमेश्वर एकाच दर्जाचे !

मला वाटते, कला ही परीसासारखी आहे. ज्याप्रमाणे परीसाने लोखंडाला स्पर्श केला की त्याचे सोने होते, त्याचप्रमाणे विषय क्षुद्र असो अगर महान असो, श्लील असो अगर अश्लील असो, कलेने त्याला स्पर्श केला, की सौंदर्याची निर्मिती झालीच पाहिजे.

म्हणूनच अश्लील कला किंवा अश्लील वाङमय हा शब्दप्रयोगच मला चुकीचा वाटतो. अश्लील म्हणजे असुंदर; आणि जी कला सौंदर्य निर्माण करीत नाही ती कलाच नव्हे. अर्थात ती अश्लील असेल तर कलाच होऊ शकत नाही; आणि कला असेल तर ती अश्लील होऊ शकत नाही !

एखाद्या कलाकृतीवर किंवा वाङमयकृतीवर 'अश्लील' म्हणून छापा मारणारे निर्बुद्ध टीकाकार चूक करतात ती हीच. विषय अश्लील असला की यांच्या मते ती कृती अश्लील झाली. जीवनात अश्लील किंवा असुदर गोष्टी खूप असतील, पण कलेच्या राज्यात त्यांचा प्रवेश झाला की त्या सुंदर होतात, एवढीच गोष्ट हे लोक अचूक विसरतात. एखाद्या कादंबरीकाराने शहराच्या गलिच्छ भागाचे यथातथ्य वर्णन केलेले असले तर ते वर्णन घाणेरडे आहे, आणि एखाद्या फुलबागेचे वर्णन केलेले असले तर ते सुंदर आहे, असे आपण म्हणत नाही. दोन्ही वर्णनांना ती कलापूर्ण असतील तर आपण सुंदरच म्हणतो. हीच गोष्ट अश्लीलतेची. एखाद्या गोष्टीत शरीराच्या अश्लील गणल्या जाणाऱ्या एखाद्या भागाचे वर्णन आहे म्हणून केवळ ती गोष्ट अश्लील ठरणार नाही. ती जर कलापूर्ण म्हणजे डोळ्यांना दिसणारे म्हणा अगर मनाला प्रतीत होणारे म्हणा, कसलेही सौंदर्य निर्माण करणारी असेल, तर ती सुंदर म्हणजे श्लील ठरणार. एखाद्या स्त्रीच्या उरोभागाचे एखाद्याने विनाकारण पाल्हाळिक वर्णन केले तर ते अश्लील ठरेल, पण तेच मॅक्झिम् गॉर्कीसारख्या एखाद्या कलावंताने उदात्त अगर सुंदर भावना निर्माण करण्याकरिता केले तर त्याला कोण अश्लील म्हणेल ? आपल्या एका लघुकथेत गॉर्कीने एका भिकारणीच्या उरोभागाचे अत्यंत सूक्ष्म आणि तपशीलवार वर्णन केलेले मला आठवते. त्या भिकारणीच्या हीन, दीन परिस्थितीचे करुणाजनक चित्र रंगविताना तिच्या फाटक्या लक्तरांतून ती आपला स्तन लपविण्याचा प्रयत्न करीत असताही लपविल्या न जाणाऱ्या तिच्या शुष्क स्तनाग्राचे समर्पक वर्णन करून, तिचे भुकेने व्याकुळ झालेले अर्भक त्या स्तनाकडे पाहून पाहून रडते आहे; आणि तो दुग्धहीन, शुष्क स्तन आपल्या बाळाला दिसून त्याने अधिक रडू नये म्हणून तो लपविण्याचे त्या गरीब बाईचे केविलवाणे प्रयत्न चालले आहेत, असे अत्यंत हृदयविदारक चित्र गॉर्कीने रेखाटले आहे. अश्लीलतेच्या लोखंडाला कलेच्या परीसाने स्पर्श केला की सौंदर्यरूपी सोने निर्माण होते ते असे.

* * *

१२.

# धावती गाडी

परवाच एक दूरचा आगगाडीचा प्रवास करून मी परत आलो. त्या प्रवासातल्या एका गमतीची आठवण झाली की मला अजूनही हसू कोसळते. गाडी स्टेशनात उभी असता एक म्हातारे गृहस्थ आपला प्रार्तविधी उरकण्याकरिता गाडीतल्याच शौचकूपात गेले होते. ते शौचकूपातून बाहेर यायला आणि भोंगा वाजून गाडी स्टेशनच्या बाहेर हालायला एकच गाठ पडली. कपडे सावरता सावरता गाडी सुटलेली पाहून एकदम मोठ्या सुटकेचा श्वास टाकून ते गृहस्थ आजूबाजूच्या लोकांकडे पाहून शहाणपणाने म्हणाले, 'वेळेवरच बाहेर आलो म्हणायचा ! नाहीतर मी आपला आत राह्यलो असतो, आणि गाडी सुटून गेली असती !'

त्यांचे हे उद्‌गार ऐकून सर्व मंडळी पोट धरून हसू लागली. जेव्हा त्यांच्या ध्यानात आले, की आपण गाडीतल्याच शौचकूपात गेलो होतो आणि गाडी सुटली असती तरी आपण गाडीतच राहिलो असतो, तेव्हा तेही आमच्याबरोबर हसू लागले !

चालत्या गाडीच्या शौचकूपातून बाहेर आल्याबरोबर सुटल्यासारखे वाटणे ही गोष्ट हास्यास्पद तर खरीच; पण अशा हास्यास्पद गोष्टी आपण थोड्या का करतो ? तत्त्वज्ञानाचा आव आणून आपण या गोष्टी जरा मोठ्या प्रमाणावर करतो इतकेच; आणि मग मात्र आपणाला त्या हास्यास्पद वाटत नाहीत. जगाचा काही कारणाने कंटाळा आला म्हणजे काही लोक 'कंटाळलो बुवा ह्या जगाला; आपण कुठं तरी दूर निघून जाणार !' असे म्हणून खरोखरच कुठे तरी दूर निघून जातात. ते फक्त एवढेच विसरतात, की आपण कितीही दूर निघून गेलो तरी जगातच असतो, आणि

जे व्याप चुकवण्याकरिता आपण जगातून दूर निघून जातो ते व्याप जगात आपण कुठेही गेलो तरी मागे लागतातच. माझ्या ओळखीच्या एका गृहस्थाचे असेच झाले. हिंदुस्थानात प्रेमभंग झाल्यामुळे तो अगदी मनापासून विटला, आणि स्त्रीचे पुन्हा नाव नको असा निश्चय करून सापडली ती नोकरी धरून आफ्रिकेला निघून गेला. थोडयाच दिवसांनी मला बातमी मिळाली की तिकडल्या ऑफिसात काम करीत असलेल्या एका सुंदर टायपिस्ट मुलीशी त्याचा विवाह झाला म्हणून ! आणि तो स्त्रीचे पुन्हा नावही घेणार नव्हता !

जीवनाच्या धकाधकीतून अशा तऱ्हेने पळून जाण्याचा प्रयत्न करणे, म्हणजे धावत्या गाडीतल्या मागल्या डब्यात बसलेल्या माणसाने गाडीतून सुटून जाण्याकरिता पळत पळत पुढल्या डब्यात जाण्यासारखे आहे !

धावत्या गाडीतून अजिबात सुटून जाण्याचा मार्ग म्हणजे गाडीतून बाहेर उडी टाकणे, किंवा सरळ बोलायचे म्हणजे आत्महत्या करणे. आणि जीवनाच्या धावत्या गाडीतून सुटून जाण्याकरिता बरेच लोक हा आततायी मार्ग स्वीकारतातही. हा मार्ग आततायीपणाचा असेल; फार काय, तो भ्याडपणाचाही असेल; पण चालत्या गाडीतून सुटून जाण्याचा तो एकमेव मार्ग आहे यात मात्र शंका नाही. या लोकांवर भ्याडपणाचा किंवा आततायीपणाचा आरोप करता येईल; पण मागल्या डब्यातून पुढल्या डब्यात जाऊन, किंवा जगाच्या एका भागातून दूर कुठेतरी दुसऱ्या भागात जाऊन 'सुटलो' म्हणून स्वतःची फसवणूक करून घेणाऱ्या हास्यास्पद लोकांप्रमाणे वेडगळपणाचा आरोप मात्र त्यांच्यावर मुळीच करता येणार नाही. आपला मार्ग अचूक पाहण्याची कुशाग्र बुद्धी आणि तीक्ष्ण दृष्टी यांच्याजवळ असते खास.

आणि मानवी जीवन धावत्या गाडीसारखेच आहे, नाही तर काय ? या गाडीतले आम्ही प्रवासी एकमेकांपेक्षा स्वतःला मोठे समजतो, आणि मनात मोठी ईर्ष्या धरून मागल्या डब्यातून पुढल्या डब्याकडे पळत एकमेकांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करतो ! पुढे गेलेला स्वतःला मोठा वीर समजतो, आणि मागल्याकडे पाहून तुच्छतेने हसतो ! पण आपण सर्वजण एकाच गाडीतून चाललो आहोत आणि ही गाडी कुठे चालली आहे हे कुणालाच माहीत नाही याची या वीराला यत्किंचित्ही जाणीव नसते ! हे असे काहीतरी विचार मनात आले की मला अगदी उदासवाणे वाटते, आणि मी निराशावादी होतो. खरंच, हे विचार मनात येऊ देता कामा नयेत; पण अशा विचारांना टाळण्याचा प्रयत्न करणे म्हणजेसुद्धा तिकीट इन्स्पेक्टरला चुकविण्याकरिता चालत्या गाडीतल्या एका डब्यातून दुसऱ्या डब्यात जाऊन बसण्यासारखे आहे हे मी विसरलोच !

* * *

१३.

## एक आणि एक तीन !

त्या दिवशी स्वतःवर आणि यच्चयावत् जगावर मी अगदी खूश होतो. सर्व गोष्टी माझ्या मनासारख्या झाल्या होत्या, आणि जगात उणीव म्हणून मला कसली भासत नव्हती. मला वाटते, स्वतःशी हसत हसत मी शीळसुद्धा घालीत होतो. असेन ! ट्राममध्ये बसून सकाळच्या प्रहरी मी कुठेतरी जात होतो. इतक्यात दुःखीकष्टी चेहऱ्याच्या एका भिकाऱ्याने आर्त स्वरात माझ्याकडे भीक मागितली. तावडतोब मी खिशात हात घातला आणि त्या भिकाऱ्याला एक सबंध पैसा देऊन टाकला ! परोपकारी म्हणून माझी कधीच ख्याती नव्हती; पण त्या दिवशी सकाळी माझे मन इतक्या उदात्त वातावरणात वावरत होते की कसलाही विसंवादी सूर म्हणून मला जगात नको होता. तो पैसा दिल्यावर तर मला माझे मन अधिकच उंच गेल्यासारखे वाटले. श्रीकृष्ण परमात्मा किंवा भगवान् बुद्ध यांच्या चित्रात त्यांच्या डोक्यांभोवती जसे एक तेजोवलय असते तसलेच तेजोवलय माझ्याही डोक्याभोवती त्या क्षणी तरळत असावे असे मला वाटले, आणि ट्राममधले सगळे लोक सकौतुक आदराने माझ्या डोक्याकडे पाहात असतील म्हणून हसतमुखाने मी आजूबाजूला पाहिले ! मला या क्षणाला जसे वाटते आहे तसेच कायमचे वाटणे म्हणजे मनाचा मोठेपणा किंवा महात्मेपणा, असे मला वाटले. एखाद्या महात्म्याला ‘तुला नेहमी असेच वाटते काय ?’ असा प्रश्न जाऊन विचारावा असाही विचार माझ्या मनात आला; पण या प्रश्नाचे उत्तर देईल तो महात्मा कसला ? स्वतःच्या मोठेपणाची जाणीव असणे हा मुळी मोठेपणाच नव्हे !

सामान्य माणसे आणि मोठी माणसे यांतला फरक हाच की आमच्या मनात

केव्हातरी चुकून असे क्षण उद्भवतात, आणि मोठ्या माणसांची मने चोवीस तास या उंच पातळीवर तरळत असतात ! मी मनाशी निश्चय केला, की बस्स, आता या क्षणाला माझे मन ज्या उदात्त भूमिकेवर आहे तिच्यावरून त्याला खाली म्हणून येऊ द्यायचे नाही. मला वाटते, माझ्या डोक्याभोवतालचे ते तेजोवलय या क्षणाला अधिकच उजळले असावे ! इतक्यात ट्रामचा कंडक्टर तिकीट मागायला आला, आणि तिकीटाकरिता त्याला मी दिलेला आणा थोडा गुळगुळीत आहे म्हणून माझ्याशी हुज्जत घालू लागला. मी चिडून खूप वादविवाद केला, पण तो दांडगट माणूस दुसरा आणा घेतल्याशिवाय तेथून हालेना. शेवटी मनातून असंख्य शिव्या मोजीत मी त्याला दुसरा आणा दिला. ते तेजोवलय, ते उदात्त वातावरण पार पळाले होते ! क्षुद्र बाजारी वृत्तींनी माझे मन भरून गेले होते. एक आणा फुकट गेला म्हणून माझा जीव बेचैन झाला होता. आपला उदात्त निश्चय एका क्षणात खाली कोसळलेला पाहून मला आश्चर्य वाटले; आणि माझे मलाच हसू आले. तेव्हापासून मी निश्चय केला, की कसला निश्चय म्हणून करायचा नाही ! आपणाला काही महात्मा होणे शक्य नाही !

आम्ही सारे आयुष्याचे वेळापत्रक तयार करतो; पण आमच्या स्वतःच्या मनाचासुद्धा आम्हाला थांग नसतो ! आणि त्या वेळापत्रकाचा असा हा विचका होतो ! मानवाने आतापर्यंत निसर्गावर अनेक विजय मिळविले आहेत; पण त्याच्या स्वतःच्या मनोविश्वात आणि बाहेरल्या भौतिक विश्वात इतक्या अज्ञात पण प्रभावशाली अशा शक्ती अजूनही वावरत आहेत, की त्याने मोठ्या काळजीपूर्वक रचलेले निश्चयांच्या पत्त्यांचे बंगले त्या एका फुंकरीने ढासळून टाकतात ! यावर मला कुणी म्हणेल, की स्वतःच्या असहाय्यतेची इतक्या तीव्रतेने जाणीव करून देणाऱ्या तुमच्या या दैववादी तत्त्वज्ञानाप्रमाणे माणसे जर चालायला लागली, तर जगात काही करायलाच नको. कुठल्या क्षणाला मृत्यू येईल याचा नेम नसल्यामुळे उद्या काय करायचे ते सुद्धा माणसाने ठरवू नये की काय ? किंवा अचानकपणे धरणीकंप होतो म्हणून कुणी घरेच बांधू नयेत की काय ? या आरोपांचा मी जोराने इन्कार करतो. माझे असे मुळीच म्हणणे नाही, की ' होणारे न चुकेल होइल जरी ब्रह्मा तया आडवा ' या महामंत्राचा जप करीत माणसांने काही न करता भवितव्याची वाट पाहात स्वस्थ बसावे; आणि माझ्यासारख्याने कितीही सांगितले तरी मनुष्यप्राणी असला उपदेश थोडाच ऐकणार आहे ? तसे असते तर मानवजातीची आतापर्यंत झाली आहे ही प्रगती झालीच नसती. मनुष्य जंगलात उड्या मारणारा माकडच राहिला असता !

माझे म्हणणे इतकेच की उथळ उत्साहाच्या आहारी जाऊन आपण स्वतःविषयी आणि जगाविषयी भलत्याच अपेक्षा करतो – काहीतरी अवास्तव निश्चय करून आखीव आडाखे बांधतो, आणि एक नी एक दोन, बे दुणे चार या गणिती

नियमांनी बांधलेले जीवनासंबंधाचे आमचे आडाखे खरे झाले नाहीत, की मग तोंड कडू करून आम्ही भयंकर निराशावादी होतो. अशा तऱ्हेच्या उथळ उत्साहाने वाहवणारा माणूस पहिल्यांदा जितका कट्टर कर्मयोगी असतो तितकाच नंतर दुबळा दैववादी होतो. अज्ञात शक्तीसमोर असहाय्य होणाऱ्या मानवाच्या मी ज्या गोष्टी सांगता त्या या उथळ उत्साहाला ताळ्यावर आणण्याकरिता —— क्रियेची प्रतिक्रिया होऊन माणूस दुबळा दैववादी होऊ नये म्हणून. आपल्या अंतिम असहाय्यतेची जाणीव ठेवून काम करणारा माणूसच खरा कर्मयोगी होतो. कारण त्याची निराशा कधीच होत नाही ! गणितशास्त्राच्या निर्जीव नियमांनी निश्चयांचे मनोरे बांधण्यात काय हशील ? गणितात एक आणि एक मिळून दोन होत असतील, तर जीवनात एक आणि एक मिळून तीन होतात !

***

# १४.

# डोंबाऱ्यांचा खेळ!

हे असे का होते तेच मला कळत नाही. या लेखाचीच गोष्ट घ्या ना. सकाळीच लिहून टाकीन म्हणत होतो, पण अजूनपर्यंत लिहिण्याची सुरवातच करवेना. सकाळी लिहायला टेबलाकडे गेलो तो समोरच्या आरशात स्वतःचा चेहरा दिसला, आणि डोक्यावरले केस फारच वाढले आहेत असे दिसून आले. छे, केस कापून घेतलेच पाहिजेत. ताबडतोब कोट चढवून बाहेर गेलो आणि तास दीड तासाने केस कापून घेऊन परत आलो. आता लिहिण्यास बसायला काहीच हरकत नव्हती.

इतक्यात एक-दोन मित्र आले. 'तुझं काही काम असलं तर आम्ही परत जातो. पुन्हा येऊ उद्या-परवा. तसं आमचं विशेष काहीच काम नाही.' ते म्हणाले.

'बसा रे, थोडा वेळ. मला थोडंसं लिहायचं आहे. टाकीन लिहून नंतर', असे म्हणून मी त्यांना बसवून घेतले. सौजन्याचे सर्व नियम मला त्या वेळी आठवले! खरे म्हटले तर मी त्यांना 'जा' म्हणून सांगितले असते तर त्यांना मुळीच वाईट वाटले नसते; पण दारावर आलेल्यांना परत कसे घालवावयाचे, असा मोठा पोक्त सल्ला माझ्या तक्रारी मनाला मी दिला. ते जाईपर्यंत दहा-अकरा वाजले होते.

आता आंघोळ करून जेवावे आणि नंतरच शांतपणे लिहीत बसावे असा शहाणपणाचा विचार मी केला आणि स्नानभोजनादिकांच्या उद्योगाला लागलो. जेवण झाल्यावर डोळ्यांवर थोडी गुंगी आली. तेव्हा आळसटपणे लिहिल्यास नीटसे

लिहून होत नाही असे म्हणून—फार नाही, थोडाच वेळ झोपण्याचा—किंवा जरा पडण्याचा म्हणा, विचार केला. अर्धा-पाऊण तास चांगली झोप घेतली, आणि ताजातवाना होऊन उठलो.

दुपारचा एक वाजला होता. आता लिहिलेच पाहिजे. कागद, पेन्सिली, चाकू वगैरे सर्व साहित्य टेबलावर जमा केले. इतक्यात आठवण झाली, की आता दुपार झाली आहे तेव्हा चहा घेऊनच लिहायला बसावे. हो, म्हणजे लिहायलासुद्धा चांगला जोर येईल, आणि लिहिता लिहिता मध्येच चहाकरिता उठायला नको. अगदी मनापासून ही कल्पना मला पटली! तावडतोब स्टोव्ह पेटवला आणि चांगला एक-दोन कप चहा करून गरम गरम प्यायलो. आता मात्र लिहिण्याखेरीज गत्यंतर नव्हते. मला वाटते, मी खूप डोके खाजवून पाहिले; पण काही सबब उरलीच नव्हती! शेवटी मनाचा धडा करून पेन्सिल हातात घेतली, आणि लिहायला बसलो!

राहून राहून माझ्या मनात विचार येतो तो हाच, की स्वतःची ही फसवणूक कशासाठी? स्वतःच्याच मनाशी हा इतका अटीतटीचा झगडा का? 'लिहा' म्हणून आमच्या मानेवर कुणीच गोणी ठेवलेल्या नाहीत. बरे, हे लिहिण्यापासून तसे काही पैसे मिळायचे आहेत, किंवा स्वतःचा फायदा व्हायचा आहे असेही नाही. मग ही धडपड का? ते काहीही असो; असे होते खरे. एक प्रवृत्ती मनाला म्हणते, 'बस स्वस्थ, घे विश्रांती, हवी कशाला धडपड लिहिण्याची नी खरडण्याची!' दुसरी प्रवृत्ती दुसऱ्या बाजूला ओढते आणि सांगते, 'लिही, काम कर, काहीतरी करून दाखव!'

प्रवृत्ति-निवृत्तीच्या या रस्सीखेचीत मनाची त्रेधातिरपीट उडते, आणि केव्हा केव्हा जीव बेजार होतो.

पण या रस्सीखेचीत स्वतःचे पाय चळू न देता ते ताठ उभे ठेवण्यातच—या तारेवरल्या नाचात स्वतःचा तोल ढळू न देता तो कुशलतेने संभाळण्यातच—जीवनाचा जीव आणि जगण्याची मजा आहे, असे सूज्ञ म्हणतात! तोल सुटला की झालेच. नेहमीच्या अनुभवातली कुठलीही गोष्ट घ्या. परस्परविरुद्ध प्रवृत्तींच्या या द्वंद्वातून आपण काही सुटत नाही. झोपून राहा, मेदोवृद्धी होऊन लठ्ठंभारती व्हाल! जाग्रणे करा, खंगत जाल नी अस्थिपंजर व्हाल! काम न करता स्वस्थ पडून राहा—विश्रांती घ्या. ती विश्रांती भयंकर वाटेल—जीव बेचैन होईल. पुरे ही विश्रांती म्हणून कामाला लागा, आणि काम करून पुन्हा विश्रांती घ्या—तीच विश्रांती आनंददायक वाटेल. आणि ती तशीच चालू ठेवलीत की ती पुन्हा भयंकर वाटेल—जीव बेचैन होईल! हे रहाटगाडगे सदासर्वकाळ असेच चालायचे—हा तारेवरला नाच अविरत असाच चालू! हेच जगणे. हे नको असेल तर मरा!

विजयी वीर तोच, की जो या तारेवर तोल संभाळतो ! आणि ही तार तरी कसली ? ती कुठून आली आणि कुठे गेली, ते कुणालाच माहीत नाही ! कुणीतरी अवचितपणे आम्हाला या तारेवर आणून उभे करतो. मोठ्या अक्कलहुशारीने तोल संभाळीत आम्ही पुढे जातो; आणि मग तितक्याच अवचितपणे जसे आलो तसे आम्ही नाहीसे होतो ! किती सुंदर डोंबाऱ्यांचा खेळ हा !

***

१५.

# सामान्यांचे असामान्यत्व !

काही काही लोकांची संगत मी तास-तास, दोन-दोन तास कशी सहन करू शकतो, याचे माझ्या एका हुशार आणि बुद्धिमान मित्राला आश्चर्य वाटते. परवा तर त्याने तसे स्पष्ट बोलून दाखविले. निळचा-काळचा शाईच्या पुड्या विकून उदरनिर्वाह चालविणारा एक माणूस माझ्या ओळखीचा आहे. तो केव्हा केव्हा माझ्याकडे येऊन गप्पा मारीत बसतो. परवा सकाळी तो असाच माझ्याकडे तासभर येऊन बसला होता. माझ्या शेजारीच राहणारा माझा हुशार आणि बुद्धिमान मित्र तो असताना दोन-तीनदा माझ्या खोलीत डोकावून गेला. तो शाईवाला निघून गेल्यावर तो आत आला आणि मोठ्यांदा हसून म्हणाला, " कमाल आहे बुवा तुझी ! या शाईवाल्याच्या गप्पासुद्धा तू तास-तास कशा सहन करू शकतोस ते मला समजत नाही. भिडस्तपणाला काही मर्यादा असाव्या. तो आला की त्याला तू ताबडतोब घालवून का देत नाहीस ? "

" दारावर आलेल्या माणसाला तडकाफडकी घालवून देण्याचे शौर्य तुम्हा लोकांत आहे याबद्दल मला तुमचा हेवा वाटतो. " मी म्हणालो, " आणि माझ्यात तितकं शौर्य नाही हे मी कबूल करतो; पण केवळ भिडस्तपणामुळं या लोकांना मी जवळ करतो, असं मात्र तू समजू नकोस. खरोखरच केव्हा केव्हा बुद्धिमान आणि हुशार माणसांच्या संगतीपेक्षा या सामान्य लोकांचा सहवासच मला मनापासून आवडतो ! "

या उत्तराने माझ्या मित्राची विशेषशी खात्री पटली नाही; पण तो गप्प बसला, हे मात्र खरे. माझ्या या भिडस्तपणाकडे किंवा सामान्य माणसाविषयी

मला वाटणाऱ्या आपलेपणाकडे माझा हा मित्र निदान सहानुभूतीच्या दृष्टीने तरी पाहतो; पण माझ्या ओळखीचे दुसरे एक अतिहुशार गृहस्थ आहेत, त्यांचा माझ्यावर निराळाच आरोप आहे. त्यांच्या मते मी निर्बुद्ध, सामान्य लोकांचा घोळका माझ्याभोवती जमवतो याचे कारण हे लोक माझे चाहते किंवा स्तुतिपाठक असतात, आणि त्यांच्यामुळे माझी अनायासे गांवभर जाहिरातही होते ! त्याशिवाय स्वतःची स्तुतिस्तोत्रेही ऐकण्याचा मला आनंद मिळतो तो वेगळाच ! हे गृहस्थ एक प्रथितयश लेखक आहेत, आणि राजहंस ज्याप्रमाणे फक्त मोत्यांच्या चाऱ्यावर जगतो त्याप्रमाणे हे गृहस्थ आपला सारा फुरसतीचा वेळ बहुधा आपल्यासारख्याच निवडक बुद्धिवंतांच्या संगतीत काव्यशास्त्रविनोद करीत घालवीत असावेत-- सामान्यांच्या वाऱ्यालासुद्धा ते उभे राहात नसावेत ! त्याचप्रमाणे यांच्या स्तुतीचा कुणी चुकून जरी शब्द उच्चारला तर ते कानात घट्ट दट्टे घालीत असावेत ! या थोर माणसाची बरोबरी करण्याची मला मुळीच महत्त्वाकांक्षा नाही. स्वतःची स्तुती ऐकली की सर्वसाधारण माणसाच्या अंतःकरणाला गुदगुल्या होतात; आणि मलाही माझी कुणी स्तुती केली की आवडते, हे मी कबूल करतो. उपरोक्त महात्म्यांनासुद्धा स्वतःची स्तुती आवडत नाही असे नाही ! स्वतःच्या चार ओळींबद्दल कुणी स्तुतिपर उद्‌गार काढले की हे गृहस्थ ती बातमी गावभर स्वतःच सांगत फिरतात. मग माझ्यावर किंवा इतर काही साहित्यिकांवर या गृहस्थांचा असा आरोप का ? द्राक्षे आवाक्याबरोबर असली की ती कोल्ह्याला आंबट वाटतात, त्यातला तर हा प्रकार नाही ना ? मी एकदा त्यांना तसे म्हटलेसुद्धा.

"काय हो," मी म्हटले, "तुमच्याभोवती आमच्याकडे येतात त्याप्रमाणे निर्बुद्धच काय पण कुणीसुद्धा येत नाहीत याचा विषाद तर तुम्हाला वाटत नाही ना ?"

त्यावर ते चिडून म्हणाले, "तुमच्यासारखा वाटेल त्याला मी जवळ करीत नाही. मी फक्त बुद्धिवंतांशीच मैत्री करतो !" या कबुलीजबाबाने आमच्यापेक्षाही आपण खरे पटाईत जाहिरातबाज आहोत हे त्यांनी नकळत पण आपोआपच कबूल केले ! कारण, बुद्धिवान आणि प्रथितयश लोकांच्याच हाती जाहिरातीची अधिक साधने असतात; आणि त्यांच्याशी मैत्री करूनच स्वतःची जाहिरात करून घेण्याची अधिक शक्यता असते. सामान्य किंवा निर्बुद्ध लोकांनी केलेल्या स्तुतीने किंवा जाहिरातीने स्वतःचा फायदा होण्यापेक्षा तोटाच अधिक होतो हे समजण्याइतकी अक्कल या गृहस्थांना जितकी आहे तितकीच, किंबहुना त्यापेक्षा किंचित् अधिक मला किंवा ज्या इतर साहित्यिकांवर हे गृहस्थ वरच्यासारखे आरोप करतात त्यांना खास आहे. आपली जाहिरात व्हावी या हेतूने कुणी निर्बुद्ध माणसांना जवळ करील असे मला वाटत नाही.

पण सुदैवाने माझ्याकडे येणाऱ्या लोकांत माझी जाहिरात करू शकतील असे सुबुद्ध किंवा निर्बुद्ध साहित्यसेवी बहुधा कुणी नसतातच मुळी. माझ्याकडे येणारे

आणि मला मनापासून आवडणारे म्हणजे त्या शाईविक्यासारखे सामान्य लोक. बुद्धिवैभवाने ते तळपत नाहीत किंवा वाङ्मयाची ते चिकित्सा करू शकत नाहीत हे खरे आहे; पण जीवनावरल्या पुस्तकांसंबंधी बोलण्यापेक्षा ते प्रत्यक्ष जीवनासंबंधीच बोलतात, आणि म्हणूनच ते मला आवडतात. तसे बुद्धीचे महत्त्व मला कळते; आणि माणसाला आपल्या बुद्धीचा थोडाबहुत अहंकार असावा हेही मला मान्य आहे; पण बुद्धीपेक्षाही खरी मानवता अंतःकरणातच दिसून येते, आणि काय असेल ते असो, ज्याप्रमाणे एखाद्याला दृष्टी नसली म्हणजे त्याचे स्पर्शेंद्रिय अधिक तीव्र असते, किंवा वाचा नसणाराचे घ्राणेंद्रिय तीक्ष्ण असते त्याप्रमाणेच बुद्धि कमी असणाराचे अंतःकरण बहुधा मोठे असते, असा माझा अनुभव आहे. बुद्धिवंतांच्या संगतीत क्षणभर आपले डोळे दिपून जातील, आणि जीवनाचे पृथक्करण करून त्याने शोधून काढलेले रुक्ष पण भव्य सिद्धान्त आपल्याला चकितही करून टाकतील; पण सामान्य माणसाच्या संगतीत मिळणारा जीवनाचा एखादा अपूर्व अनुभव किंवा दृष्टोत्पत्तीला येणारे जीवनाचे एखादे नवीन स्वरूप इतके अमोल असते, की प्रत्यक्ष जीवनाच्या निर्मल झऱ्यातच बुडी मारल्याचा अवर्णनीय आनंद आपणाला होतो. आम्ही बुद्धिवान लोक अपत्यवात्सल्याविषयी रसाळ कविता लिहू किंवा मित्रप्रेमावर एखादा फर्डा लेखही खरडू; पण आमचा मित्र आजारी पडला असता इकडची काडी तिकडे करण्याचे काही आम्हाला जमणार नाही ! पण तेच एखादा सामान्य माणूस आपल्या स्नेह्याच्या आजारात त्याची शुश्रूषा करण्याचे आणि घाण उपसण्याचे काम आमच्यापेक्षा शतपट अधिक चोखपणे करतो. सामान्यातच असामान्य माणुसकी असते, असे मला वाटते; आणि बुद्धीपेक्षा मला माणुसकीची किंमत अधिक वाटत असल्यामुळे सामान्यांचीच संगत मी अधिक पसंत करणार !

* * *

१६.

# पाचामुखी सैतान !

आधीच मी काहीतरी कारणामुळे कावल्यासारखा झालो होतो. त्यात आणखी त्याने ही बातमी सांगितली. त्यामुळे मी खरोखरच चिडलो; आणि माझ्या तोंडून ते बेफाट शब्द निघून गेले. ते असं झालं. त्या दिवशी माझा एक मित्र मला भेटायला आला होता; आणि आल्याबरोबर पहिलीच बातमी त्याने ही सांगितली —

'अरे,' तो म्हणाला, 'ती अमकी बाई मला नुकतीच भेटली होती. तिचं तुझ्याविषयी फार वाईट मत आहे !'

'बेशरम असली पाहिजे ती !' मी चिडून म्हणालो.

माझ्या शब्दांनी त्याला धक्काच बसला. 'एका सभ्य स्त्रीला फट्दिशी बेशरम म्हणतोस म्हणजे तुला झालंय तरी काय ?' तो आश्चर्यचकित होऊन म्हणाला.

'तिला सभ्य म्हणतोस म्हणजे तू सुद्धा बेशरम असला पाहिजेस !' मी शांतपणे म्हणालो.

'म्हणजे ?'

'म्हणजे असं,' मी म्हणालो, 'की ज्या बाईचा शत्रू किंवा मित्र म्हणून माझा काहीच संबंध आला नाही,—जिला माझी काहीच माहिती नाही, तिचं माझ्याविषयी फार तर चांगलं किंवा वाईट काहीच मत असू नये; पण ती माझ्याविषयी विनाकारण आपलं वाईट मत करून घेते; इतकंच नव्हे, तर दुसऱ्याजवळ ते व्यक्त करते ! मग मी तिला बेशरम नाही तर काय म्हणू ? आणि तुला खरं सांगू ? अशा वाईट बाईचं माझ्याविषयी वाईट मत आहे तेच चांगलं; अशा बाईचं माझ्याविषयी चांगलं मत असतं तर मी वाईट ठरलो असतो !'

'हे ठीक आहे तुझं तत्त्वज्ञान,' माझा मित्र म्हणाला, 'पण मला बेशरम म्हणून तू शिवी का दिलीस ?'

'बेशरम माणसांना तू सभ्य म्हणालास म्हणून !'

त्या वेळेला चिडून मी माझ्या मित्राला टाकून बोललो खरा, पण आता मला त्या गोष्टीचे वाईट वाटते. या गोष्टीला बरीच वर्षे होऊन गेली आहेत. आता मी चांगलाच कोडगा झालो आहे. स्वतःविषयी इतक्या भयंकर गोष्टी माझ्या कानावर आल्या आहेत, की असल्या गोष्टीचे मला आता काहीच वाटेनासे झाले आहे. पाचामुखी परमेश्वर असे कुणी म्हणणारे असतील ते म्हणोत. माझा अनुभव 'पाचामुखी सैतान' असा आहे ! आणि या सैतानाच्या शब्दावर जर विश्वास ठेवायचा असेल तर जगात असे एकही भयंकर व्यसन नाही की जे मला लागलेले नाही !

अलीकडे माझ्या एका तत्त्वज्ञानी मित्राच्या तत्त्वाप्रमाणे चालण्याचा मी प्रयत्न करतो आहे. त्याचे म्हणणे असे, की खुनाला जशी केव्हा ना केव्हा तरी वाचा फुटते, तशी सत्यालाही फुटतेच फुटते. म्हणूनच आपली कुणी बदनामी केली, तर शेवटी त्या बदनामी करणाराचीच जगात बदनामी होते. कारण, काही दिवसांनी का होईना, तो खोटे बोलत होता हे जगाला कळल्याशिवाय राहात नाही. आपण बदनामीमुळे चिडून जाऊन, किंवा उत्तरे देण्याच्या भानगडीत पडून स्वतःचा वेळ आणि शक्ती फुकट घालवण्यापेक्षा स्वस्थ राहावे हेच बरे !

हे सर्व ठीक आहे; पण दुसऱ्याची विनाकारण बदनामी करण्याची आणि त्याला दुःख देण्याची काही लोकांना इच्छाच का होते, हे मात्र मानसशास्त्राचे मोठेच कोडे आहे असे मला वाटते. भक्तीचा जसा 'विरोधी भक्ती' या नावाचा एक प्रकार आहे, त्याप्रमाणेच मनुष्यमात्रांना एकामेकांविषयी वाटणाऱ्या बंधुभावाचा हा एक 'विकृत बंधुभाव' नावाचा प्रकार असावा ! रामावर रावणाची विरोधी भक्ती होती म्हणून त्याचे वैर संपादन करून त्याच्याशी रावणाने युद्ध केले असे म्हणतात. त्याचप्रमाणे दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडल्यामुळे ज्यांचे जीवन दुःखीकष्टी झाले आहे—कडवटून गेले आहे अशा माणसांना आपल्या जोडीला दुसरेही जितके दुःखीकष्टी असतील तितके बरे, असे वाटून इतरांना अकारण दुःखी करण्याचा त्यांनी प्रयत्न करणे ही बंधुभावाच्या भावनेचीच एक चमत्कारिक विकृती नसेल ना ? माझे हे निदान अगदीच निराधार नाही. प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात आपल्याबरोबरच दुसऱ्याचेही वाईट झाले की बरे वाटण्याइतका चोरटा दुष्टपणा खास असतो. आपण नापास झालो, पण आपल्या बरोबरीचा आपला एक हुशार मित्रही नापास झाला, हे त्यातल्या त्यात समाधान आहे, असे वाटणारे किती तरी विद्यार्थी मी पाहिले आहेत. मी त्यांना दुष्ट किंवा मित्रद्रोही मुळीच म्हणणार नाही. ही एक अगदी स्वाभाविक गोष्ट आहे. माझ्या मते बंधुभावाचेच हे एक

विकृत स्वरूप आहे. सुखात जशी एक जोडीची ओढ लागते, तशीच दुःखात लागलेली ही एक जोडीची ओढच म्हणाना !

अर्थात् आपल्याबरोबर दुसऱ्याचे वाईट झाले आहे म्हणून बरे वाटणे, आणि आपण दुर्दैवी आहोत,—आपले वाईट झाले आहे म्हणून दुसऱ्याची बदनामी करण्याचा किंवा दुसऱ्याचे वाईट करण्याचा प्रयत्न करणे यात फरक आहे हे मला कळते. चांगला मनुष्य असेल, तर तो आपले वाईट झाल्यास दुसऱ्याचे वाईट करण्याचा प्रयत्न न करता स्वतःच्या नशिबाला दोष देतो किंवा वाईटातून चांगले काढण्याचा प्रयत्न करतो, हे खरे आहे; पण सर्वच असे नसतात. आणि काही दुर्दैवी जीवांना इतरांसंबंधी अनृतप्रसार करण्यात आनंद वाटतो, हेही तितकेच खरे आहे.

पण या असल्या अनृतप्रसारकांहून निराळा असा दुसरा एक अनृतप्रसारकांचा वर्ग आहे, तो मला अधिक भयंकर वाटतो. दुसऱ्याचे चांगले बघवत नसल्यामुळे किंवा इतरांचे वाईट करण्याच्या हेतूनेच या वर्गातले लोकही अनृतप्रसार करीत असतात; पण ऋतप्रसाराचा सोज्वळ बुरखा पांघरून ऋतप्रसारक किंवा सत्याचे वाली म्हणून हे लोक जनतेत मिरवत असतात ! पहिल्या प्रकारचे अनृतप्रसारक बिचारे साधे आणि सरळ. ते सरळ सरळ खोटे बोलत फिरतात; आणि मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे सत्याला केव्हा तरी वाचा फुटतेच आणि त्यांचे स्वरूप उघडकीला येते. हे लोक स्वतःच्या हातानेच स्वतःच्या पायावर धोंडा घालून घेतात; पण आमचे दुसऱ्या वर्गातले अनृतप्रसारक खरे कलावंत ! ते आपल्या अनृतप्रसाराला ऋतप्रसाराचा गोंडस मुलामा देतात ! ॲटलासने ज्याप्रमाणे पृथ्वीचा प्रचंड गोल आपल्या पाठीवर तोलून धरला आहे; त्याप्रमाणे या कलियुगात कोसळत चाललेला सत्याचा डोलारा आपण आपल्या खंबीर खांद्याने पेलून धरला आहे, असे ते जगाला भासवतात. सत्याचा कसा कुठे अपलाप होईल या भीतीने त्यांना रात्रंदिवस झोप येत नाही ! कुणी कुणाला चांगले म्हटले, की तो वाईट कसा आहे हे सिद्ध करण्याकरिता ते जिवाची आटापीट करतात ! कुणी कुणावर उपकार करायला उठला, की तो त्या उपकाराला कसा पात्र नाही, हे अजाण जनतेला समजावून देण्याकरिता ते आकांत मांडतात ! अर्थात यांचेही स्वरूप उघडकीला आल्याशिवाय राहात नाही. इथेही सत्याला वाचा फुटतेच; पण ती उशिरा, इतकेच.

आपण स्वस्थ राहावे आणि सत्याला वाचा फुटू द्यावी, असे मी मोठ्या शहाणपणाचा आव आणून म्हटले खरे; पण ते किती कठीण आहे हे मला पूर्ण माहीत आहे. आपणाला विनाकारण थप्पड मारणाराला एक ठणठणीत ठोसा द्यावा असे प्रत्येकाला वाटते, आणि मी तसा देतोही; पण असे ठोसे देत बसायचे तरी किती वेळ, आणि कितीजणांना ? पाचामुखी वसत असलेल्या या सैतानाचे तोंड धरण्याचा किंवा तोंड फोडण्याचा उद्योग करीत बसल्यास सारे आयुष्य पुरायचे नाही. म्हणूनच आमच्या तत्त्वज्ञ मित्राच्या 'स्वस्थ राहा' या सोज्वळ उपदेशाप्रमाणे चालावे असे म्हणण्यापेक्षा, चालणे भाग पडते असेच म्हणणे बरे!

* * *

१७.

# दो न चा के !

पायातली वहाण पायातच ठेवली पाहिजे, या स्त्रियांसंबंधीच्या गणूकाकांच्या तत्त्वज्ञानाचा मला जितका राग येतो, तितकाच, किंबहुना त्याहूनही अधिक, स्त्री आणि पुरुष ही संसार-रथाची दोन चाके आहेत, या शिळ्या आणि बुरसट झालेल्या रूपकाचे चर्वितचर्वण करून स्त्रियांच्या समतेसाठी आणि स्वातंत्र्यासाठी कंठशोष करणाऱ्या स्त्री-स्वातंत्र्यवाद्यांचा मला राग येतो. अशाच एका स्त्री-स्वातंत्र्यवादिनी-बरोबर बोलत असता तिने आपण काहीतरी अजिबात नवीन आणि गंभीर तत्त्वज्ञान सांगतो आहोत असा आव आणून मला सांगावयास सुरुवात केली, 'स्त्री आणि पुरुष ही संसार-रथाची सारख्या तोलाची आणि सारख्या महत्त्वाची दोन चाकं आहेत. म्हणून स्त्रियांना पुरुषांनी समान हक्क दिले पाहिजेत––त्यांना आपल्या बरोबरीनं वागवलं पाहिजे––'

'बस-बस' मी ओरडलो, 'रथ आणि दोन चाकं ही उपमा अजिबात गैरलागू आणि झूट आहे. ज्याच्या दोन चाकांमध्ये रूपाचं आणि आकाराचं कसलंही साम्य नाही असा एक तरी रथ तुम्ही जगात पाहिला आहे काय ? आणि समजा, एक गोल आणि एक चौकोनी अशा चाकांचा एखादा रथ असला तर तो कधी तरी चालू शकेल काय ? आणि दोन चाकं जर सारखीच आहेत, तर तोंड वेंगाडून आम्हांला समान हक्क द्या, आम्हांला बरोबरीनं वागवा, अशी एका चाकानं दुसऱ्या चाकाकडे भिक्षा मागण्याचं कारण काय ? तुम्ही अशी याचना करता याचा अर्थच पुरुषांना तुम्ही आपल्यापेक्षा श्रेष्ठ समजता. श्रेष्ठ किंवा समतोल माणूस कनिष्ठा-कडे याचना करीत नाही, कनिष्ठ श्रेष्ठाकडे करतो !'

खि. ता. ४.

विकृत स्वरूप आहे. सुखात जशी एक जोडीची ओढ लागते, तशीच दुःखात लागलेली ही एक जोडीची ओढच म्हणाना !

अर्थात् आपल्याबरोबर दुसऱ्याचे वाईट झाले आहे म्हणून बरे वाटणे, आणि आपण दुर्दैवी आहोत,—आपले वाईट झाले आहे म्हणून दुसऱ्याची बदनामी करण्याचा किंवा दुसऱ्याचे वाईट करण्याचा प्रयत्न करणे यात फरक आहे हे मला कळते. चांगला मनुष्य असेल, तर तो आपले वाईट झाल्यास दुसऱ्याचे वाईट करण्याचा प्रयत्न न करता स्वतःच्या नशिबाला दोष देतो किंवा वाईटातून चांगले काढण्याचा प्रयत्न करतो, हे खरे आहे; पण सर्वच असे नसतात. आणि काही दुर्दैवी जीवांना इतरांसंबंधी अनृतप्रसार करण्यात आनंद वाटतो, हेही तितकेच खरे आहे.

पण या असल्या अनृतप्रसारकांहून निराळा असा दुसरा एक अनृतप्रसारकांचा वर्ग आहे, तो मला अधिक भयंकर वाटतो. दुसऱ्याचे चांगले बघवत नसल्यामुळे किंवा इतरांचे वाईट करण्याच्या हेतूनेच या वर्गातले लोकही अनृतप्रसार करीत असतात; पण ऋतप्रसाराचा सोज्वळ बुरखा पांघरून ऋतप्रसारक किंवा सत्याचे वाली म्हणून हे लोक जनतेत मिरवत असतात ! पहिल्या प्रकारचे अनृतप्रसारक बिचारे साधे आणि सरळ. ते सरळ सरळ खोटे बोलत फिरतात; आणि मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे सत्याला केव्हा तरी वाचा फुटतेच आणि त्यांचे स्वरूप उघडकीला येते. हे लोक स्वतःच्या हातानेच स्वतःच्या पायावर धोंडा घालून घेतात; पण आमचे दुसऱ्या वर्गातले अनृतप्रसारक खरे कलावंत ! ते आपल्या अनृतप्रसाराला ऋतप्रसाराचा गोंडस मुलामा देतात ! ॲटलासने ज्याप्रमाणे पृथ्वीचा प्रचंड गोल आपल्या पाठीवर तोलून धरला आहे; त्याप्रमाणे या कलियुगात कोसळत चाललेला सत्याचा डोलारा आपण आपल्या खंबीर खांद्याने पेलून धरला आहे, असे ते जगाला भासवतात. सत्याचा कसा कुठे अपलाप होईल या भीतीने त्यांना रात्रंदिवस झोप येत नाही ! कुणी कुणाला चांगले म्हटले, की तो वाईट कसा आहे हे सिद्ध करण्याकरिता ते जिवाची आटापीट करतात ! कुणी कुणावर उपकार करायला उठला, की तो त्या उपकाराला कसा पात्र नाही, हे अजाण जनतेला समजावून देण्याकरिता ते आकांत मांडतात ! अर्थात यांचेही स्वरूप उघडकीला आल्याशिवाय राहात नाही. इथेही सत्याला वाचा फुटतेच; पण ती उशिरा, इतकेच.

आपण स्वस्थ राहावे आणि सत्याला वाचा फुटू द्यावी, असे मी मोठ्या शहाणपणाचा आव आणून म्हटले खरे; पण ते किती कठीण आहे हे मला पूर्ण माहीत आहे. आपणाला विनाकारण थप्पड मारणाराला एक ठणठणीत ठोसा द्यावा असे प्रत्येकाला वाटते, आणि मी तसा देतोही; पण असे ठोसे देत बसायचे तरी किती वेळ, आणि कितीजणांना ? पाचामुखी वसत असलेल्या या सैतानाचे तोंड धरण्याचा किंवा तोंड फोडण्याचा उद्योग करीत बसल्यास सारे आयुष्य पुरायचे नाही. म्हणूनच आमच्या तत्त्वज्ञ मित्राच्या 'स्वस्थ राहा' या सोज्वळ उपदेशाप्रमाणे चालावे असे म्हणण्यापेक्षा, चालणे भाग पडते असेच म्हणणे बरे!

* * *

१७.

# दो न चा के !

पायातली वहाण पायातच ठेवली पाहिजे, या स्त्रियांसंबंधीच्या गणूकाकांच्या तत्त्वज्ञानाचा मला जितका राग येतो, तितकाच, किंबहुना त्याहूनही अधिक, स्त्री आणि पुरुष ही संसार-रथाची दोन चाके आहेत, या शिळ्या आणि बुरसट झालेल्या रूपकाचे चर्वितचर्वण करून स्त्रियांच्या समतेसाठी आणि स्वातंत्र्यासाठी कंठशोष करणाऱ्या स्त्री-स्वातंत्र्यवाद्यांचा मला राग येतो. अशाच एका स्त्री-स्वातंत्र्यवादिनी-बरोबर बोलत असता तिने आपण काहीतरी अजिबात नवीन आणि गंभीर तत्त्वज्ञान सांगतो आहोत असा आव आणून मला सांगावयास सुरुवात केली, 'स्त्री आणि पुरुष ही संसार-रथाची सारख्या तोलाची आणि सारख्या महत्त्वाची दोन चाकं आहेत. म्हणून स्त्रियांना पुरुषांनी समान हक्क दिले पाहिजेत--त्यांना आपल्या बरोबरीनं वागवलं पाहिजे--'

'बस-बस' मी ओरडलो, 'रथ आणि दोन चाकं ही उपमा अजिबात गैरलागू आणि झूट आहे. ज्याच्या दोन चाकांमध्ये रूपाचं आणि आकाराचं कसलंही साम्य नाही असा एक तरी रथ तुम्ही जगात पाहिला आहे काय ? आणि समजा, एक गोल आणि एक चौकोनी अशा चाकांचा एखादा रथ असला तर तो कधी तरी चालू शकेल काय ? आणि दोन चाकं जर सारखीच आहेत, तर तोंड वेंगाडून आम्हांला समान हक्क द्या, आम्हांला बरोबरीनं वागवा, अशी एका चाकानं दुसऱ्या चाकाकडे भिक्षा मागण्याचं कारण काय ? तुम्ही अशी याचना करता याचा अर्थच पुरुषांना तुम्ही आपल्यापेक्षा श्रेष्ठ समजता. श्रेष्ठ किंवा समतोल माणूस कनिष्ठा-कडे याचना करीत नाही, कनिष्ठ श्रेष्ठाकडे करतो !'

खि. ता. ४.

माझे हे शब्द एकून ती स्वातंत्र्यवादिनी संतापाने लाल झाली आणि एकदम उसळून म्हणाली, 'लाज वाटली पाहिजे तुम्हा पुरुषांना असले शब्द उच्चारायला. आम्हांला तुम्हो मुळीच श्रेष्ठ वाटत नाही. कोणत्याही बाबतीत आम्ही तुमच्यापेक्षा कमी नाही. युगानुयुगं तुम्ही पुरुषांनी आम्हांला आपल्या सत्तेच्या जोरावर गुलामगिरीत दडपून ठेवलं आहे; आणि आता आम्ही समानता मागू लागलो तर आम्हांलाच कनिष्ठ म्हणता ? खासा न्याय !'

मी तिला चिडवावयाचे ठरवले होते. मी शांतपणे म्हणालो, 'युगानुयुगं आम्ही तुम्हांला गुलामगिरीत दडपून ठेवलं आहे हे मी कबूल करतो; पण आम्हीच तुम्हांला दडपू का शकलो ? तुम्ही आम्हांला दडपू का शकला नाहीत ? जगाच्या सुरुवातीला तर दोघांची परिस्थिती सारखीच होती ना ? याचा अर्थच हा, की जन्मतःच निसर्गानं तुमच्यात असे काही दोष ठेवले आहेत, किंवा तुमच्या प्रकृतीत असा काही दुबळेपणा ठेवला आहे, की तुम्ही आमची बरोबरी करूच शकत नाही. म्हणूनच म्हणतो पाहिजे तर निसर्गाला दोष द्या; आम्हांला का दोष देता ?'

यावर ती स्वातंत्र्यवादिनी रागाने पाय आपटीत निघून गेली. अर्थात ही सर्व थट्टा झाली; पण मला खरोखरच रथाच्या दोन चाकांची उपमा चुकीची वाटते. माझ्या मते घाटावरून खाली येणाऱ्या आगगाडीचे पुरुष हे पुढले एंजिन आणि स्त्री हे मागले एंजिन, हेच अधिक बरोबर. पुढलेच एंजिन असेल आणि मागले नसेल, तर गाडी खाली कोसळून खड्डयात पडेल. मागलेच असले तर गाडी मागे मागे जाईल, किंवा फार तर जागच्या जागी उभी राहील ! पुरुष हा स्वतःच कल्पनेच्या आहारी गेलेला—प्रगतिवादी असतो, आणि स्त्री ही व्यवहारी दृष्टीची—स्थितिवादी असते, असे मला वाटते. माता म्हणून खडतर कष्ट सोसून ती जगाची निर्मिती करते; या निर्मितीची काळजी घेणे आणि ती टिकवून ठेवणे हे कार्य व्यवहाराचे आहे—कल्पनेचे नाही; पण या व्यवहारामुळे वर्तमानात गुंतून राहिलेल्या तिच्या स्थितिवादी दृष्टीला रम्यतर भविष्याचा विसर पडण्याचा संभव असतो; आणि याकरिताच पुरुषाच्या कल्पनेची,—त्याच्या बेछूट, प्रगतिवादी प्रवृत्तीची जरूर असते.

प्रतिभावंत प्रियकराला सोडून एखाद्या सामान्य माणसाशी विवाह करणाऱ्या स्त्रियांचे काही लोकांना आश्चर्य वाटते. मला मात्र मुळीच वाटत नाही. कीट्सला सोडून एका म्हाताऱ्या कर्नलशी लग्न करणाऱ्या फॅनीला दोष देणारे पुष्कळ आहेत; पण भुकेकंगाल कालिदासाशी लग्न करून काबाडकष्ट करीत कुत्र्याच्या मोलाने आयुष्य कंठण्यापेक्षा, पंचेचाळीस रुपये नेमाने आणि खात्रीपूर्वक जन्मभर मिळवू शकणाऱ्या कुशाभाऊ कारकुनाशी एखाद्या व्यवहारी स्त्रीने लग्न केले तर सुरक्षिततेच्या दृष्टीने ते अधिक शहाणपणाचे नाही काय ?

एका सुप्रसिद्ध विद्वान गृहस्थाची बायको आपल्या मोटार-ड्रायव्हरचा हात

घरून पळून गेल्याची हकीकत माझ्या एका स्त्री-द्वेष्टया मित्राला मी नुकतीच सांगितली; तेव्हा तो शांतपणे म्हणाला, ‘ Woman, like water, finds her own level’ ( स्त्री पाण्याप्रमाणे आपल्या पातळीकडे धाव घेते ! )

स्त्रियांविषयी वाटणाऱ्या आत्यंतिक अनादरामुळे त्याने हे उद्‌गार काढले हे खरे आहे; पण स्थितिवादित्वाच्या किंवा व्यवहारी दृष्टीच्या अतिरेकामुळे उत्पन्न होणाऱ्या काही स्त्रियांच्या कल्पनाशून्यत्वावर किंवा ध्येयहीनतेवर ही चांगलीच टीका आहे.

स्त्रिया स्थितिवादी असतात आणि पुरुष प्रगतिवादी असतात. कुणी कुणाला कमी समजायचे काहीच कारण नाही. या दोन परस्परविरुद्ध प्रवृत्तींच्या संघर्षामुळेच जगाचा तोल राहतो, आणि त्याची प्रगती होते; पण म्हणून या दोघांना कुणी रथाची दोन चाके म्हणेल तर ते मी ऐकणार नाही. घसरत्या घाटावरून खाली येणाऱ्या आगगाडीची पुढली-मागली एंजिने म्हणा पाहिजे तर त्यांना !

* * *

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम 64/24 वि: निबंध
क्रमांक 2923 नों. दि. 21/3/60
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 93660
शाखा (स्थळ प्रत)

१८.

# तत्त्वनिष्ठा आणि तमासगीर!

मुद्देमालासह एखाद्या चोराला पकडताना पोलिसाला जसा आनंद होतो तसा त्या दिवशी गणूकाकांना झाला. ते माझ्या खोलीत शिरले तेव्हा माझ्या ओळखीचा एक हस्तसामुद्रिक माझा हात पाहात बसला होता. मला चकित करून टाकतील अशा एक–दोन गोष्टी त्या सामुद्रिकाने सांगितल्यामुळे मीही त्याचे बोलणे एकाग्र चित्ताने ऐकत होतो. 'आता सापडलास, जातोस कुठे !' अशा मुद्रेने चष्म्याच्या भिंगांवरून माझ्याकडे पाहात उंदरावर झडप घालू पाहणाऱ्या बोक्याच्या पावित्र्यात गणूकाका बसले होते. तो सामुद्रिक दाराच्या बाहेर पडला मात्र आणि गणूकाकांनी माझ्यावर झडप घातली.

'का हो, भौतिकवादी, नवमतवादी, पुरोगामी ! तुमचा या शास्त्रावर कधीपासून विश्वास बसला ? आम्ही जुने लोक उघडपणे या शास्त्रावर आमचा विश्वास आहे असं कबूल करतो म्हणून आम्ही चोर, आणि तुम्ही चोरून हात दाखवता म्हणून तुम्ही साव काय रे ?'

'कोण चोरून हात दाखवतो आहे ?' मी म्हणालो, 'मी तर उघडचावर हात दाखवीत बसलो होतो, चोरून दाखवायचा असता तर कडी लावून घेतली असती; आणि तुम्हालासुद्धा आत घेतलं नसतं; आणि पुन्हा असं पाहा. ज्योतिषशास्त्रावर किंवा हस्तसामुद्रिकावर तुमचा विश्वास आहे म्हणून आम्ही तुम्हाला कधी चोर म्हटलं होतं, किंवा शिव्या दिल्या होत्या ?'

'पण तुम्ही भौतिकतावादी, पुरोगामी ही सर्व शास्त्रं झूट आहेत असं म्हणता ना ?'

'हो. म्हणतो आणि म्हणणार !' मी शांतपणे म्हणालो.

'आणि तरीही आपले हात मात्र दाखवणार –' गणूकाका चिडून ओरडले, 'चोर कुठले !'

'हे पाहा काका, तुमच्यात आणि आमच्यात फरक हा,' मी म्हणालो, 'की तुम्हाला एखादी गोष्ट नकोशी किंवा अनिष्ट वाटली, की ती जगात नाहीच असं तुम्ही धरून चालता; तिचा विचारसुद्धा करायला तुम्ही तयार नसता. शहामृग ज्याप्रमाणे वाळवंटात आपलं डोकं खुपसतो आणि जग बुडालं असं समजतो तसं तुमचं आहे. आमचं तसं नाही. आम्हांला नको असलेल्या–आमच्याविरुद्ध असलेल्या गोष्टींचासुद्धा सर्व बाजूंनी विचार करायला आणि त्यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहायला आम्ही तयार असतो. तुमचं ज्योतिषशास्त्र किंवा सामुद्रिकशास्त्र इतर भौतिकशास्त्रांप्रमाणं एक शास्त्र आहे असं तुमच्याप्रमाणं आम्हांला वाटत नसेल, पण त्यातल्या एक–दोन गोष्टी आम्हांला पटल्या तर त्यात तथ्य तरी किती आहे, हे समजावून घ्यायला आम्ही केव्हाही तयार असतो. यालाच शास्त्रीय दृष्टिकोन म्हणतात. तो आमच्यात आहे आणि तुमच्यात नाही !'

'निर्लज्ज आहात तुम्ही लोक !' असे काही तरी पुटपुटत गणूकाका निघून गेले !

गणूकाकांच्या पुढे तत्त्ववेत्त्याचा मोठा आव मी आणला खरा; पण माझ्यावर विनाकारण तत्त्वच्युतीचा आरोप केल्याबद्दल खरोखरच मला त्यांचा मनापासून राग आला होता. अर्थात् गणूकाका थोर मनाचे आहेत; आणि केवळ वितंडवाद करीत बसण्याची जन्मजात खोड असल्यामुळे ते माझ्याशी वाद घालतात ही गोष्ट वेगळी; पण तत्त्वनिष्ठा आणि तत्त्वच्युती याबद्दल बऱ्याचशा लोकांच्या काही तरी चमत्कारिक कल्पना आहेत खऱ्या. त्यांच्या मते एखाद्याने भौतिकतावादाचा म्हणा, साम्यवादाचा म्हणा, किंवा कसल्याही तत्त्वज्ञानाचा म्हणा, एकदा स्वीकार केला, की दुसऱ्या कुठल्याही तत्त्वज्ञानाकडे डोळे उघडून पाहता कामा नये, किंवा त्यासंबंधी कान उघडे ठेवून काही ऐकता कामा नये. अशा तऱ्हेने ज्ञानसंपादनाचे सर्व मार्ग बंद करून स्वतःचा शिलास्थि बनविणे म्हणजे खरी तत्त्वनिष्ठा ! हे लोक एक साधी गोष्ट विसरतात, की तत्त्वज्ञानाकरिता कुणी तत्त्वज्ञानाचा स्वीकार करीत नसतो; जीवनातले काही तरी उदात्त ध्येय साधण्याकरिता कुणीही एखाद्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करतो. तत्त्वज्ञान हे साधन. ते ध्येय हे साध्य. एखादा भौतिकतावादी ज्योतिषशास्त्रावर विसंबून स्वतःच्या आयुष्याचा आराखडा आखील, किंवा दुसऱ्याला आखायला सांगेल, तर तोंडाने भौतिकतावादाच्या गप्पा करीत कृतीत दैववाद आचरल्याबद्दल त्याला तत्त्वच्युत म्हणता येईल; पण ज्योतिषशास्त्र काय आहे हे समजावून घेण्याचा प्रयत्न करणे, किंवा त्यातली एखादी गोष्ट पटली तर ती पटली असे कबूल करणे, म्हणजे खास तत्त्वच्युती नव्हे.

एखाद्याने आपले साध्य कितपत साधले आहे हे न पाहता तो आपल्या तत्त्वज्ञानातल्या अक्षरांना कितपत चिकटून राहिला आहे हे पाहणाऱ्या टीकाकारांची मनोवृत्ती मात्र मला पूर्णपणे समजते. कुणी पडो अगर कुणी चढो; जगाचे बरे होवो अगर वाईट होवो, आपणाला थोडी गंमत पाहायला मिळते आहे ना, ही तमासगिराची वृत्ती या टीकाकारांची असते. एखाद्या साम्यवाद्याने विशिष्ट परिस्थितीत एखाद्या भांडवलवाल्याशी तडजोड केली, की हे रिकामटेकडे तमासगीर तो तत्त्वच्युत झाला म्हणून त्याच्याविरुद्ध एकच गिल्ला करतात. साहाजिकच आहे. तडजोड न होता तो साम्यवादी त्या भांडवलवाल्यांकडून हकनाहक चिरडला गेला असता म्हणजे चार दिवस या तमासगिरांना मजा पाहता आली असती ! अर्थात् तडजोड न केल्यामुळे साम्यवादाचा फायदा होणार असता, किंवा भांडवलशाहीला धक्का बसणार असता तर ती तडजोड करणारावर तत्त्वच्युतीचा आरोप खात्रीने करता येईल; पण ज्या तडजोडीमुळे भांडवलवाल्याचा काही एक फायदा न होता तो साम्यवादी जिवंत राहून त्या भांडवलवाल्याचे अधिक नुकसान करू शकतो, ती तडजोड तत्त्वनिष्ठेला मुळीच बाधक नाही. या तमासगिरांच्या टाळ्या मिळविण्याकरिता किंवा 'हुतात्मा' म्हणून स्वतःचे जयजयकार करून घेण्याकरिता साध्यावर तिलांजली देऊन शत्रूच्या जाळ्यात चालत जाणारे खुळे तत्त्वनिष्ठ पुष्कळ असतात. खऱ्या तत्त्वनिष्ठ माणसाने या तमासगिरांना खूश करण्याच्या भानगडीत न पडता साध्यावर नजर ठेवून आपल्या तत्त्वांचे पालन करावे हेच बरे.

* * *

## १९.

# मोठे शून्य

सबंध दिवस डोकं खाजवूनदेखील एखादी गोष्ट केव्हा केव्हा मुळीच आठवत नाही. तेव्हा वैतागून आपण तिचा नाद सोडून देतो आणि स्वस्थ झोपी जातो; आणि मग सकाळी उठावं तो ध्यानीमनी नसता ती चटकन आठवते आणि एक प्रकारचा विलक्षणच आनंद आपणाला होतो. काल संध्याकाळी गणूकाकांशी बोलता बोलता त्यांनी जी एक गोष्ट सांगितली, तिच्यावर ते गेल्यानंतर विचार करता करता माझं थोडंसं असंच झालं. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी शाळेत गणित शिकायला मी सुरुवात केली तेव्हापासून गणितातला एक कूट प्रश्न मला सुटला नव्हता, तो काल इतक्या वर्षांनी अगदी सहजासहजी सुटून गेला.

गणूकाका आपल्या एका शेजाऱ्याची गोष्ट सांगत होते. मुंबईच्या लोखंड-बाजारात काही तरी बारीक सारीक कामं करून महिन्याकाठी जेमतेम चाळीस-पन्नास रुपये तो मिळवीत असे. बायको आणि पाच-सहा मुलं यांचा संसार एवढ्या रकमेत चालवता चालवता त्याच्या नाकी नऊ येत असत, आणि बिचारा सदा त्रासलेला असे. पुढं लढाई सुरू झाल्यापासून लोखंड-बाजाराला तेजी येऊ लागली आणि त्याला चांगला पैसा मिळू लागला. कुणा तरी भागीदाराबरोबर त्यानं स्वतंत्र व्यापार सुरू केला आणि पन्नास-पन्नास साठ-साठ हजारांच्या उलाढाली त्याच्या हातून होऊ लागल्या. खाण्यापिण्याची ददात नव्हती, कपडालत्ता भरपूर मिळू लागला, टॅक्सीशिवाय तो फिरत नसे; पण धंद्याचा व्याप इतका वाढला होता की रात्री पाच-सहा तास झोपायलासुद्धा त्याला फुरसद नसे. एक मूल आजारी पडलं तर बाहेरगावी जाण्याच्या धांदलीत डॉक्टर आणायलाही त्याला वेळ नव्हता. बायकोनं डॉक्टर आणले, उपचार केले, पण ते पोर शेवटी दगावलं; आणि हा

त्या वेळी घरीही नव्हता ! तो परत आला तेव्हा त्याच्या दुःखाला पारावार राहिला नाही. सहा महिन्यांपूर्वी क्षयानं आजारी पडून तो नुकताच वारला होता. 'मला जे राहून राहून आश्चर्य वाटतं ते हेच,' गणूकाका सांगत होते, 'शेवटी त्याच्या भागीदारानं धंद्याचा हिशेब करता करता सत्तर-बाहत्तर हजारांची उलाढाल झाली होती आणि सत्तर-बाहत्तर हजार रुपय देणंही होतं. चाळीस-पन्नास रुपये उत्पन्न आणि चाळीस-पन्नास रुपये खर्च असताना कोकणात त्याचं जे एक घर होतं तेच आता बाहत्तर हजारांची उलाढाल होऊनही बायको-मुलांना शिल्लक उरलं होतं !'

गणूकाका घरी निघून गेल्यानंतर विचार करता करता नुकतीच कुठं तरी वाचलेली एक मजेदार गोष्ट मला आठवली. उंच उडण्याचे अनेक उच्चांक मोडणारी एक ऑस्ट्रेलियन वैमानिक स्त्री तिबेटातल्या एका पठारावर एकदा उतरली होती. तिथं एका गुहेत कित्येक वर्षं तपश्चर्या करीत बसलेला कुणी तरी एक लामा आहे असं तिला कळलं. तेव्हा मोठ्या प्रयासानं त्याची परवानगी मिळवून ती त्याला भेटायला गेली.

'हं, काय करतेस तू ?' त्यानं तिला विचारलं.

'एका उड्डाणात मी ऑस्ट्रेलियाहून हिंदुस्थानात आले.' ती म्हणाली.

'बरं, पुढं ?' तो म्हणाला.

'आणखी एका उड्डाणात मी विलायतेला पोहोचेन !'

'बरं, पुढं ?'

'तिथून एका उड्डाणात अमेरिकेला.'

'बरं, पुढं ?'

'आणखी एकाच उड्डाणात ऑस्ट्रेलियाला.'

'बरं, पुढं ?'

'वीस हजार फूट उंचीचा उच्चांक मी मोडला आहे. आता तीस हजारावर जाण्याचा मी प्रयत्न करणार आहे.'

'बरं, मग पुढं ?'

'पुढं आणखी काय ?' असं म्हणून वैतागून ती तिथून निघून गेली म्हणतात; आणि नंतर कसला तरी उच्चांक मोडताना विमान कोसळून मरून गेली.

'पुढं काय ?' 'पुढं काय ?' असं तिला विचारण्यात मला वाटतं, त्या लामाचा उद्देश हाच होता की एवढे उच्चांक मोडून मोडून तू पुढं काय करणार, तर शेवटी मरणारच ना ? मग मी इथं वर्षानुवर्षं एका जागेवर बसून निर्वाण साधतो आहे तेच अधिक चांगलं नाही का ? मात्र हीच गोष्ट त्या लामावर तिलाही उलटविता आली असती, असं मला वाटतं. 'तू काय दहा वर्षं तपश्चर्या

केलीस; पुढं ? आत्म्याचं ज्ञान; पुढं ? निर्वाण; पुढं ?' पुढं काय सांगणार होता तो लामा ? भौतिक प्रगतीची पराकाष्ठा करून ती मेली, आणि आध्यात्मिक प्रगतीचा उच्चांक गाठून तोही मरणार; पुढं काय, तर वजाबाकी शून्य !

गणूकाकांच्या त्या शेजाऱ्याला चाळीस-पन्नास रुपये मिळत तेव्हा उद्या काय होईल म्हणून संसाराची चिंता, सत्तर हजारांच्या उलाढाली केल्या तेव्हा तितकेच पट अधिक धंद्याच्या चिंता. सुख जितक्या पटींनी वाढत गेलं तितक्याच पटींनी दुःखही वाढत जात होतं. लोक म्हणत होते, त्याची भरभराट होते आहे. धंद्याचीही अशीच प्रगती होत होती. पन्नास रुपयांची आवक आणि पन्नास रुपयांची जावक होती, त्याऐवजी पन्नास हजारांची आवक आणि पन्नास हजारांची जावक झाली !

मागं एकदा गणूकाकांनी आधुनिक सुधारणेवर हल्ला चढविला होता. 'कसली आली आहे सुधारणा,' ते म्हणाले होते, 'पूर्वी लोक कसे सुखात होते. घांदल नाही की गडबड नाही. मोटरी-विमानाच्या गोष्टी तुम्ही सांगता, पण या सुखाबरोबर अपघातांची नी हजार यातायातींची दुःखं वाढली की !' त्यांच्या या प्रतिगामी विचारसरणीला खोडून काढताना मी मोठा पुरोगामी आव आणून म्हणालो होतो, "पायथ्याशीच रखडणाऱ्या माणसानं, डोंगरमाथ्यावर उभा राहून सृष्टिसौंदर्य पाहणाऱ्यालाहंसावं हवं तर, 'सृष्टिसौंदर्याचं सुख मिळत असेल त्याला, पण ऊर फुटेपर्यंत वर चढायचं दुःख सहन करावंच लागतं की नाही पहिल्यांदा !' आणि हीच तर्कपद्धती पुढं चालवायची असेल तर दगड माणसापेक्षाही बरा; त्याला सुखदुःखाची कसलीच यातायात नाही ! जीवन म्हणजे लढा; काका, मोठं जीवन म्हणजे मोठा लढा; त्या लढ्यातल्या जखमाही मोठ्या नी विजयही मोठा आणि अर्थात त्या मोठ्या विजयाचं सुखही मोठं."

प्रगतीचं हे सर्व तत्त्वज्ञान ठीक होतं. त्यात काही चूक नाही. दगडाला दुःख नाही आणि सुखही नाही. मागासलेल्या मानवाला सुख थोडं, पण त्याबरोबर दुःखही थोडं. प्रगत मानवाला सुख मोठं आणि दुःखही मोठं. म्हणजे शेवटी वजाबाकी शून्यच. मग प्रगती म्हणजे काय ? अर्थात मोठ शून्य ! लहानपणी गणितं शिकविताना पाचातून पाच गेले शून्य आणि पाच हजारांतून पाच हजार गेले तरी शून्यच हा घोटाळा मला कळत नसे. पाच हजारांतून पाच हजार गेले म्हणजे पाचातून पाच गेल्यानंतर निघालेल्या शून्यापेक्षा मोठं शून्य आलं पाहिजे, असं मला वाटे; आणि मास्तरांना मी एकदा तसं म्हणालोही; पण मास्तरांनी 'गाढव आहेस; चल, चालता हो !' म्हणून मला हाकलून दिलं होतं. जवळ जवळ तीस वर्षांनी ते कोडं सुटलं !

* * *

## २०.

# देवदारु आणि चक्रवाक्

सर्वांनाच असं होतं की काय कुणाला ठाऊक! मला मात्र असं केव्हा केव्हा होतं खरं. गेली पंचवीस–तीस वर्ष मुंबईच्या एका विशिष्ट रस्त्यावरून मी जातो–येतो आहे; पण परवा एक मोठी गंमत झाली. रस्त्यावरून जाताना नेहमी आपण समोर पाहात चालतो. त्या रस्त्यावरून जाताना परवा सहज मी वर मान केली आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला! माझ्या दृष्टीला पडलेली इमारत इतकी सात मजले उंच असेल आणि तिच्या शेवटच्या मजल्यावरील दगडी कमानीवर इतक्या सुंदर चित्राकृती कोरलेल्या असतील, असं मला पूर्वी कधीच वाटलं नव्हतं. गेली पंचवीस–तीस वर्ष ती इमारत त्या जागेवर आहे; गेली पंचवीस–तीस वर्ष त्या रस्त्यानं मी अगणित वेळा गेलो आहे; पण त्या इमारतीची ही भव्यता आणि हे सौंदर्य परवा मी सहज मान वर केली तेव्हा माझ्या दृष्टीला पडलं. किती तरी वेळ माझं मलाच आश्चर्य वाटत होतं आणि मी त्या इमारतीकडे पाहात उभा होतो.

आणि असाच अनुभव काही काही शब्दांच्या बाबतीत मला आला आहे. एखाद्या खेळण्याच्या बाबतीत लहानपणी होतं ना, तसंच शब्दांच्या बाबतीत माझं झालं आहे. लहानपणी कुणी तरी मला एक रंगीत पेटी बक्षीस दिली होती. दोन–चार महिने त्या पेटीचं कौतुक केल्यानंतर मुलांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणं त्या पेटीवरचं माझं लक्ष उडालं आणि ती अडगळीत पडलेल्या इतर खेळण्यात जाऊन पडली. वर्ष दोन वर्षांनी ती अडगळ चिवडीत असता ती पेटी माझ्या हाती आली आणि उगाच त्या पेटीवर इकडेतिकडे मी टिचक्या मारू लागलो! एक टिचकी चुकून नेमकी त्या पेटीत असलेल्या कुठल्या तरी कळेवर बसली आणि त्या पेटीतून एक क्षण दोन क्षण टिन् टिन्...टण्...टण्...अशी सुंदर स्वरमालिका

बाहेर पडली. त्या पेटीत अशी काही कळ असेल हे पूर्वी मला माहीतच नव्हतं. मला ती एक साधी रंगीत पेटी वाटत होती. त्या पेटीतली ही नवीन गंमत अनुभवाला आल्याबरोबर माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. या खेळण्यासारखंच पुष्कळ वेळा काही शब्दांचं होतं. ते शब्द अनेक वेळा आपण पाहात असतो, ऐकत असतो, वापरीत असतो, त्यांचा अर्थ आपणाला पूर्णपणानं अवगत असतो; पण त्यांच्यात दडलेलं एखादं सौंदर्य एकदम अनपेक्षितपणं केव्हा केव्हा आपल्या दृष्टीला पडतं.

देवदारु आणि चक्रवाक् या दोन संस्कृत शब्दांतलं अदृष्टपूर्व सौंदर्य असंच माझ्या एकदा नजरेला आलं. देवदारु म्हणजे देवदाराचं झाड. एक विशिष्ट प्रकारचं लाकूड या झाडापासून मिळतं आणि त्याचे अनेक उपयोग आपण करतो; एवढं आपणा सर्वांना माहीत आहे. अमकं देवदाराचं लाकूड हेही आपण ओळखू शकतो; पण देवदारु — देवांचा वृक्ष — हेच नाव या झाडाला का दिलं असेल याचा विचार आपल्या डोक्यात कधी येतो का ? माझ्या डोक्यात तरी कधी आला नव्हता. खुर्ची या शब्दाचा विचार करताना 'खु' आणि 'र्ची' या अक्षरांना काही अर्थ असेल हा विचार जसा आपण कधी करीत नाही, त्याप्रमाणंच देव व दारु याला काही अर्थ असेल असं मला वाटत नव्हतं. खुर्ची म्हणजे अमुक एक वस्तु त्याप्रमाणंच देवदार म्हणजे अमुक एक झाड, इतकंच; पण काश्मीरात फिरत असताना या शब्दामागं दडलेला भव्योदात्त अर्थ एकदम माझ्या ध्यानात आला. जी झाडं पाहून देवदारु हे नाव संस्कृत भाषेत स्फुरलं असेल ती खरी देवदाराची झाडं काश्मीरातच दिसतात. बरीचशी संस्कृत भाषा याच प्रदेशात बनली आणि कालिदासादी संस्कृत कवी याच वनश्रीचं अनेक वेळा वर्णन करतात. काश्मीरातला हा देवदारु माडाइतका किंवा माडापेक्षाही उंच सरळ आकाशात गेलेला असतो. निळसर हिरव्या रंगाच्या त्याच्या निबिड पर्णसंभाराचा घेर खाली केवढा तरी मोठा असतो आणि तो लहान होत होत वर शेंड्याकडे देवळाच्या कळसाप्रमाणं अगदी निमुळता होतो. देवालयाची किंवा चर्चची इमारत मुद्दाम एका विशिष्ट पद्धतीनं बांधलेली असते. वर निमुळती होत होत तिचा कळस उंच आकाशात गेलेला असतो. हेतू हा, की पाहणाराचं म न वर, उंच, आकाशाकडे, देवाच्या निवासस्थानाकडे, ओढलं जावं.

एखादं भव्य देवालय पाहताना जशा पवित्र मंगल भावना मनात जागृत होतात, अगदी तशाच भावना काश्मीरातला हा भव्य सुंदर देवदारु पाहताना अनुभवाला येऊन मन प्रसन्न होतं. हा वृक्ष पाहिल्याबरोबर ज्यानं कुणी देवदारु हे नाव त्याला पहिल्यांदा दिलं असेल, त्याच्या तोंडातून तो शब्दच अगदी सहज बाहेर पडला असेल. तो धिप्पाड, भव्य, सुंदर वृक्ष पाहिल्याबरोबर तो माणूस उद्‌गारला असेल, 'ही इतर सटर-फटर वृक्ष-झाडं आम्हां माणसांची—हा महान् वृक्ष देवांचा वृक्ष—देवदारु ! ' काश्मीरातला देवदार पाहिल्याबरोबर 'देवदारु' या शब्दातला हा सर्व अर्थ क्षणात माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला.

देवदारु या शब्दाप्रमाणंच चक्रवाक् हा शब्द कित्येक वर्षं संस्कृत वाङमयात मी वाचतो आहे. चक्रवाक् हा एक पक्षी आहे. रात्र झाली की चक्रवाक् आणि चक्रवाकी या दोघांच्यामध्ये फक्त एक कमळाचं पान असतं; पण ती एकमेकांना दिसत नाहीत आणि सारी रात्र दोघांना विरहव्याकुलतेत काढावी लागते, असा संस्कृत वाङमयात एक सुंदर संकेत आहे. हे सर्व मला माहीत होतं; पण चक्र आणि वाक् हे चक्रवाक् या नावातले दोन्ही भाग किती अर्थपूर्ण आहेत याचा अनुभव असाच एकाएकी काश्मीरातच मला आला. एका लहान गावात नदीच्या काठाशी असलेल्या एका हॉटेलात मी राहात होतो. मध्यरात्री मी सहज जागा झालो. पहाडावरून उड्या मारीत वाहणाऱ्या नदीच्या पाण्याचा धो धो आवाज आणि आजूबाजूच्या प्रचंड पहाडावरील गर्द झाडातून येणारा किर्र ध्वनी कानावर येत होता; पण या सर्व आवाजांना मागं टाकणारा एक चमत्कारिक सूर माझ्या कानावर पडू लागला. कुणी तरी दोन पक्षी आळीपाळीनं आक्रंदन करीत होते. एकाचा करुण आर्त सूर चढत चढत वर जाई; आणि तो हवेत विलीन होतो न होतो तोच दुसऱ्याचा वेगळा पण तितकाच आर्त करुण स्वर त्या हाकेला उत्तर देई; आणि हे स्वर इतके भेदक होते, की किती तरी वेळ मी ते ऐकतच राहिलो. नोकराला जागा करून हे कोण पक्षी आहेत म्हणून विचारता त्यानं काही तरी काश्मीरी नाव सांगितलं आणि नदीकाठी असणारे हे पक्षी सबंध रात्रभर असाच आवाज करीत असतात असं तो म्हणाला. मी झोपण्याचा प्रयत्न करू लागलो; पण ते सूर अविरत माझ्या कानांवर पडत होते. मला ते दुसरं काही सुचूच देईनात ! किती वेळानं मला झोप लागली कुणाला ठाऊक, पण सकाळी जागा झाल्याबरोबर ते सूर ऐकू येत नव्हते. तरीही सारखे तेच माझ्या कानात घुमत होते. एकदम माझ्या डोक्यात कल्पना चमकली. हीच ती चक्रवाकांची जोडी. एकदा पहिल्याचे विशिष्ट सूर, नंतर दुसऱ्याचे, नंतर पहिल्याचे, नंतर पुन्हा दुसऱ्याचे असं सारखं रात्रभर त्यांच्या वाचेचं चक्र चालू असतं म्हणून ते चक्रवाक्! एकानं हाक मारायची आणि दुसऱ्यानं तिला साद द्यायची. अशा त्यांच्या त्या स्वरमालिकेत इतकी विलक्षण आर्तता असते, की हे दोन पक्षी अगदी एकमेकांजवळ असून काही तरी कारणानं एकमेकांपाशी जाऊ शकत नाहीत ही कल्पना कुणाच्याही मनात अगदी. सहजासहजी यावी रात्रीच्या वेळी त्या पक्ष्यांचं चाललेलं ते अविरत आक्रंदन कानावर पडल्याबरोबर कमल-पत्रानं दोघं दूरावल्याचा तो मनोहर संकेत एखाद्या संस्कृत कवीच्या मनात अगदी सहज संभवला असेल यात नवल नाही.

* * *

## २१.

# म ना चे पिं ज रे—

या पावसाळ्याच्या सुरुवातीला मी दोन रुपयांना एक छत्री विकत घेतली. हो हो, दोन रुपयांना छत्री. साध्या छत्र्यांचीही किंमत या दिवसांत दहा-बारा रुपये आहे,—फार काय, जुन्या बाजारातदेखील पाच-सहा रुपयांखाली छत्री मिळत नाही, आणि दोन रुपयांत मला छत्री मिळाली तरी कशी याचं पुष्कळांना आश्चर्य वाटेल. इतरांची गोष्ट कशाला ? जुन्या बाजारातल्या त्या दुकानदारालाही मी ती छत्री निवडली तेव्हा आश्चर्य वाटलं. आधी एक गोष्ट स्पष्टच सांगून टाकलेली बरी. पावसाळ्यात छत्री वापरण्याच्या मी विरुद्ध आहे; पण शेवटी छत्री घ्यायचीच असं ठरवलं, तेव्हा जुन्या बाजारात गेलो आणि अगदी कमीत कमी किमतीची छत्री मला दाखव म्हणून त्या दुकानदाराला सांगितलं. पाच-सहा रुपये किमतीच्या दोन-चार चांगल्या छत्र्या त्यानं दाखवल्या. त्यांपैकी एक मी घेणार होतो; इतक्यात कोपऱ्यातल्या एका छत्रीकडे माझं लक्ष गेलं.

'त्या छत्रीची किमत काय ?' मी विचारलं.

'दोन रुपये, साहेब' तो म्हणाला, 'पण ती घेऊ नका तुम्ही. सबंध पाणी अंगावर येईल बघा.'

'पण ते कोपऱ्यात जे काही आहे ती छत्री आहे ना ? आणि उघडून दोन-चार दिवस डोक्यावर धरता येईल ना ?'

'हो,' तो म्हणाला, 'पण साहेब—'

मी दोन रुपये त्याच्या अंगावर टाकले, आणि ती छत्री घेऊन आलो. अशा तऱ्हेनं मी दोन रुपयांना छत्री घेतली, इतकंच नव्हे, तर ज्या उद्देशानं आपण

पावसाळ्यात छत्र्या घेतो, तो उद्देशही अगदी संपूर्णपणे सफल झाला. छत्री घेण्याचा उद्देश पावसाळ्यात स्वतःचा पाण्यापासून बचाव करणं हा आहे असं पुष्कळांना वाटतं; पण ती केवळ स्वतःची फसवणूक आहे. छत्रीशिवाय आपण पावसात जितके भिजतो तितकेच, किंवहुना बरेच वेळा थोडे अधिकच छत्री असताना भिजतो. त्याशिवाय ती हरवली, मोडली, उडाली, किंवा उलटी झाली म्हणजे नाना प्रकारचा मनस्ताप होतो तो वेगळाच. छत्री घेण्यात आपला खरा उद्देश, 'का हो, भिजतसे चाललात ? छत्री नाही वाटतं ?' असं कुणी विचारू नये, किंवा भिजत चाललेल्याकडे इतर लोक, 'कोण वेडा हा !' अशा अर्थानं टकमक पाहतात, तसं—अर्थात ते स्वतः छत्री असूनही भिजतच असतात,—आपणाकडे कुणी पाहू नये, हाच असतो. मी जे म्हटलं की ते छत्री नावाचं दोन रुपयांचं काही तरी विकत घेऊन माझा उद्देश अगदी संपूर्णपणे सफल झाला तो याच अर्थानं. खरं सांगायचं म्हणजे आपण स्वतःकरिता छत्री मुळीच घेत नाही; तो सर्व खटाटोप दुसऱ्याकरिता असतो.

मला वाटतं, शेकडा नव्वद गोष्टी आपण अशाच केवळ दुसऱ्याकरिता करीत असतो. हा करतो म्हणून तो करतो, तो करतो म्हणून तिसरा करतो; आणि मग सर्वचजण ती गोष्ट करू लागतात. खरोखर आपणाला त्या गोष्टीचा काही उपयोग आहे किंवा तिच्यापासून आपणाला काही सुख आहे याचा कुणीच विचार करीत नाही. म्हणजे माझं म्हणणं असं नाही की माणसानं स्वतःपुरतं पाहावं, दुसऱ्याचा मुळी विचारच करू नये. उलट मी असं म्हणेन की दुसऱ्याला सुख होत असेल तर आपण थोडं दुःखही सहन करायला हरकत नाही; पण अनेक गोष्टी आपण अशा करतो, की ज्यांपासून आपणाला सुख नसतंच; पण दुसऱ्याला त्यांचा काडीइतका उपयोग नसतो. जे दुःख अपरिहार्य आहे किंवा जे दुःख सहन केल्यामुळं इतरांना काही सुख होणार आहे, ते सहन करणं ठीक; पण काही एक कारण नसताना उगाच स्वतःच्या जिवाचा कोंडमारा करायचा म्हणजे काय ? एकामागून एक खड्डयात उड्या टाकणाऱ्या मेंढ्या आणि माणसं यांच्यात फरक तो काय राहिला मग ?

परिस्थितीचे पिंजरे तोडून टाकल्याशिवाय मानवाची मुक्ती होत नाही म्हणतात. सामाजिक, आर्थिक, राजकीय, हरएक तऱ्हेच्या पिंजऱ्यात मानवी व्यक्तित्व खुरटत चाललं आहे, आणि हे पिंजरे ताबडतोब तोडून फोडून टाकले पाहिजेत यात शंकाच नाही; पण एका इंग्रजी म्हणीत म्हटल्याप्रमाणं दानधर्माची सुरुवात ज्याप्रमाणं स्वतःच्या घरापासूनच व्हावी, त्याप्रमाणं या जागतिक क्रांतीचाही प्रारंभ मनाचे पिंजरे तोडून टाकण्यापासून व्हावा हे उत्तम. मोठमोठी माणसं मोठमोठ्या क्रांत्या करताहेत तोपर्यंत आपल्यासारख्या छोट्या माणसांनी 'छत्री-छप्पर मुर्दाबाद !' इथपासूनच सुरुवात करायला काय हरकत आहे ? आणि ते

किती सोपं आहे पाहा. हिशेबच करून दाखवतो. पावसाळा अजमासे चार महिने म्हणजे एकशेवीस दिवस असतो. पैकी फार तर साठ दिवस पाऊस पडतो. म्हणजे उरले साठ दिवस. त्यांतून तीस दिवस तरी रात्रीचा पडतो. राहिले तीस दिवस. तोही काही सारखा पडत नाही. आपण घरातल्या घरात तरी किंवा कामाच्या ठिकाणी असता निदान पंधरा दिवस तरी पावसाचे जातात. म्हणजे फक्त पंधराच उरले. थोडा झिम झिम पाऊस असला तर जाता-येता कुठं तरी झाडाखाली किंवा एखाद्या कोपऱ्यात पाच मिनिटं थांबून आपण सहज न भिजता घरी येऊ शकतो. असे सात दिवस तरी जातात. आता आठच दिवस राहिले. आपण जायला यायला आणि जोराचा पाऊस पडायला — असा योगायोग फार तर चार वेळा येतो. चार महिन्यातून केवळ चार वेळा छत्रीचा आपणाला उपयोग होतो, आणि इतक्या जोराच्या पावसात आपण छत्री असूनही भिजतोच ! आणि तरीही आपण वाटेल ती किंमत देऊन छत्री विकत घ्यायची यातायात काय करतो, ती हरवल्यावर सुस्कारे काय सोडतो, ती उडाल्यावर तिच्यामागून चिखलपाण्यातून वेड्यासारखे धावतो काय, आणि ती उलटी झाल्यावर भररस्त्यात वेडचा-वाकडचा उडचा काय मारतो.! छे छे, पुढल्या वर्षापासून 'छत्री-छप्पर मुर्दाबाद !'

* * *

## २२.

# आरसा हसला . . . .

मनुष्य-स्वभावाचं केव्हा केव्हा मनापासून हसू येतं. माझंच पाहा ना, परवा सहज हाती आली म्हणून वीस-बावीस वर्षांपूर्वी मी लिहिलेली माझीच एक गोष्ट मी वाचीत होतो. तिच्यात एका पात्राचं वर्णन करताना, तो माणूस चांगला चाळीस-पंचेचाळीस वर्षांचा म्हातारा होता असं मी लिहिलं आहे. आता मी त्या वयाचा झालो आहे. तेव्हा ते वर्णन वाचताना मला कसंसंच वाटलं. 'चाळीस-पंचेचाळीस वर्षांचा माणूस कसला म्हातारा, –– चांगला तरुण असतो की,' मी मनातल्या मनात पुटपुटलो. नंतर अलीकडे लिहिलेला एक लेख पुन्हा पाहात असता एक मजेदार गोष्ट माझ्या ध्यानात आली. तिथं कुणा तरी म्हाताऱ्याचं वर्णन करताना चांगला साठ-सत्तर वर्षांचा तो होता, असं मी लिहिलं आहे. म्हणजे आता माझ्या मते, साठ-सत्तर वर्षं झाली म्हणजेच माणूस म्हातारा होतो. मला वाटतं, माझ्या साठ-सत्तराव्या वर्षी एखादी गोष्ट जर मी लिहिली तर म्हाताऱ्या माणसाचं वर्णन, तो चांगला ऐंशी-नव्वद वर्षांचा होता, असं मी करीन !

का कुणाला ठाऊक, पण असं होतं खरं. असलीच आणखी एक गंमत सांगण्यासारखी आहे. काही दिवसांपूर्वी एका युरोपियन विद्वानाचं आमच्या कॉलेजात व्याख्यान झालं. बोलता बोलता कुणाची तरी गोष्ट सांगताना तो म्हणाला, 'चाळीस-बेचाळीस वर्षांचा तो तरुण होता, –– त्यानं एकदम तिला मागणी घातली...' 'चाळीस-बेचाळीस वर्षांचा तरुण,' हे शब्द वक्त्याच्या तोंडातून बाहेर पडल्याबरोबर कॉलेज-विद्यार्थ्यांच्या त्या प्रचंड श्रोतृसमुदायातून हास्याचा एकच कल्लोळ उठला. वीस-बावीस वर्षांच्या तरुणांना 'चाळीस-बेचाळीस वर्षांचा तरुण' या शब्दांचं विलक्षण हसू आलं. मुलं का हसली ते त्या बिचाऱ्या युरोपियन वक्त्याच्या ध्यानातच येईना. तो क्षणभर बावरल्यासारखा झाला. तो स्वतः चाळीस-बेचाळीस

वर्षाचा होता; आणि त्याच्या व्याख्यानाला हजर असलेले आम्ही तीन-चार प्राध्यापकही चाळीस-पंचेचाळिशीच्या आसपासचे होतो. ·त्याच्या त्या शब्दांचं आम्हांला काहीच वाटलं नव्हतं; पण मुलं हसली तेव्हा आमच्या सर्व काही ध्यानात आलं.

खरोखरच माणूस म्हातारा केव्हा होत असेल तो होवो; पण कुणी तरी अनुभवी शहाण्यानं म्हटलं आहे ते जर खरं असेल तर मग मी म्हातारा खास नाही. तो शहाणा म्हणतो, ' तारुण्याचं लक्षण हेच की त्या वयात माणूस जे आवडेल ते खातो; आणि जे खातो ते त्याला आवडायला लागलं की तो म्हातारा झाला म्हणून समजावं ! ' तरुणपणी माणूस तिखट, तेलकट, काय वाटेल ते खात असतो. म्हातारपणाचा वारा लागला की मग मात्र तो बिनतिखटाचं, वाफेवरलं वगैरे खाऊ लागतो- आणि तेच किती चवदार लागतं हे स्वतःला आणि इतरांना अट्टाहासानं समजावून देऊ लागतो ! स्त्री जितकं सांगते तितकंच तिचं वय, आणि पुरुषाला जे वाटतं तेच त्याचं वय, असं कुणी तरी म्हटलं आहे तेच मला वाटतं खरं.

वयाच्या या गोष्टी एका डॉक्टर-मित्राबरोबर करीत असता त्यानं एक आश्चर्यकारक नवा शोध मला सांगितला. तो म्हणाला, ' आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या एका शास्त्रज्ञानं अलीकडे असं सिद्ध केलंय् की लौकिक दृष्टया पंचवीस वर्ष वयाचा असणारा माणूस खरोखर पंचावन्न वर्षाचा असेल; तर एखादे वेळी पंचावन्न वर्षाचा खरोखर पंचवीसच वर्षाचा असेल. '

' म्हणजे ? ' मी उद्गारलो, ' याचा अर्थ काय ? '

' याचा अर्थ सोपा आहे, ' माझा डॉक्टर-मित्र सांगू लागला, त्या शास्त्रज्ञानं हा हिशोब दाखवणारं एक गणिती समीकरणही तयार केलंय्. ती गुंतागुंत तुला समजणार नाही. थोडक्यात असं सांगता येईल : समज, एक पंचवीस वर्षाचा माणूस आहे, आणि एक पंचावन्न वर्षाचा आहे. दोघांच्याही हातांना एकाच प्रकारच्या शस्त्राने पाव इंच लांब, पाव इंच रुंद आणि पाव इंच खोल अशी सारखीच जखम केली, आणि दोघांनाही एकाच हवामानाच्या अगदी सारख्याच दोन खोल्यात घेऊन दिलं. पंचावन्न वर्ष वयाच्या माणसाची जखम पाच दिवसांत भरून आली, आणि त्याच परिस्थितीतल्या पंचवीस वर्षाच्या माणसाच्या जखमेने भरून यायला दहा दिवस घेतले; तर आम्हां डॉक्टरांच्या दृष्टीनं, पन्नास-पंचावन्न वर्षाचा माणूस पंचविशीतला, आणि तो पंचवीस वर्षाचा तरुण पन्नाशीतला असंच म्हटलं पाहिजे. काही लोक जन्मतःच म्हातारे असतात, तर काही म्हातारपणी तरुण असतात. आलं लक्षांत ? '

' विचार करण्यासारखी गोष्ट आहे खरी. ' मी पुटपुटलो.

खरोखरच मी विचार करू लागलो. शारीरिक दृष्टया पन्नाशीचा माणूस पंचवीस वर्षांचा तरुण आणि पंचविशीचा जर पन्नास वर्षांचा म्हातारा असू शकतो, तर मनाच्या दृष्टीनं हे किती तरी पटींनी अधिक खरं असलं पाहिजे. आहेच मुळी ते खरं. त्याचा 'फॉर्म्युला' मी देतो. या शोधाबद्दल त्या शास्त्रज्ञासारखं मला 'नोबेल पारितोषिक' मिळेल की काय ते मला सांगता येत नाही; पण काही म्हातारे पाहिल्यानंतर हा 'फॉर्म्युला' मला सहज सापडला. सत्तराव्या वर्षी या म्हाताऱ्यांचं मन सात वर्षांच्या बालकाच्या इतकं ताजं, टवटवीत आणि निर्मळ आहे. एकाच म्हाताऱ्याचं उदाहरण देतो. आपली नातवंडं शोभतील अशा मुलांत सेनापती बापट किती सहजपणे मिसळतात, -- त्यांच्या बोलण्यात, त्यांच्या चालण्यात, त्यांच्या खेळण्यात किती मोकळेपणानं रंगून जातात. त्या मुलांनाही आपण सत्तरी उलटलेल्या एका भीष्माचार्यांशी बोलतो आहोत, असं वाटत नाही; पण त्यांच्या मनाच्या ताजेपणाची खात्री मला पुरेपूर पटली ती त्यांचं एक व्याख्यान ऐकताना. ते सहज म्हणाले, 'मला लोक विचारतात, तुम्ही हल्ली झाडू घेऊन रस्ते साफ करण्याचं काम का करता ? पुष्कळ कार्यकर्त्यांबरोबर मी कामं केली. माणसं केव्हा केव्हा कंटाळतात, 'नाही' म्हणतात. झाडूचं तसं नाही. विचारावं तेव्हा ती तुमच्याबरोबर काम करायला तयार..., !'

झाडूला विचारण्याची आणि तिच्याबरोबर काम करण्याची ही कल्पना आपल्या बाहुलीशी, भिंतीशी, झाडाशी किंवा खुर्चीशी गप्पागोष्टी करीत बसणाऱ्या एखाद्या बालकाच्याच तोंडी शोभण्यासारखी नाही का ? मुलांनाच अशा साध्या दिसणाऱ्या, पण मोठ्या माणसांना किंवा कवींनाही न सुचणाऱ्या सुंदर कल्पना सुचतात. एका लहान मुलाला घेऊन एके दिवशी सकाळी मी खिडकीशी उभा होतो. खिडकीजवळ एक आरसा होता. आरशावर अचानक सूर्याचा किरण पडला आणि आरसा चमकला. त्या मुलानं डोळे मिचकावले. 'काय रे झालं ?' मी त्याला विचारलं

तो चटकन म्हणाला, 'आरसा हसला, काका !'

एकदा एका मुलाला त्याच्या वडिलांनी सकाळच्या वेळी सहज विचारलं, 'काय रे, रात्र कुठं गेली ?' तो मुलगा एकदम म्हणाला, 'दिवसानं खाऊन टाकली रात्र !'

'मग या काळ्या काळ्या सावल्या रस्त्यावर दिसताहेत त्या कुठून आल्या ?' वडिलांनी गमतीनं विचारलं.

मुलाचं उत्तर तयार होतं. तो चट्‌दिशी म्हणाला, 'मी जेवताना ताटाच्या बाहेर भाताची शितं नाही का उडत, – तशीच दिवस रात्र खाऊ लागला तेव्हा ही शितं उडालीत !'

किती सुंदर कल्पना आहे ही. सत्तराव्या वर्षीही बापटांना अशाच साध्या, पण सुंदर कल्पना सहज सुचतात. झालं तर ! हा घ्या माझा मनोयौवनाचा 'फॉर्म्युला' : मुलांत मूल होतो आणि मुलांच्यासारख्या सुंदर कल्पना जो सहज बोलून जातो तोच चिरतरुण.

* * *

## २३.

# म ना च्या ढा ली

अतिशय सुस्वभावी, परोपकारी वृत्तीचे असे माझे एक मित्र आहेत, पण त्यांच्या एका गोष्टीचं मला नेहमी आश्चर्य वाटतं. मला फक्त आश्चर्य वाटतं पण माझ्याइतकं त्यांना न ओळखणाऱ्या एखाद्या नव्या माणसाला ते गृहस्थ अगदी उलटया काळजाचे आहेत असं केव्हा केव्हा वाटेल. ते वागतातच तसे केव्हा केव्हा. आमच्या परिचयाचे एक गृहस्थ त्यांचा दम्याचा विकार बळावून एकाएकी वारल्याचे एकदा आम्हांला कळलं.

त्याबरोबर माझे हे मित्र एकदम म्हणाले, 'हजार वेळा त्याला मी सांगितलं असेल की तेवढा विडीचा नाद सोड म्हणून. एक संपली की दुसरी पेटवायचा. शेवटी हे असं झालं.'

त्यांच्या कचेरीतील एक कारकून हृदयक्रिया बंद पडून असाच एकदा वारला. त्याची हकीकत सांगताना ते म्हणाले, 'हृदयक्रिया बंद पडून मरेल नाही तर काय? पाचव्या मजल्यावर राहायचा. रोज पाच जिने चढायचे नि उतरायचे म्हणजे काय थट्टा आहे ? हृदयावर परिणाम होणारच.'

धावत्या बसमध्ये चढायचा प्रयत्न करताना त्यांचा पुतण्या हात सुटून पडला आणि पायाचं हाड मोडल्यामुळे तीन महिने त्याला इस्पितळात पडून राहावं लागलं.

'या लोकांचे पाय मोडायचेच. झाला एक दिवस ऑफिसात उशीर तर साहेब काय फाशी देणार आहे ? सोडून द्यायची ती बस.'

कुणाला अपघात झाला किंवा कुणी मेला तर आमच्याप्रमाणेच आमच्या या मित्रालाही वाईट वाटतं. तो हृदयशून्य नाही याबद्दल माझी खात्री आहे; म्हणून

तो असे काही उद्गार काढी तेव्हा मला आश्चर्य वाटे; पण एकदा एक प्रसंग घडला आणि त्याच्या असल्या उद्गारांचं मला आश्चर्य वाटेनासं झालं. तो असं का बोलतो त्याचा छडा मला लागला. छडा लागला असं मला तरी वाटतं. कुणी आणखी काही वेगळं कारण सांगू शकेल; पण मला माझं कारण खरं वाटतं. माझा हा मित्र एका कचेरीत हेड् क्लार्क आहे. एकदा असं झालं की त्याच्या आजूबाजूच्या कचेऱ्यांतले दोन हेड् क्लार्क आठ-पंधरा दिवसांच्या अंतरानं काही ना काही होऊन कैलासवासी झाले. कित्येक दिवस माझा हा मित्र बेचैन होता.

'अरे, असा घाबरल्यासारखा काय दिसतोस अलीकडे तू ?' मी त्याला विचारलं.

'तसं काही नाही रे,' तो पुटपुटला, 'पण हेड् क्लार्कच एकामागून एक मरतात म्हणजे काय ?'

त्याचे हे शब्द ऐकून माझ्या डोक्यात प्रकाश पडू लागला. त्याच्यासारखेच विडी-तंबाखू न ओढणारे, तळमजल्यावर राहणारे, चालत्या बसमध्ये चढण्याचा कधीही प्रयत्न न करणारे हेड् क्लार्क एकदम मरू लागले, तेव्हा तो घाबरून गेला. इथं मरण्याचं कारण काहीच देता येईना. एकच कारण दिसत होतं; ते म्हणजे माणूस हेड् क्लार्क असणं ! तेव्हा आमच्या मित्राची घाबरगुंडी उडाली. माझ्या तावडतोब ध्यानात आलं, कुणी मेला किंवा कुणी पडला की तो पटकन तसं काही-तरी का बोलत असे. याचं कारण तो दुष्ट किंवा उलटया काळजाचा होता असं नव्हे; तर काही वाईट बातमी कळली की त्याला भीती वाटे आणि ती लपविण्या-करिता--स्वतःच्या भेदरून गेलेल्या मनाचं समाधान करण्याकरिता तो तसं काहीतरी बोलून जाई. मी विडीतंबाखू ओढीत नाही, तेव्हा मला दमा होऊन मी मरणं शक्यच नाही; मी तळमजल्यावर राहतो, जिन्यांची चढउतार मुळीच करीत नाही, माझी हृदयक्रिया कशी बंद पडेल ? मी धावती बस पकडण्याचा कधी चुकूनही प्रयत्न करणार नाही, मला अपघात होणारच नाही; असं काहीतरी स्वतःच्या मनाचं समाधान तो करीत असावा; पण केवळ हेड् क्लार्क मरू लागले तेव्हा त्याची पाचावर धारण बसली ! बिच्चारा ! दोन हेड् क्लार्क एकदम वारले, हा केवळ त्याच्या नजरेला पडलेला योगायोग. किती तरी प्रकारचे लोक एका दिवशी जगात मरत असतात. विडया ओढ ओढ ओढणारे मरतात, तसेच विडीला स्पर्शही न करणारे दमा बळावून मरतात. तळमजल्यावर सारा जन्म काढणारेही हृदयक्रिया बंद पडून किती तरी मरतात; आणि अगदी निश्चल बसमध्ये चढता चढताही पाय घसरून पडणारे आणि हाड मोडून घेणारे काही कमी नाहीत !

पण माणसाचा स्वभाव असा आहे खरा. आमचा तो मित्र फार वेळा तसं काही तरी बोलतो म्हणून ते लक्षात येतं; पण आपण सर्वच जण केव्हा ना केव्हा, कळत अगर नकळत असंच काहीतरी स्वतःचं समाधान करून घेत असतो. आपण वर्षानुवर्ष सकाळ ते संध्याकाळ घाम काढून काम करतो आणि जेमतेम पोटापुरते

मिळवतो. एखादा काही तरी हातचलाखी करून एका दिवसात आपण जन्मात मिळवलं नाही इतकं मिळवतो आणि मग सुखानं राहात असलेला आपल्या दृष्टीला पडतो. आपण सर्व सभ्य पण दुःखी लोक लांब चेहरे करून गंभीरपणे एकमेकांना सांगतो, 'पचायचे नाहीत त्याला हे हरामाचे पैसे. शेवटी हाल हाल झाल्याशिवाय राहणार नाहीत. पापाचं प्रायश्चित्त मिळणारच.'

पुष्कळ वेळा सद्‌गुणी म्हणून नव्हे तर भित्रे म्हणून आपण पाप करीत नाही. पाप करणाराला जे सुख मिळालेलं असतं ते आपणाला हवं असतं; पण न मिळालेल्या द्राक्षांना आंबट म्हणणाऱ्या कोल्ह्याप्रमाणे त्या पाप करणाऱ्याला सुख मिळणार नाही; आणि आपण फार सद्‌गुणी असल्यामुळे पाप करू इच्छित नाही, असं ठासून स्वतःच्या मनाला सांगून आपण आपलं असह्य जीवन सुसह्य करीत असतो.

याला फसव, त्याला फसव असं करून चैनीत राहणाऱ्या एका माणसाबद्दल मला भेटेल तो सांगत असे, 'केव्हा ना केव्हा याचं बेंड फुटणार आणि हा फूटपाथवर पडणार पाहा.'

शेवटी मी त्या सर्वांना एकदा सांगितलं, 'हे पाहा, लांड्यालबाड्या करून चैनीत राहणाऱ्या कित्येकांची केव्हा ना केव्हा बेंडं फुटली असतील, पण ज्यांची शेवटपर्यंत फुटली नसतील असेही पुष्कळ होऊन गेले असतील. नाही नाही, म्हणता या माणसानंच पंधरा-वीस वर्ष तरी आतापर्यंत चारपांच जणांना टोप्या घालून मजेत काढलीच. फार तर आणखी पंधरा-वीस वर्ष त्याच्या आयुष्याची उरली असतील. कोट्यवधी माणसांनी भरलेल्या या अफाट जगात टोपी घालून घेणारे आणखी चारपाच बावळट त्याला सापडणार नाहीत की काय ?'

माझी ही मीमांसा ऐकून ते बिचारे अस्वस्थ झालेले दिसले. त्यांचं सात्विक समाधान मी उगीच काढून घेतलं, असं आता मला मनापासून वाटतं. पाप करण्याची ताकद असूनही पाप करीत नाही तो खरा सद्‌गुणी, हे अगदी खरं आहे; पण भित्रेपणामुळे का होईना, माणसं सदाचारी राहतात हेही काही वाईट नाही. शौर्याचा किंवा सदाचाराचा प्रश्न बाजूला ठेवला तरी पदोपदी नाना निराशांना तोंड देत धीमेपणानं जीवन जगणारी सामान्य माणसं अधून मधून स्वतःची निरुपद्रवी फसवणूक करून आपलं जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्यांचं ते निरुपद्रवी समाधान काढून घेणारे आम्ही तरी अतिशहाणे कोण ? एका कवीनं म्हटलं आहे, 'माणूस श्वासोच्छ्वास करतो आणि म्हणतो, मी जगतो. काय वेडा आहे माणूस ! एक एक श्वास तो गमावत असतो म्हणजे खरोखर तो मरत असतो.' तर्कशुद्ध विचार करता कविराज म्हणतात ते अगदी खरं आहे; पण प्रत्येक श्वास सोडताना मी मरतो असं माणूस म्हणायला लागला तर तो जगणारच नाही ! स्वतः कविराजही असा मंत्र अहोरात्र जपत नसतील याबद्दल माझी खात्री आहे !

* * *

२४.

# माझे आवडते पान

'वृत्तपत्रातलं तुमचं आवडतं पान कुठलं ?' असा प्रश्न विचारल्याबरोबर एकदम 'जाहिरातीचं पान ! ' असं मी बोलून गेलो; पण 'का ? ' असा पाठोपाठ दुसरा प्रश्न आल्याबरोबर मात्र मी बावरलो. 'का' ते मला तरी कुठं माहीत होतं ? आपणाला आवडणाऱ्या अशा अनेक गोष्टी आहेत की त्या आपल्याला का आवडतात ते सांगता येणं कठीण आहे. त्या आपणाला आवडतात खऱ्या. मग मी माझं मनोविश्लेषण करूं लागलो. खरंच, आपणाला जाहिरातींचंच पान विशेष का आवडतं ? मनोविश्लेषणशास्त्राचा मुख्य भर रोगाच्या अनेक वर्षांच्या इतिहासाचं संशोधन करण्यावर असतो. तेव्हा अगदी लहानपणी मी पहिल्यांदा वृत्तपत्र वाचू लागलो तेव्हापासूनच्या माझ्या आवडीनिवडींचा मी विचार करू लागलो; आणि माझ्या विशेष आवडीचं कारण तावडतोब सापडलं. लहानपणी इतर मजकूर वाचणं आणि वाचला तरी समजणं अशक्य होतं. जाहिरातींचा बहुतेक मजकूर चांगला मोठ्या जाडजूड टाइपांत असतो, इतकंच नव्हे, तर निरनिराळ्या चित्रविचित्र टाइपांत तो असतो, आणि जाहिरातीत चित्रंही असतात. तेव्हा लहानपणी तेच पान मी विशेष आवडीनं पाहावं, हे अगदी उघड होतं. अगदी कोवळ्या बालमनात रुजलेली ही आवड अर्थातच पुढे वयाबरोबर फोफावत गेली. पाह्यलंत, मनोविश्लेषणशास्त्र किती सोपं आहे ते !

आता यावर कुणी विचारील, तुम्ही लहानपणी वर्तमानपत्रं वाचीत होता किंवा निदान चाळीत तरी होता ही थाप कशावरून नाही ? या प्रश्नाला उत्तर देणं कठीण आहे, हे मी कबूल करतो. एवढ्या लहानपणचे पुरावे कुठून आणायचे ?

याबाबत तरी तुम्ही माझ्या शब्दांवर विश्वास ठेवला पाहिजे. ज्या अनेक कारणां-स्तव घरातली वडील माणसं माझ्या अंगावर खेकसत असत त्यांपैकी अभ्यासाची पुस्तकं मोडून वर्तमानपत्र हातात घेणं हे एक होतं, एवढं मला आठवतं. मात्र पुढं मोठेपणी मी वृत्तपत्र-व्यवसायात पडलो, तेव्हा लहानपणासूनच मला वृत्तपत्रवाच-नाचा विलक्षण नाद होता, अशी थाप ठोकून देण्याचा माझा मुळीच उद्देश नाही, हे सांगून ठेवतो. मी मोठा झालो आणि कुणी माझं चरित्र लिहिलं तर माझा चरित्र-कार मात्र अशी थाप ठेवून देण्याचा संभव आहे. शिवाजी महाराजांचं चरित्र लिहावयाचं म्हणजे लहानपणी इतर मुलं ' ट्यँव् ट्यँव् ' करतात तर महाराज पाळण्यातच ' स्वराज्य ! स्वराज्य ! ' म्हणून रडत असत असं सांगायचं; किंवा मोठेपणी अत्यंत निःस्पृह किंवा न्यायनिष्ठुर म्हणून विख्यात झालेले रामशास्त्री लहानपणी गोटया खेळतानासुद्धा न्यायासाठी झगडत, असं बेलाशक ठोकून द्यायचं असा सर्वसाधारणपणे चरित्रकारांचा रिवाज आहे ! असो. सांगायचा मुद्दा हाच की, माझ्या अंगी कसलाही मोठेपणा नाही; पण चित्रांमुळे म्हणा, मोठ्या टाइपां-मुळं म्हणा किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळं म्हणा, मला लहानपणी वर्तमान-पत्रातलं जाहिरातींचं पान आवडायचं, आणि आताही इतर कारणांमुळं ते आवडतं.

पुढे शाळेतल्या वरच्या वर्गात गेलो आणि वर्तमानपत्रातल्या बऱ्याचशा गोष्टी समजू लागल्या, तेव्हा वेगळ्याच कारणांकरिता जाहिरातीचं पान मला आवडू लागलं. आता सांगून टाकायला हरकत नाही. काही जाहिराती वाचून माझ्या डोक्यात एकदा एक छान कल्पना आली, आणि तिचा मी भरपूर फायदा करून घेतला. पुष्कळ वेळा मी वाचीत असे,

' चि. गोविंदा यास, तू कुठेही असलास तरी असशील तसा घरी निघून ये. पैसे पाहिजे असल्यास तसे कळव. आम्ही ताबडतोब पैसे पाठवू. तुझी आई अंथ-रुणाला खिळली आहे. वडिलांनी जेवण सोडले आहे. तरी सर्व राग सोडून ताबड-तोब घरी निघून ये. आम्ही तुला पुन्हा कधीही रागावणार नाही.'

मुलं पळून गेली म्हणजे वडील माणसं अगदी सुतासारखी सरळ येतात, ही गोष्ट असल्या प्रकारच्या जाहिरातींवरून माझ्या ध्यानात आली. एखादे दिवशी फार मार बसला म्हणजे मी ओरडून सांगत असे, ' पाहा त्या जाहिरातीतल्या गोविंदासारखा पळून जाईन. ' मला वाटतं, ही धमकी द्यायला सुरुवात केल्यापासून दोन-चार धपाटे तरी मला कमी बसत असत. मात्र फार ताणल्यामुळं ही युक्ती पुढं फसली. एके दिवशी विरोधी पक्षही चिडीला गेला, आणि मला स्पष्ट बजाव-ण्यात आलं, ' जा बघू पळून. आम्ही काही एक जाहिरात देणार नाही. म्हणे पळून जाईन; काळोखात बाहेर पडायला सोबत लागते नि म्हणे पळून जाईन ! ' झालं. आमचा बार फुकट गेला !

याच वेळेला जाहिरातीच्या पानात मला आणि माझ्या एक-दोन मित्रांना एक नवीनच खेळ सापडला. आमच्या अंगात तेव्हा देशभक्तीचं आणि ब्रह्मचर्याचं वारं संचरलं होतं. लग्न करणारे लोक हरामखोर आहेत, असं आम्हांला वाटत होतं. ' वधू पाहिजे. वराचं वय अमुक. सालीना उत्पन्न तमुक. गोत्र फलाणं, प्रवर अमुक-तमुक. ' वगैरे जाहिराती वाचल्या की आमच्या पायाची आग मस्तकात जायची. अगदी तिडीक यायची आमच्या डोक्यात. त्यात आणखी ' वर बिजवर. पहिल्या लग्नाची चार मुले, घरदार आहे. ' वगैरे बिजवरांच्या ' वधू पाहिजे ' जाहिराती वाचल्या की आम्ही बालदेशभक्त अगदीच भडकून जायचे. देशाला आग लागलेली असताना या लोकांना लग्नं कशी सुचतात, हे आम्हांला कळेना ! या लोकांना ताळ्यावर आणण्याचा आम्ही निश्चय केला. फार नाही पण एवढी तरी देशसेवा आपण करावी. आम्ही ठरवलं. तेव्हा मला वाटतं, पोस्टकार्ड पैशाला एक मिळे. खाण्यासाठी मिळालेल्या पैशांतून आठवड्याला तीन पैसे या कार्यासाठी प्रत्येकानं खर्च करायचे, असं आम्ही ठरवलं. दर शनिवारी दुपारी शाळा सुटल्यावर ' वधू पाहिजे ' जाहिरातींतले पत्ते टिपून घेऊन आम्ही नऊ-दहा पोस्टकार्डं त्या पत्त्यांवर पाठवून देत असू. पहिल्याच लग्नाची जाहिरात असल्यास, पुढील मजकूर आम्ही लिहीत असू :

' सा. न. वि. वि. आपली अमक्या पत्रातली ' वधू पाहिजे ' जाहिरात वाचली देशात काय चाललं आहे, तुम्हाला काहीच कळत नाही ? या वेळी लग्नं कसली करता ? हा पापी विचार सोडून द्या, आणि देशासाठी काही तरी करा. तुमची मातृभूमी तुम्हाला हाक मारते आहे. कळावे, ही विनती.

तुमचे हितचिंतक,<br>
वसंत, अनंत, बापू, बंडू वगैरे. '

बिजवराची जाहिरात असल्यास याहीपेक्षा उदात्त ध्येयं आम्ही त्या माणसा-पुढं मांडीत असू :

सा. न. वि. वि. अमुक पत्रातली तुमची 'वधू पाहिजे' ही जाहिरात वाचली. वाचून अतिशय दुःख झाले. काय हे ! या वयात आता कशाला लग्न करता ? आपलं सालीना उत्पन्न इतकं आहे म्हणता, मग ते देशासाठी किंवा गोरगरीबां-साठी का खर्चीत नाही ? हा भलताच विचार सोडून द्या. अगदीच वेळ जात नसेल तर कथाकीर्तनाला जा किंवा घरीच हरिभजन करीत बसा.

आपले हितचिंतक<br>
वसंत, अनंत, बापू, बंडू वगैरे. '

पत्रावर आमचा पत्ता नसे, किंवा खाली सबंध नावं नसत. तेव्हा या पत्रांचा काय परिणाम झाला, किती लोक लग्नाचा विचार सोडून देशभक्तीला किंवा

ईश्वरभक्तीला लागले ते सांगता येत नाही; पण आम्ही मात्र काही तरी देशसेवा करीत आहोत, असं मनःपूर्वक समजत असू.

ही झाली शाळकरी वयातली गोष्ट. याच जाहिराती आता प्रौढ वयात वाचताना निराळीच गंमत वाटते. 'त्या त्या देशातल्या वृत्तपत्रातल्या नुसत्या जाहिराती पाहून तिथली समाजस्थिती मी सांगू शकेन,' असं कुणी तरी प्रख्यात समाजशास्त्रज्ञानं म्हटल्याचं मला आठवतं. अर्थात त्यांच्या या म्हणण्यात थोडीशी अतिशयोक्ती आहे, यात शंका नाही. तरी पण या दृष्टीनं पाहता आपल्या वृत्तपत्रांतल्या जाहिराती आमच्या समाजस्थितीवर विदारक प्रकाश पाडतात, हे कबूल केले पाहिजे. 'वधू अव्यंग, निरोगी, गौरवर्ण, सुंदर पाहिजे.' अव्यंग, निरोगी वधू पाहिजे हे ठीक; पण जणू काय जाहिराती देणारे सर्व अगदी गोरेपान आणि सुंदर असतात! गुरांच्या बाजाराप्रमाणे लग्नाच्या बाजाराची आपल्याकडे स्थिती आहे, हे यावरून दिसून येते. केव्हा केव्हा 'इंग्रजी बोलू शकणारी वधू पाहिजे' अशीही एखादी जाहिरात दिसते. इंग्रजी बोलण्याचा आणि सुखी संसाराचा काय संबंध आहे, ते हे वरराजच जाणोत; पण परभाषेबद्दल जो एक अतिरिक्त आदर आमच्या काही लोकांच्या मनात उत्पन्न झाला आहे त्याची कीव येते.

पण याहीपेक्षा आश्चर्यकारक जाहिराती आणि त्या बहुधा उत्तर हिंदुस्थानातल्या काही पत्रात मी वाचल्या आहेत. वधूसंबंधीच या जाहिराती असतात. पैसे, घरदार, किंवा जवळचे कुणी नातेवाईक नसणाऱ्या एखाद्या सामान्य माणसाला बायकोसाठी जाहिरात द्यावी लागली तर ते ठीक आहे; पण उत्तर हिंदुस्थानातल्या पत्रांत 'आय्. सी. एस्. ला वधू पाहिजे. श्रीमंत पाहिजे, सुंदर पाहिजे.' वगैरे जाहिराती वाचून मात्र मती गुंग होते. आय्. सी. एस्. साठी झालेला सर्व खर्च भरून काढण्यासाठी हा खटाटोप आहे हे उघड आहे. टेंडरं मागवतात त्याप्रमाणे आय्. सी. एस्. इतकं शिक्षण आणि दर्जा प्राप्त झालेल्या माणसानं वधूची टेंडरं मागवावी हे वाचून खरोखरच लाज वाटते.

औषधांच्या जाहिरातींचं एकंदर प्रमाण पाहून वर उल्लेखिलेले समाजशास्त्रज्ञ फारच मजेदार निष्कर्ष काढतील याबद्दल माझी खात्री आहे. आता अर्थात् चित्रपटांच्या जाहिरातींचेच प्रमाण फार असतं; पण चित्रपट अस्तित्वात येण्यापूर्वी जाहिरातींचं बहुतेक पान वज्रांगभैरव पाक, सुवर्णमालिनी वसंत, जवानमर्द मोदक वगैरेंच्या जाहिरातींनी भरलेलं असे. इथले लोक भयंकर निःशक्त झाले आहेत आणि म्हणूनच ते स्वातंत्र्याला नालायक आहेत असा निष्कर्ष आमच्या उपरोल्लेखित समाजशास्त्रज्ञ महाशयांनी काढला नाही म्हणजे मिळविली! बाकी मला मात्र काही औषधांच्या जाहिराती फारच आवडतात. मला पोटाच्या अनेक व्यथा आहेत, तेव्हा या व्यथेवरल्या जाहिराती मी अगदी तल्लीन होऊन वाचतो. 'अमुक गोळी रात्री झोपताना घ्या, सकाळी उठल्याबरोबर तुम्हाला सर्व जग हर्षोत्फुल्ल

दिसेल, ' किंवा ' का उगाच पोट धरून बसता ? मि. जोन्स जेवल्यावरोबर अमुक अमुक दोन गोळ्या घेतात आणि मग नाचत उड्या मारीत ऑफिसात जातात ! ' या जाहिराती वाचताना ललित वाङ्मयाविषयी कुणीसं म्हटलं आहे त्याप्रमाणं माझी अगदी सविकल्प समाधी लागते आणि क्षणभर मीही जोन्सप्रमाणे नाचत, बागडत, उड्या मारीत आपल्या कामाला चाललो आहे असा भास होतो ! निरनिराळ्या गोळ्या आणि वड्या यांच्या जाहिराती वाचताना, त्यांच्या गुणाचं वर्णन, अनुपानाच्या अटी वगैरे आत्मसात् करताना जो काही आनंद होतो तो फक्त पोटाची व्यथा असलेल्या माणसांनाच कळेल ! इतरांना कळणं शक्य नाही ! ' आतड्यातील श्लेष्मल त्वचेला इजा न करता कोठ्यातील पित्तरसाची उठावणी करा ! ' वगैरे लढाऊ घोषणा जाहिरातीत वाचल्या म्हणजे चित्त थरारून जातं; आणि बाहूंना – नव्हे, चुकलो – पोटातील अवयवांना विलक्षण स्फुरण चढतं !

शेक्स्पीअरची नाटकं किंवा बायबल यांच्यासारखे अमोल ग्रंथ मन:पूर्वक वाचणारे लोक फारच थोडे असतात; पण अमेरिकन जाहिरातदारांनी आणि वृत्तपत्रांनी या थोर ग्रंथांची अगदी एका साध्या युक्तीनं तमाम जनतेला गोडी लावली. उच्च वाङ्मय वाचणारे थोडे असतील, पण गोळ्या गिळणाऱ्या आणि मलमे लावणाऱ्या लोकांची जगात खात्रीनं बहुसंख्या आहे. एक अमेरिकन कंपनी बायबलमधले मोठेमोठे उतारे देऊन हळूच त्यांतून आपल्या मलमाची जाहिरात करीत असे. उदाहरणार्थ, ' येशू ख्रिस्त म्हणतो की एका गालावर कुणी चापट मारल्यास दुसरा गाल पुढे करा. ' हे वाक्य या जाहिरातदारानं आपल्या जाहिरातीत उद्‌धृत करून त्यापुढं हळूच आणखी एक वाक्य जोडून दिलं : ' येशू म्हणतो की एका गालावर कुणी चापट मारल्यास दुसरा गाल पुढं करा; पण तोपर्यंत पहिल्या गालाला अमुक अमुक मलम चोपडा म्हणजे दुसरा गाल पुढं करावयाला तुम्हाला काही एक वाटणार नाही ! ' दुसऱ्या एका कोल्डक्रीमच्या व्यापाऱ्यानं शेक्स्पीअरच्या ' रोमिओ अ‍ॅण्ड ज्यूलिएट् ' या प्रख्यात नाटकातला एक उतारा सचित्र दिला. ज्यूलिएट्च्या सौंदर्याला उद्देशून रोमिओनं केलेलं ते भाषण होतं. त्यात फारसा फरक जाहिरातीकरिता त्यानं केला नव्हता. ' तू अशी आहेस, तुझा चेहरा चंद्राहून सुंदर आहे. ' वगैरे शेक्स्पीअरची सर्व वाक्यं त्यानं जशीच्या तशी दिली होती. शेवटी फक्त एकच वाक्य त्यानं अधिक घातलं होतं. ' पण तू जर अमुक अमुक कोल्डक्रीम वापरशील तर त्याहूनही सुंदर दिसशील ! '

पवित्र बायबल किंवा शेक्स्पीअरसारखा महाकवी यांना आपली मलमं आणि गोळ्या यांच्या खपासाठी लोळविणारे हे जाहिरातदार पाहिले की एक विचार मनात आल्याशिवाय राहात नाही. जाहिरातीचा उद्देश काय ? अमुक प्रकारची वस्तू अमुक ठिकाणी मिळते आणि तिचे अमुक उपयोग आहेत, हे सांगण्याचा. मग ही भरमसाट आणि अतिरंजित वर्णनं जाहिरातीत का देण्यात येतात ? वस्तू चांगली असली तर लोक एकमेकांना तिची शिफारस करू लागतात आणि आपोआपच

तिचा खप होतो. आकर्षक जाहिरात देणं ही गोष्ट वेगळी; पण वाचक – थोडी-बहुत बुद्धिमत्ता असलेला वाचक – ज्यावर मुळीच विश्वास ठेवणार नाही अशी भरमसाट वर्णनं का ? अर्थात् गुणांचा अभाव असल्यामुळं ओरडाआरड करून, भलत्याच मुद्द्यांवर लोकांचं लक्ष वेधून आपली वस्तू खपविण्याचा हा अट्टाहास आहे, हे उघड आहे. रशियात वस्तूचे उत्पादन उपयोगाकरिता होत असल्यामुळं– कसेही करून नफा मिळविण्याकरिता होत नसल्यामुळं – तिथल्या वृत्तपत्रांत अशा प्रकारच्या जाहिराती मुळीच दृष्टीला पडत नाहीत. आमच्या चित्रपटांच्या जाहिरातीत ही पद्धती अगदी पराकोटीला गेली आहे. नायकाचे काम करणारा एम्. ए., एल्एल्. बी. आहे, नायिका प्रख्यात वकिलाची मुलगी आहे, वगैरे गोष्टी जाहिरातीत वाचताना खरोखरच मौज वाटते. भिकार अभिनय करणाऱ्या एम्. ए., एल्एल्. बी. चे प्रेक्षकांना सोयरसुतक काय ? नायिका वकिलाची मुलगी असण्याऐवजी झाडूवाल्याची मुलगी असून ती जर उत्कृष्ट अभिनय करणार असेल तर प्रेक्षक तिच्या बापाचा विचार कशाकरिता करणार ? मात्र प्रत्यक्ष चित्रपटापेक्षा या जाहिरातींनी अधिक मनोरंजन होतं, हे कबूल केलं पाहिजे ! आणि भाषेच्या संपत्तीत या जाहिराती केवढी भर टाकतात ! 'दिलखेचक', 'हृदयफोडक', 'काळीजतोडक' ही विशेषणं, चित्रपट नसते तर मराठी भाषेला लाभली असती काय ? वृत्तपत्रांच्या बाकीच्या पानांत खूप काही असेल, पण ही मजा जाहिरातींच्या पानांतच !

* * *

२५.

# ‘मोठ्ठं, त्याहून मोठ्ठं !’

एका छोटया मुलासमोर मूठभर चॉकोलेटच्या वडया धरून मी म्हणालो, ‘यातलं कुठलं पाहिजे तुला ? बदामाचं, पिस्त्याचं की साधंच ?’

त्यातलं सर्वात मोठं उचलून तो मुलगा म्हणाला, ‘मला सर्वात मोठ्ठं पाहिजे !’

‘काय गम्मत आहे पाहा,’ माझ्याबरोबर असलेल्या एका मित्राला मी म्हणालो, ‘बदाम की पिस्ता याचा विचारसुद्धा करीत नाही हा गुलाम. त्याला फक्त मोठं चॉकोलेट पाहिजे !’

गंभीर चेहरा करून छोटा तत्त्ववेत्ता असलेला माझा मित्र म्हणाला, ‘त्या पोराला काय हसायचं ? आजकाल सगळ्यांनाच एकापेक्षा एक मोठ्यांचा सोस लागलाय् !’

‘पुरे पुरे, तुझं तत्त्वज्ञान !’ म्हणून त्या वेळेला त्याची मी थट्टा केली; पण त्याच्या बोलण्यात खूपच तथ्य आहे, असं अलीकडं मला वाटू लागलंय्. आमचा देश एवढा मोठा आहे, आमच्या देशातलं धरण सगळ्या जगात लांब आहे. आमच्या देशातल्या इमारती साऱ्या पृथ्वीतलावर उंच आहेत, हे शब्द अलीकडे सारखे कानांवर आदळत असतात. अशी वडबड करणाराला केव्हा केव्हा चटकन् विचारावंसं वाटतं, ‘का हो, तुमच्या देशातले गद्धेही सर्व जगात मोठे असतील, नाही ?’

असं विचारावंसं वाटतं, पण आपण विचारीत नाही. कारण यापैकी बहुतेक सद्धेतूनं बोलत असतात, बढाई मारण्याकरिता बडबडत नसतात.

या बाबतीतले मला आलेले दोन अनुभव सांगण्यासारखे आहेत. प्रवासात एकदा एक स्विस तरुण मला भेटला होता. एकमेकांच्या देशासंबंधी आम्ही बोलू लागलो, आणि बोलता बोलता आमच्या देशाची लांबी-रुंदी, लोकसंख्या, हिमालय पर्वत यांचं वर्णन मी करू लागलो. मी बढाई मारीत नव्हतो, – खरं तेच सांगत होतो. तो एकदम उद्गारला, 'खरंच, तुमच्या देशात मी जन्मलो असतो तर बरं झालं असतं !'

'का रे बुवा,' मी हसत म्हणालो, 'मला वाटतं, मी तुमच्या देशात जन्मलो असतो तर बरं झालं असतं !'

'म्हणजे ?' तो उद्गारला.

'म्हणजे असं,' मी म्हणालो, 'की सगळंच आमच्याकडे मोठं असल्यामुळ इतक्या वर्षात माझ्या देशाचे काही एक-दोन कोनेकोपरे मी पाह्यले असतील, हिमालय चढून जाण्याची तर गोष्टच नको. उलट, तुझ्या देशाची लांबी-रुंदी दोन-तीन तासांच्या आगगाडीच्या प्रवासानं पाहून घेता येते. वर्षातून चार वेळा देशातला कानाकोपरा हवा तर पायी फिरून पाहावा ! तुझा एवढासा आल्प्स हवा त्यानं हवा तेव्हा चढावा ! लहानसा देश असल्यामुळं तुम्ही तो स्वच्छ किती ठेवता, तुमचं आरोग्य काय, तुमचं राहणीचं मान किती छान ! आमचं सर्वच मोठं, त्याबरोबर आमचं दारिद्र्यही मोठं, आमचा गबाळेपणाही मोठा !'

माझे हे शब्द ऐकून तो हसला आणि शेवटी त्याचा देश त्याला बरा नि माझा देश मला बरा असंच ठरलं; पण या बोलण्यातली एक गोष्ट निर्विवाद आहे. मोठ्यांची हौस ठीक आहे; पण मोठ्यांचा हव्यास उपयोगाचा नाही; मोठ्याइतक्याच काही छोट्या गोष्टीही महत्त्वाच्या असतात; पण पुष्कळ लोकांच्या हे ध्यानात येत नाही. उत्तर हिंदुस्थानात प्रवास करीत असता आगगाडीत माझ्या शेजारीच बसलेल्या एका हिंदी भाषी गृहस्थाशी मी बोलत होतो. माणूस मोठा सुस्वभावी आणि विद्वान होता; पण बोलता बोलता त्याची काही मतं ऐकून मला आश्चर्य वाटलं. भारतातल्या निरनिराळ्या भाषांसंबंधी बोलताना तो म्हणाला, 'आपला देश केवढा मोठा आहे. त्याची एकच एक मोठी भाषा पाहिजे. जास्तीत जास्त लोक हिंदी बोलतात तेव्हा ती मोठी भाषा आहे. तुमच्या मराठी, गुजराती, तामिळ, तेलुगु वगैरे छोट्या छोट्या भाषा तुम्ही शक्य तितक्या लवकर विसरून जाल नि आपण सारे हिंदीत बोलू शकू तितकं आपल्या देशाचं लवकर कल्याण होईल.'

त्याच्याशी सरळ वादविवाद करण्यापेक्षा त्याची थोडी गंमत करावी म्हणजे माझा मुद्दा त्याच्या लवकर ध्यानात येईल असा विचार करून मी म्हणालो, 'तुमचं म्हणणं बरोबर आहे; पण मला वाटतं, सध्याचा काळ लक्षात घेता आपण जरा याहीपेक्षा मोठं झालं पाहिजे. आता सर्व जग आधुनिक विज्ञानानं जवळ आलंय नि परस्परावलंबीही झालंय. आपण सर्व एकत्र जगू किंवा हायड्रोजन बाँबनं एकदमच एकत्र मरू. जग आपल्या देशापेक्षा मोठं आहे हे तुम्ही एकदम मान्य कराल. देशाच्या कल्याणापेक्षा जगाच्या कल्याणाची काळजी वाहणारा अधिक मोठा हेही तुम्ही अमान्य करणार नाही. जगाच्या कल्याणासाठी जगाची एक भाषा असणं आवश्यक आहे, आणि इडो की एस्परांटो नावाची एक विश्वभाषा काही विद्वानांनी तयार केली आहे म्हणतात. तेव्हा जुन्या भाषा टाकून नवीनच शिकायची तर तुम्ही आम्ही सर्व ती एस्परांटोच शिकायला सुरुवात करू या. त्याचप्रमाणे जगात पिवळे लोक सर्वात फार आहेत. त्यांच्या खालोखाल काळे आहेत; नि त्यांपेक्षा कमी गोरे आहेत; कातडी पिवळी करण्याचं रसायन शास्त्रज्ञ सहज शोधून काढतील ! तेव्हा जगातल्या सर्व लोकांनी पिवळं व्हावं हे बरं ! मग काळा, गोरा वगैरे वर्णभेदांची भांडणं दक्षिण आफ्रिकेत वगैरे चाललीत ती आपोआपच बंद पडतील नि जगाचं कल्याण होईल !'

माझं हे व्याख्यान ऐकून तो मोठमोठ्यानं हसू लागला. माझा मुद्दा त्याच्या ताबडतोब ध्यानात आला. मोठं, त्याहून मोठं, त्याहीपेक्षा मोठं असं म्हणत म्हणत जगाचा एकरंगी, एकसाची ठोकळा करायचा की काय ! जिवंत जग म्हणजे विविधतेनं नटलेलं जग. सर्व भाषा, सर्व रंग पाहिजेत. मोठ्याबरोबर लहानांनी, लहानांबरोबर मोठ्यांनी, काळ्यांबरोबर गोऱ्यांनी, गोऱ्यांबरोबर काळ्यांनी,—एकमेकांना खाण्याचा प्रयत्न न करता एकमेकांशी मिळून मिसळून राहण्यातच मजा आहे.

या मोठेपणाच्या वादविवादात एका इंग्रज मित्रानं मात्र मला चांगलंच निरुत्तर केलं. इंग्रज मोठे व्यवहारी, कोणत्याही आत्यंतिकतेच्या आहारी न जाणारे, हे मला पुन्हा एकदा पटलं. त्याच्याबरोबर बोलता बोलता मी एकदा थट्टेत म्हणालो, 'आज जगातला सर्वात मोठ्यातला मोठा माणूस—गांधीजी आमचे आहेत. तुमच्यात असा कुणी आहे ?'

'नाही, बुवा,' तो शांतपणाचा मिस्किल आव आणून म्हणाला, 'हे पाहा, तू म्हणतोस ते खरं आहे; पण त्यात एक लहानशी गोम आहे. सर्व मोठेपणाचा मक्ता तुम्ही एकाच माणसाला दिल्यामुळे तुम्ही सर्व फारच छोटे राहिला आहात. आमचं तसं नाही. आम्ही मोठेपणा अधिक मोठ्या प्रमाणात वाटला आहे. आमच्यात एकच मोठा माणूस नाही; पण आमच्यातला छोटा माणूस तुमच्या

छोटचा माणसापेक्षा खूप मोठा आहे ! मला वाटतं, लोकशाहीच्या तत्त्वानुसार हेच अधिक चांगलं. एक कोटचाधीश आणि कोटचवधी माणसं दरिद्री असण्यापेक्षा कोटचधीश कुणीच नाही, पण सर्वचजण कमी-अधिक सुखवस्तू असलेले बरं नाही का ?’

त्यानं मला चांगलाच टोला हाणला होता ! खरोखरच मोठं, मोठं करीत मोठ्याच्या मागं खुळ्यासारखं धावण्यात काही अर्थ नाही. मोठी यंत्रं, मोठी शहरं, मोठ्या योजना, सर्वच मोठं मोठं करण्याच्या नादात, ज्या छोटचाशा, माणूस नावाच्या प्राण्यासाठी हे सर्व चाललेलं असतं, तो बिचारा शिल्लकच राहात नाही !

* * *

93660
REFBK-0013770